'मी मारीन जयद्रथासि समरीं जों भानु आहे नभीं,
नाहीं होमिनें देह हा हुतवहीं, सर्वात्मना ही न भी.' ।
ऐसें बोलुनि वाक्य त्या परिस तो केला असा नेम रे!
रक्षूं त्यासि बळें, घडो मग तसें, तो स्वापमानें मरे. ॥ २

यानंतरें जैथुनि कौरवराजसेना आली कसी? अवनिमंडळ जें दिसेना. ।
तों पार्थसैन्यहि सर्वेचि निघे रणाला, ज्या इंद्रहि परि नव्हे क्षम वारणाला.॥ ३

सूचीव्यूह तयांत पद्म रचिलें, राहे तदभ्यंतरीं
राजा सैंधव. तो जयद्रथ तरी चिंता करी अंतरीं. ।
व्यूहाच्या वदनीं कृतांतसमसा आचार्य राहे बळें,
जे जे ज्या स्थळिं ठेविले नृपवरें ते राहिले तुंबळें. ॥ ४

वदे कृष्ण, 'पाहें नरा! द्रोण हा रे! समिच्छास्त्रवेत्ता रणीं जो न हारे. ।
जयाचे शरव्रात भात्यांत कोरे, तयासीं वृथा झुंज लावूं नको रे! ॥ ५

पंचाशीति जयासि वर्षगणना, आपांडुता मस्तकीं,
युद्धीं द्रोण तथापि दुर्धर दिसे, हस्ती जसा मस्त कीं, ।
पार्था! तूं न भिडें तयासह नको, तो आजि नाटोपतो,
पाहा दुःसह वाटतो मज रणीं याचा खटाटोप तो.' ॥ ६

नमस्कार दूरोनिया सैव्यसाची करी बाणयोगें गुरूला तसाची, ।
सवेगें पुढें तो पृथापुत्र धांवे, यदर्थप्रतिज्ञा तयातें वधावें. ॥ ७

आले वीर समस्त धीर धरुनी जे सैन्य कीर्तिस्वरें
कोपाविष्ट, विशिष्ट दीप्ति मिरवे ज्यांची सुवार्तस्वरें; ।
सोडी बाण अनेक पार्थ समरीं, बाणासि ने मस्तकीं
वीराचा शर एक ही न चुकतां, लागेच नेमस्त कीं. ॥ ८

---

१. हा सिंधुदेशाचा राजा आणि धृतराष्ट्रकन्या दुःशला हिचा पति. २. सूर्य. ३. न मारीन तर. ४. जाळीन. ५. अग्नींत. ६. असा नियम अथवा पण अर्जुनानें केला. ७. जयद्रथाला. ८. अर्जुन. ९. हें कौरवपक्षीयांचें भाषण आहे. १०. एकत्र होऊन, जमून. ११. समर्थ. १२. निवारण करण्याला. १३. सैन्यरचनाविशेष. १४. पद्मव्यूह. १५. सिंधुदेशाचा राजा. १६. व्यूहाच्या दारावर. १७. यमासारखा. १८. द्रोणाचार्य. १९. अर्जुना. २०. युद्धविद्यानिपुण. २१. हार पावत नाहीं, हरत नाहीं. २२. बाणसमूह. २३. पंचायशी. २४. पांढरे केस. २५. जरी वृद्ध तथापि. २६. दुर्जय. २७. उद्योग. २८. अर्जुन. (डाव्या हातानें बाणसंधान करण्यामध्यें निपुण आहे शील ज्याचें असा.) २९. द्रोणाला. ३०. जयद्रथानें. ३१. नेम धरलेल्या स्थळीं.

सव्यापसव्यकृतसायकतांडवानें केलें पराजित रणीं रण पांडवानें. ।
घालूं शके कवण यावरि वीर घाला? जैसा मृगांत मृगराज तसा निघाला. ॥ ९
कौंतेयाप्रति देवकीय वदला, 'हे भागले वाह रे!
जाले फार तृषार्त, यत्न करणें जेणें पिपासा हरे.' ।
बोले पार्थ, 'जळासि यांसि, जपतों मी वारुणास्त्रा रणीं,
या वीरांस हि वारितों, गज जसे सक्रोध आधोरणीं'. ॥ १०
तत्काळ वापी रचिली च पार्थें वारोनियां वीरबळें अपार्थें, ।
केले युगापासुनि मुक्त देवें सर्वे चि ते घोटक वासुदेवें. ॥ ११
आर्द्रपृष्ट हय पाजुनि पाणी, दों करीं चतुर नीरजपाणी. ।
देखती कुतुक सैनिक सारे, बोलती, 'प्रबळ पार्थ कसा रे?' ॥ १२
धों धों दुंदुभि वाजल्या, उचलला सैन्यीं धुरोळा, नभा
गेला, सर्व दिशा तमोमय, पहा जाला रवी हीनभा. ।
'मारावा व्यसनस्थ पार्थ' वदती 'आहे रथावेगळा,
होतां सज्ज, कदापि हा न उतरे काळाचिया ही गळा.' ॥ १३
राजे भद्रप शाल्य सैंधव शिबी त्रैगर्तकांबष्ट जे,
होगंधांग कलिंग वंग यवन प्राग्जोतिषाधीश जे, ।
इत्याद्युतकोप कोपनिभृत स्वाकृष्टचाप स्वरें,
आले सन्मुख जे क्षणीं विमुख ते केले प्रतापें नरें. ॥ १४
'शाखामृगध्वज बहुत विशाळ वाटे, यासी भिडाल तरि लाविल मृत्युवाटे, ।
गांडिवमुक्त शर वाजति हे सणाणा, ऐसा धनुर्धर कसा स्वमनासि नाणा? १५
कां उकाळत असा परंतावें? आमुच्या तरि मतें परतावें. ।
गर्जतो विजय दुर्गम रावें, कां अशासि खवळोनि मरावें?' ॥ १६
संजोगिले तुरग शीघ्र रथासि देवें, केलें पहा सुकृत पांडुसुतें सदैवें. ।

---

१. सिंह. २. देवकीपुत्र. (कृष्ण.) ३. अश्व. ४. तृष्णापीडित. ५. पिण्याची इच्छा, तहान. ६. जप करून सिद्ध करतों. ७. वरुण आहे देवता ज्याची असें अस्त्र. (उदक उत्पन्न करणारें अस्त्र.) ८. हत्तीचा महात. ९. ज्यांचा अर्थ नष्ट झाला आहे अशीं, अकृतार्थ, भग्नाश. १०. तें. ११. घोडे. १२. कमलपाणी. १३. अंधकारयुक्त. १४. तेजोहीन, नष्टप्रभ. १५. सैन्यांतील लोक हा 'वदती' याचा कर्ता. १६. फांस. १७. वानर (शाखामृग—मारुति) आहे ध्वजाच्या ठिकाणीं ज्याच्या असा. (अर्जुन.) एका प्रसंगीं, अर्जुनानें मारुतीला पराजित केलें, तेव्हां त्यानें ध्वजावर बसून साहाय्य करण्याचें कबूल केलें; म्हणून अर्जुनास 'कपिध्वज' अशा अर्थाचीं विशेषणें लाविलेलीं आढळतात. १८. हें अर्जुनाच्या धनुष्याचें नांव. १९. तळमळता. २०. शत्रूच्या तापानें. २१. अर्जुन. २२. शब्दें. २३. जोडले, बांधले. २४. भाग्यवंतें.

दे हात पार्थ चढतां स्वरथावरी तो, एक्या करें हयचतुष्टय सांवरीतो. ॥ १७
होता असा अरुप दाहक कैंटभारी बोले, 'नैरा ! मन तुझें न भया उभारीं. ।
अस्ताचला स्वतिलकीकृत भानु गेला, वेड्या ! जयद्रथवधास्तव तूं मुकेला.' १८
हें क्लिष्ट वाक्य पडतां श्रवणीं, विलोकी सूर्याकडे, मग म्हणे, 'मुख केंवि लोकीं ।
दावूं ? अतःपर करूं न शकें पणातें. हें वाक्य सत्य करिं, होमिन आपणातें.' १९
अच्यूत हें समजला जगदांतरात्मा, बोले शैतक्रतुसुताप्रति तो मैहात्मा, ।
'कां धाकलास इतुक्यांत चि या वधाया ? पाहें कशी रचितसें निज योगैमाया. ॥
तुझें उणें या खजनीं दिसावें, रथीं तुझ्या स्यां मग कां बसावें ? ।
मनीं असे कार्य तुझें सजावें, उगेचि वाटे मज तूं खिजावें.' ॥ २१
साधावया अर्जुनकैंामनेला अस्तासि मार्तंड निर्काम नेला. ।
प्रमोद जाला धृतराष्ट्रजाला कीं आज हा सैंधव वीर झाला. ॥ २२
समीप आले नृपलोक सारे पाहों, मरे अर्जुन हा कसा रे ! ।
कोणी नरासी करिती खेटाळी ते मारिती हासुनि मूर्ख टाळी. ॥ २३
'पार्था ! वो ! रवि हा, जयद्रथ हि हा, हें लक्ष लावीं बरें.'
बोले अर्जुन, 'लाविलें.' हरि वदे, 'मारीं.' जैंगच्छेखरें ।
ऐसें त्या प्रति बोधितां, झडकरी त्या सैंधैवाचा गळा
गेला तोडुनि अंर्धचंद्रविशिखें कीं मस्तका वेगळा. ॥ २४
आधींच पार्था सुचवोनि देवें, तो वारिला योगहि वासुदेवें ।
तों देखिला भास्कर सैनिकांहीं, उपाय तेव्हां न चले चि कांहीं. ॥ २५
दुर्योधनादिक सशोक सलज्ज झाले, त्यांचे प्रमोदभरदीपक ते विझाले; ।
केला जई विजय दुर्जय वासुदेवें हें वाचिजे हरिकथामृत कीं सदैवें. ॥ २६
श्रीशक्ति कर्ण मग भीमसुतासि मारी, त्याचा प्रताप बहु, तीव्र विरांसि मारी; ।
तें आयका वदत वामन लील वाचा. मेला पुढें तनय द्रोण अशी कुवार्ची. ॥ २७

---

१. कैटभाचा शत्रु. (कृष्ण.) २. अर्जुना. ३. इंद्राचा पुत्र अर्जुन. ४. उदारधी, महाशय. ५. अवस्तूचे ठायीं वस्तुबुद्धि उत्पन्न होण्यास कारण जी ईश्वराची शक्ति ती. ६. इष्टार्थ. ७. सूर्य. ८. अत्यंत. ९. दवाळी. १०. जगताचा मुकुटमणि (कृष्ण) यानें. ११. जयद्रथाचा. १२. अर्धचंद्राकृति बाणानें. १३. घटोत्कचास. १४. या श्लोकावरून 'घटोत्कचवध' आणि 'द्रोणवध' हीं प्रकरणें वामनानें रचिलीं असावीं असा ध्वनितार्थ निघतो.

पार्थभाग्य.[1]

(श्लोक).

कुचयुगुलिं रमेच्या जो रतीं हस्त नाचे,
[2]परिहरि नखचंद्रीं कामदाह स्तनाचे, ।
[3]हय निववि हरी तो त्या करें [4]स्यंदनाचे
जळ पिति समरीं त्या पांडुच्या [5]नंदनाचे. ॥ १
श्रीरमाकुचयुगीं कर ज्याचे बाळ चंद्र करिती [6]करजांचे, ।
त्या करें करुनि अर्जुनवाजी खाजवी करुनि नित्य [7]नैत्राजी. ॥ २
शास्ता हरी जो [8]अब्जासनाचा, तो अर्जुनाच्या [9]हयशासनाचा ।
चाबूक माथां च तुरा करीतो, धूतां हयां [10]चौं चतुरां करीं तो. ॥ ३
रुतति दंत रतीं [11]कमळाधरीं, तुरग[12]रश्मि तया [13]दशनीं धरी, ।
चहुं हयांसि धुतां स्व चहूं करीं परम कौतुक हें समरीं करी. ॥ ४
जो जीव योजी जड जंगमातें, जो निर्मितो चिज्जडसंगमातें, ।
अर्पी रमा ज्यास सुरंग माळा, तो झुंपितो पार्थतुरंगमाला. ॥ ५
योजितो हयगळां गळसूत्रें जो, रमेसि वरि मंगळसूत्रें, ।
त्या करें करुनि माधव दोरे, पार्थभाग्य किति काय वदों रे ! ॥ ६
रमेच्या रतीं स्वेद शिंपूनि पाणी जळीं क्रीडती, तो हरी चक्रपाणी ।
हयांचे मुखीं लाळ हाणोनि वारी, रणीं सारथी अर्जुनाचा निवारी. ॥ ७
तपें [14]विधीलें उपदेश हो हो परंतु जो पार्थहयांस 'हो ! हो !' ।
म्हणे मुखीं, त्या [15]मधुकैटभारी, आश्चर्य हें मानिति देव भारी ॥ ८
शिरीं हरीच्या पद[16]रेणु ज्याच्या, न संपदा तो गणि [17]अब्जजाच्या ।
देतां धुरीं अश्वखुरीं उडावी, ते धूळि माथांवरि हो पडावी. ॥ ९

---

१. हें प्रकरण द्रोणपर्वातील आहे. यास 'अर्जुनभाग्य' असेंही दुसरें नांव आहे. २. नाशी. ३. घोडे. ४. रथाचे. ५. अर्जुनाचे. ६. नखांचे. ७. स्तुति. ८. ब्रह्मदेवाचा. ९. अश्वशिक्षेचा. १०. चौहों. ११. लक्ष्मीच्या अधरोष्ठावर. १२. दोरे. १३. दांतांनीं. १४. ब्रह्मदेवाला. १५. विष्णूच्या कर्णमलापासून उत्पन्न झालेले दोन असुर. हे विष्णूस भय दाखवूं लागले, तेव्हां तो त्यांस 'वर मागा' असें म्हणाला. ते विष्णूचा उपहास करून उलट त्यासच 'वर माग' असें म्हणाले. 'तुम्हांस माझ्या हातून मरण असावें' असा वर विष्णूनें मागून घेऊन त्यांस आपल्या ऊरुप्रदेशीं चक्रानें मारलें. (महाभारत, वनपर्व, अ० २०३). १६. धूलि. १७. ब्रह्मदेवाच्या.

धरी हातें दोरे कर ललित चाबूक दस रे.[1]
मुखें 'होरे! होरे!' म्हणुनि हय ते नाचवि बरे. ।
पहारे पाहारे म्हणति जिकडे तो रथ फिरे
न कोणी सामोरे, त्वरित मनिं दुर्योधन झुरे. ॥ १०

शुकरंभासंवाद.[4]

(श्लोक.)

सव्वाशें सरिता[5] धरूनि उदरीं कृष्णा सवें जातसे,
साठांची गणती करूनि पुरती तीमाजि भीमा वसे; ।
सव्वाशें सरिता जियेसि भिडती ते तुंगभद्रा मिळे
पन्नासां सरिसी हयग्रिवनदी गर्भी जिच्या मीसळे, ॥ १
वेणा आदिकरूनि साठि तिनशें गंगा[7] मिळाल्या जिला
पूर्वेचा उदधी महासुरनदी[8] देखोनियां कांपला. ।
संकोचे सरितापति म्हणउनी केलीं मुखें दोन तीं
पूर्वेच्या उदधीसि विष्णुसरिता कृष्णा मिळे ये रिती. ॥[9] २
रंभा[10] येउनि वाग्विलासवचनें[11] बोले शुकेंद्राप्रती,
'संसाराविण या जगत्रयिं नसे, आणीक जी! सद्गती[12]. ।
ब्रह्मा विष्णु महेश सर्व युवतीआधीन कीं वर्तती,
माना ही विनती, मनांत न धरा संदेह, घ्यावी रती[14]. ॥ ३
जाणा निर्गुण ब्रह्म, त्यस न गमे माया, करी यूवती
दोघांच्या[15] निजसंगमें करुनियां हे जाहली उत्पती[16]. ।

---

१. सुंदर. २. हा शब्द फारशी आहे. ३. या अखेरच्या पद्यांत कविनामनिर्देश नाहीं, तेव्हां हें वामनाचें किंवा इतर कोणाचें हें निश्चयानें सांगवत नाहीं, तथापि भाषेवरून पाहतां हें वामनाचेंच असावें असें वाटतें. ४. हें प्रकरण शांतिपर्वांतर्गत 'मोक्षधर्म' नामक भागांत आहे. यांत शुकाचार्य आणि इंद्रानें पाठविलेली रंभा यांचा संवाद आहे. ५. नद्या. ६. कृष्णा, वेण्या, तुंगभद्रा, भीमा इत्यादि नद्या सह्याद्रिपासून निघालेल्या आहेत असें वर्णन आहे. ७. गंगा विशेषनाम, पण येथें नदीवाचक म्हणून सामान्यनाम होय. ८. मोठी देवनदी, गंगा. ९. हे पहिले दोन श्लोक या प्रकरणांतील नसावेत असें वाटतें. १०. इंद्रानें भयत्रस्त होऊन शुकास तपोभ्रष्ट करण्यासाठीं पाठविलेली अप्सरा. ११. शृंगारोत्तेजक भाषणें. १२. उत्तम स्थिति. १३. स्त्रीवश्य, भार्याविधेय, दारासक्त. (येथें समास कर्तव्य असून पदें असंयुक्त ठेवल्याचें हें उदाहरण आहे.) १४. समागमसुख. १५. माया आणि ब्रह्म यांच्या. १६. सृष्टि.

येथें मायिक जीव कीं विरमती केवीं तयांचा किती ?
 माना हे विनती, मनांत न धरा संदेह, द्यावी रती. ॥ ४
पक्वान्नें घृतपूरकें रुचिकरें गोडी पियूषापरी
 तुम्हांलागुनि योजिलीं तरि किजे आरोग्यता जी ! बरी. ।
भोगा देउनि भोग तांबुल स्वयें देईन मी सत्प्रिती
 माना ही विनती, मनांत न धरा संदेह, द्यावी रती. ॥ ५
पर्यंका जडिलें बहू कुसरिनें रत्नाचिया मंदिरीं,
 आहे शेजे, वरी अनेक कुसुमें संयुक्त जी साजिरी; ।
तेथें येउनियां सुखें पहुडणें सौख्यासि नाहीं मिती
 माना हे विनती, मनांत न धरा संदेह, द्यावी रती.' ॥ ६
'संसारीं सुख जाणते तरि कसे योगी तया त्यागिती ?
 सांडूनी निज मंदिरें, दरिकुटीं कष्टांसि कां भोगिती ? ।
टाकूनी [10]गिरिजेसि शंकर तया [11]कौशासि गेला वना ?
 रंभे ! जाइं उगी च गे ! लवकरी, कां मांडिली [12]वल्गना ? ॥ ७
विष्टा मूत्र विशेष जाण हृदयीं, [13]श्लेष्मा मुखीं फारसा,
 ऐकें [14]कश्मल कामिनी ! म्हणतसे साक्षात तूं आरसा, ।
नाडीले बहुतां, [15]अनर्थमुल गे ! ऐशा तुम्ही अंगना.
 रंभे ! जाइं उगी च गे ! लवकरी, कां मांडिली वल्गना ?' ॥ ८
रंभा बोलतसे, 'अजी शुकमुनी ! नारी जशा इतरा
 आम्हांलागिं तुम्ही तसें गणितसां कैसेन योगीश्वरा ! ।
त्या पोटीं मळ वाहती, विमळ कीं आम्हीच [16]देवांगना,
 चीरी त्या उदरा, सुगंध घमंके, विश्वास आणा मना.' ॥ ९
'रंभे ! ऐक' म्हणे तदा शुकमुनी, 'तूं माझिया उत्तरा;
 पूर्वी हें कळतें मला हि पुरतें, येतों तुझ्या उदरा.' ।
ऐसें ऐकुनि वाक्य निष्ठुर मनीं अत्यंत कोमायिली
 'मी दासी म्हणवूनि दीन वदनें पादांबुजीं लागली. ॥ १०

---

१. पाड, थोरवी. २. घिवर, अनरसे. ३. अमृतासारखी. ४. पलंग. ५. चातुर्यानें. ६. शय्या, सेज. ७. निजणें. ८. माप, गणना. ९. दरींत अथवा पर्णकुटिकेंत (झोंपडींत). १०. पार्वतीस. ११. कशास्तव. १२. बडबड, व्यर्थ वाचाळता. १३. कफ. १४. मलिन, ओंगळ. १५. अनर्थाचें कारण. १६. अप्सरा. १७. पसरे, सुटे. १८. निस्तेज झाली. १९. चरणकमळीं.

धरितिल हृदयीं हा प्रेमसंवाद साधू
म्हणउनि अभिधानीं ग्रंथ हा हें चि साधू. ।
गुणलव कथिलें हो! वामनें केशवाचे
धरुनि चरण चित्तीं श्रीहृषीकेश वाचे. ॥ ११

दंपत्यचरित्र.

(श्लोक.)

कर्णी पृथेच्या घनश्याम लागे, 'त्या मेहुण्यामाजि गणी मला गे! ।
इच्छा मला हे बहु वाटते हो! विप्रासवें पाहिन वाट ते हो!' ॥ १
कुंती म्हणे त्या कमळापतीतें, 'योजूं कसी मी तुज दंपतीतें? ।
न पाहवे रे! तुझिया पदातें जें छेदितें सर्वहि आपदातें. ॥ २

हंसतवदन कुंती बोलली श्रीहरीतें,
'धरिल कसि शिरीं रे! रुक्मिणी घागरीतें? ।
पदतळ मृदु, तैसे स्कंधही, रम्य पाणी,
सजळ घट धराया योग्य ना चक्रपाणी!' ॥ ३

'माझें शरीर तरि हें समुळीं वृथा हो.' ऐकोनियां वचन हास्य करी पृथा हो! ।
'होऊनि दंपति हरी तरि काय जासी?' हें ऐकतां बहुत हर्ष असे अजासी. ४
'जो धन्य देह झिजतो द्विजधर्मकामीं तो घेउनी नच करी तरि धर्म कामीं.' ।
बोलोनियां वचन हें हरि चालिला हो! 'घे रुक्मिणी! घट करीं' मग बोलिला हो!
'स्वामी! बरें,' म्हणुनि श्री घट घे स्वहातीं 'ऐकोनियां नृप ऋषी नयनीं पहाती. ।
जीचे कृपेकरुनियां विधि सर्व चाले, ते आद्यशक्ति घट घेउनि मार्ग चाले. ॥ ६

करा जोडूनीयां विनवित असे पद्मनयना,
'नव्हे योग्य स्वामी! तुज तरि असें शेषशयना! ।

---

१. साधुजन, सज्जन. २. संभाषणानें, संवादानें. ३. संपादित करो. ४. इंद्रियांचा स्वामी, जितेंद्रिय (कृष्ण). ५. हें प्रकरण महाभारताच्या अश्वमेधपर्वांतील आहे. धर्मराजाच्या अश्वमेधातील अश्वास स्नान घालण्यासाठीं आप्तजनांचीं अनेक दंपत्यें येऊन जो मोठा समारंभ झाला, त्याचें यांत वर्णन आहे म्हणून यास 'दंपत्यचरित्र' अथवा 'अश्वस्नान' असें नांव आहे. ६. कृष्ण. ७. संकटांतें. ८. खांदे. ९. हात. १०. कृष्ण. ११. ज्यांना दोन जन्म आहेत ते सर्व द्विज. (ब्राह्मणाचा एक जन्म मातेपासून आणि दुसरा मौंजिबंधनानें होतो, म्हणून त्यास 'द्विज' म्हणतात.) १२. 'आश्चर्य तें' असाही पाठ आहे. १३. कमळाक्षा.

तुझ्या नामीं झाले रत जन तयां सौख्य करिसी
अतां तो तूं माझ्या सदनिं सखया ! कामकरि सी. ॥ ७

जगन्नाथा ! देवा ! सलगि तुजसीं फार करितों,
न जाणूनी तूतें सुहृदकुळिंचा भाव धरितों. ।
न सांगावें तेंही करिसि करवीतों अम्हि तुला'
वदोनीयां ऐसें यदुतिलक साष्टांग नमिला. ॥ ८

हरी बोले प्रेमें, 'स्तविसि नृपति ! व्यर्थ मजला,
जसे बंधू भीमार्जुन सकळ तैसा मि तुजला. ।
तुझ्या कार्यासाठीं सगुण मजला देह धरणें
वदोनीयां ऐसें जइं नकरि तैं व्यर्थचि जिणें.' ॥ ९

'स्त्रियाबंधूपुत्रासहित अवघे काम करुनी
नव्हे ऊणीं नातीं अनुदिनिं अशी मी नत मनीं, ।
तुझ्या अश्वस्नाना जरि उदक आणील रमणी
तरी हे होईल त्रिभुवनसत्यां मस्तकमणी.' ॥ १०

बोलोनियां हें हरि चालिला हो ! भागीरथीचें तट पावला हो ! ।
भरूनि दे कुंभ रमाशिरीं हो ! आश्चर्य ऐसें हरि तो करी हो !. ॥ ११

पदर उभयतांचे बांधिले कौतुकांनीं
कुरुपतिललनांनीं ऐकिली मात कानीं. ।
अभिनव मग तोही देखिला पूतनारी.
घटसहित सवें ते चालिली पूत नारी. ॥ १२

म्हणे, 'मस्तकीं वेदना काय होते ?' हरी बोलतां बोलिला, श्री अहो ! ते ।
म्हणे, 'धर्मकार्जीं नसे खेद मातें' रमा बोलिली वाक्य सर्वोत्तमातें. ॥ १३

'विशेष तुझ्या हरि ! संनिधानीं जे राहती त्यां सुखराजधानी ।
मी धन्य होतें द्विजधर्मकामीं नाहीं तरी मी अवघी रिकामी.' ॥ १४

वाद्यांसहीत ऋषि ते नृपसंनिधानें आले शिरीं कलश घेउनियां निधानें, ।
तो न्हाणिला हय करें अवनीपतीचा श्रीकांत भक्तजनवत्सल या रितीचा. ॥ १५

---

१. चाकर. २. छि, तुच्छ. ३. त्रिजगतांतील पतिव्रता स्त्रियांला. ४. चूडामणि. ५. कौरवस्त्रियांनीं. ६. पवित्र. ७. राजाचा, धर्मराजाचा.

अैपारें असीं भक्तकामें करीतो, पदीं आपुल्या नेतसे लौकरी तो. ।
कथेच्या रेसें शुद्ध केलें मनाला, कलीमाजी या तारिलें वामनाला.॥१६

भागवतांतील आख्यानें.

शुकाष्टक.[3]

(श्लोक.)

चिंध्या न सांपडति काय उग्याचि वाटे[4]? कंथे[5]निमित्त जरि शीत[6] तनूस[7] वाटे[8]. ।
ऐसें असोनि म्हणतो शुक[10] वाक्य कीं,'कां ज्ञाते भले भजति[11] दुष्टधनांधलोकां[12]?'॥१
अन्नाविणें विकळ[13] देह म्हणाल[14] होतो, भिक्षाशनें[15] भजनहेतु जितांचि हो! तो. ।
तें तों मिळेचि म्हणतो शुक यावरी, 'कां ज्ञाते भले भजति दुष्टधनांधलोकां?'॥ २
कोठें मिळे न जरि भैक्ष्यहि[16] याप्रकारीं, बोले, 'तरू नसति काय परोपकारी[17]?' ।
ऐसें असूनि म्हणतो शुक यावरी, 'कां ज्ञाते भले भजति दुष्टधनांधलोकां?'॥ ३
पाणी[18] अगत्य तरि पात्रमिसें अपेक्षा[19], त्याची भले[20] न धरिती, करिती उपेक्षा[21], ।
'कीं आटती' शुक म्हणे,'न नद्या अहो! कां ज्ञाते भले भजति दुष्टधनांधलोकां?'॥४
राहावया मठ गृहादिक तों सजावें, त्या कारणें जरि धनांधगृहास जावें, ।
'कोणी गुहा' शुक म्हणे 'न निरोधिल्या[22], कां ज्ञाते भले भजति दुष्टधनांधलोकां?'

---

१. 'अशीं कौतुकें शेषशायी हरी तो, करीतो व्यथेनें अविद्या हरी तो' असाही पाठ आहे. २. या काव्यांत भक्तवात्सल्य आणि भक्तिप्रेम यांचें वर्णन चांगलें उतरलें आहे. ३. हें प्रकरण श्रीमद्भागवत स्कंध २ अ० २ श्लो० ५-६ यांच्या आधारें रचिलें आहे. ते श्लोक:— 'चीराणि किं पथि न संति दिशंति भिक्षां नैवांघ्रिपा: परभृत: सरितोऽप्यशुष्यन् । रुद्धा गुहा: किमजितोऽवति नोपसन्नान्कस्माद्भजंति कवयो धनदुर्मदांधान् ॥ ५ ॥ एवं स्वचित्ते स्वत एव सिद्ध आत्मा प्रियोऽर्थो भगवाननंत: । तं निर्वृतो नियतार्थो भजेत संसारहेतूपरमश्च यत्र ॥ ६ ॥. वामनाचा ग्रंथारंभीं मंगलाचरण करण्याचा परिपाठ आहे, परंतु कितीएक प्रकरणें मंगलाचरण न करितांही रचिलेलीं आहेत त्यांपैकीं हें एक आहे. ४. मार्गी. ५. गोधडी, कांथडी. ६. थंडी. ७. शरीराला. ८. भासे. ९. गोधडीऐवजीं रस्त्यांत चिंध्या सहज मिळत असून. १०. कृष्णद्वैपायन व्यासाचा पुत्र. घृताची नामक अप्सरा शुकीचें रूप घेऊन पृथ्वीवर संचार करीत असतां, तिचें दिव्य सौंदर्य पाहून व्यासाचें रेत:स्खलन झालें आणि त्यापासून हा जन्म पावला म्हणून याला शुक असें नांव पडलें. हा उपजत ज्ञानसंपन्न, वैराग्यशील, अभिमानशून्य आणि 'परमभागवत' होता. ११. समंजस लोक कशास्तव सेवा करतात. १२. धनानें (धनमदानें) आंधळे झालेल्या दुष्ट लोकांस. १३. व्याकुळ, पीडित. १४. म्हणत असाल तर. १५. याचना करून मिळालेल्या अन्नाचे भक्षणाने. १६. भिक्षाहि. १७. दुसऱ्यावर उपकार करणारे. १८. उदक. १९. इच्छा. २०. साधुजन. २१. अनादर, अनपेक्षा. २२. बंद केल्या.

भोगीं विरक्त हरिभक्त, नसे असोशी, भिक्षाशनादिक तथापि न देह सोशी; ।
'त्याला' म्हणे 'हरि उपेक्षिल काय हो! कां ज्ञाते भले भजति दुष्टधनांधलोकां? ॥ ६
ऐसें म्हणे शुक, तथापि हरीस योगक्षेमार्थ सेविति, तयांस न भक्तियोग; ।
कीं तो सकाम इतुकी जरि वासना ही, त्याचा शुकोक्त मग भार हरीस नाहीं. ॥ ७
प्रारब्धनिष्ठ सुख दुःख समान पाहे, देतो स्वभक्ति हरि यासि म्हणे कृपा हे. ।
त्याचें अगत्य पुरवी हरि लौकरी तो किंवा अहो सहनशील तया करीतो. ॥ ८
ज्यावीण देह न चले हरि लौकरी तो दे अर्थ कीं दृढशरीर असें करीतो. ।
भिक्षासनादि मग तो स्वमुखेंचि सोशी ज्याला नसे विषयभोगसुखीं असोशी. ९

योगभ्रष्टासि जन्म द्विविधें[11] हरि वदे अर्जुनातें विशेषें,
त्यांत श्रीमंतयोगी शुचिगृहिं[12] उपजे भोगवांछा विशेषें. ।
भोग श्रीमंत भोगी, तरि मति पहिली पावतां देवदेवा[13]
वैराग्यें सेवितो तो सकळ सहनता सत्सदन्नादि देवा. ॥ १०

सुखी देह जो जो कदन्नासि सोशी, सदन्ना दिली घे, नसोनी असोशी, ।
द्विधाही म्हणे उत्तमश्लोक पाळी सुखें भोगवी भोग जे जे कपाळीं. ॥ ११

---

१. उपभोग सुखाविषयीं निरिच्छ, निस्पृह. २. हांव, उत्कंठा, उत्कट इच्छा. ३. सहन करी. ४. योगक्षेम ह्या शब्दाचा मूळ अर्थ:—योग म्ह० आपल्याजवळ जें नाहीं तें मिळणें, आणि क्षेम म्ह० जें मिळालें आहे त्याचें संरक्षण करणें, असा आहे. योग=अलभ्यलाभ, क्षेम=लब्धपरिपालन. (भगवद्गीता, अ० ९ श्लो० २२). येथें या शब्दाचा अर्थ—चरितार्थ, उपजीवन, अन्नाच्छादनादिकें करून प्रपंचाचा निर्वाह, असा आहे. ५. उपासना करणें ६. सहेतुक. ७. देवावर ज्याची निष्ठा. (भक्ति, विश्वास) आहे तो. ८. गरज, अपेक्षा. ९. सहिष्णु, सोशिक. १०. भगवद्गीता, अ० ६ श्लो० ४१–४२ 'प्राप्य पुण्यकृतांल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः । शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ॥. 'योगचलितमानस पुरुष कोणती गति पावतो?' या अर्जुनाच्या प्रश्नावर हें कृष्णाचें उत्तर आहे:—जो योगभ्रष्ट आहे तो पुण्यकर्म करणाऱ्या जनांच्या लोकाप्रत पावून तेथें अनेक वर्षें राहून नंतर शुचिर्भूत आणि श्रीमंत यांच्या घरीं जन्मास येतो, किंवा ज्ञानसंपन्न योगीपुरुषाच्या कुलांतच तो जन्मास येतो. (यथार्थदीपिका, अ० ६ ओव्या ९७०–१००८ पहा.) ११. दोन प्रकारें. १२. पवित्र मनुष्याच्या घरीं. १३. देवांचा देव, परमेश्वर. १४. वाईट अन्न, घृतादिरहित हरीक राळा इत्यादि निकृष्ट धान्याचें अन्न. तत्पुरुषसमासामध्यें अजादि उत्तरपद असेल तर 'कोः कत्तत्पुरुषेऽचि' (६।३।१०१) या सूत्रानें कुशब्दाला 'कत्'आदेश होतो; जसें, कदश्व (वाईट घोडा), कदन्न. १५. उत्तम अन्न. १६. कृष्ण. उत्तम म्ह० तम (पाप, अज्ञान) रहित आहे श्लोक म्ह० कीर्ति ज्याची तो; ज्याच्या कीर्तनाच्या योगें पाप अथवा अज्ञान नाहींसें होतें तो.

रक्षी न काय अजित[1] स्वपदाब्जदासां[2] ? तें बोलिला शुक असें असिया उदासां. ।
भावार्थ[3] हा निवडिला स्फुट वामनानें मानूनि निश्चय असा बरवा मनानें. ॥ १२

दशावतारचरित्र.[4]

(श्लोक.)

मीन[5] मी हरि नमीन मनानें, जो सुरीं[6] विनविला नमनानें, ।
वेद घेऊनि जळींच पळाला शंख[7] दैत्य, वधि[8] त्या चपळाला. ॥ १
कांसवें[9] धरुनि मंदर साचा मंथिला जळधि[10] मंद रसाचा, ।
देव हो ! अमृतपान करा या दानवांवरि कृपा न कराया. ॥ २
जो हुताशन[11] खरा हवनींचा[12], तोचि होवुनि वराह[13] वनींचा ।
उद्धरी क्षिति[14] रसातळगामी तोचि हो ! तुरगसाच लगामीं. ॥ ३
लांकडामधुनि[15] देव निघाला, घातला दितिसुतावरि[16] घाला, ।
दुर्ज नारसिंह[17] (?) ती दमनाची जे न राखतील साधु मनाची. ॥ ४
याचिया बळि स्वभूपदमानें[18] स्थापिला[19] बळि समूप दमानें, ।
थोर लाभ मख[20] आचरणाचा लाभ जो हरिचिया चरणांचा. ॥ ५
जें प्रयुक्त मुनि भार्गव[21] हातें तें रिपुवैरिच[22] शस्त्र वहातें, ।
त्या भयें युवति बाळक रानीं धांवती धरुनि बाल[23] करांनीं. ॥ ६
मेळवोनि रिसें[24] वानरजाती त्यांत दोवजणहे नरें[25] जाती ।
राक्षसाधिप[26] वधूनि करानें आणिली निज वधू[27] निकरानें. ॥ ७
देवकीउदरिंचा सुत[28] आठवा, तो तुम्ही पळपळांतरिं आठवा, ।
आगमानिगम[29] जो ऋषि देवां, लांधला[30] सरसिजानन[31] देवा. ॥ ८

---

१. विष्णु. (कृष्ण.) २. आपल्या चरणकमलभक्तांला. ३. ऐहिक भोग्य पदार्थांशीं शरीरनिर्वाहापुरता संबंध ठेवून ईशभजन करून राहिलें असतां ईश्व आपल्या भक्ताचें संरक्षण करील, असा भावार्थ. ४. हें प्रकरण श्रीमद्भागवत, स्कंध २ अ० ७ याच्या अनुरोधानें रचिलेलें आहे. ५. मत्स्य. विष्णूनें मत्स्यरूप धारण केलें त्याचें हें वर्णन. ६. देवांनीं. ७. हयग्रीव नामक एका दैत्यानें ब्रह्मदेव निद्रित असतां त्याच्या मुखांतून बाहेर पडणारे वेद हरण केले या गोष्टीचा येथें संबंध आहे. ८. मत्स्यावतारीं विष्णूनें या खळाचा वध करून वेद ब्रह्मदेवास परत दिले. ९. कूर्मावतार. १०. क्षीरोदधि. ११. अग्नि. १२. यज्ञाचा. १३. यज्ञवराहावतार. १४. पृथ्वी. १५. खांबांतून. १६. दैत्यावर. (हिरण्यकशिपुवर.) १७. श्रीनृसिंहावतार. १८. मापानें. १९. वामनावतार. २०. यज्ञ. २१. जमदग्निपुत्र. २२. क्षत्रियकुलावर. २३. केश. २४. आश्वल. २५. श्रीरामावतार. २६. रावण. २७. सीता. २८. श्रीकृष्णावतार हा आठवा होय. २९. वेदज्ञाल. ३०. 'लाभला स्वकरिं तो वसुदेवा' असाही पाठ आहे. ३१. कमलमुख.

देखतां बहुत चोज[1] लेपाला[2], सेविताति मुनि हो जळपाला[3], ।
बुद्धिगोचर तरी गवसेना, एक ठाव तरि योग बसेना. ॥ ९
काळ जो[4] कलियुगीं यवनांचा, रक्षिता सकळही भुवनांचा, ।
होवुनी विविध या अवतारीं, कीर्तनें करुनि वामन तारी. ॥ १०

ध्यानमाळा.[6]

(श्लोक.)

वंदूनियां जलधिजापतिच्या[7] पदांतें[8], वर्णीन[9] त्या हरिचिया तनुसंपदांतें[10]. ।
बोले मुनी कपिल[11] भागवतीं स्ववाचे मातेस[12], तेचि गुण गाइन केशवाचे[13]. ॥ १
ध्यावें बरें हरिचिया पदपंकजांतें[14], वज्रांकुशध्वजसरोरुह[15] अंकें[16] जातें. ।
आरक्त वर्तुळ नखें हृदयीं प्रभा ते नाशी अनादि तमें[17], सूर्य तसा प्रभातें[18]. ॥ २
प्रक्षाळितां चरण ते शिवें[19] त्या जळाला[20] घेतां शिरीं, गरळदाह[21] निवे जळाला[22], ।
माथां धरूनि शिवें[23] तें शिवें[24] नीरें[25] जाला, ध्यावें असें स्मरत त्या पदनीरजाला[26]. ३
मांडीवरी चरणसुंदरपादपद्मापासूनि जानुवरि ठेवुनि नित्य पद्मा[27], ।
प्रीतीकरूनि चुरिते, जननी जनाची, माता विधीचिहि[28], वधू भवभंजनाची[29]. ॥ ४

---

१. नवल. २. पळाला. ३. जळपान करणारा. ४. हा बुद्धावतार होय. ५. श्रीकल्क्यवतार. ६. हें प्रकरण श्रीमद्भागवत, स्कंध ३ अ० २८ श्लो० २१–३३ यांच्या आधारें रचिलेलें आहे; इतकेंच नव्हे, रत पद्यास्त पद्य समश्लोक टीकारूप आहे. याला 'विष्णुध्यान' असेंही दुसरें नांव आहे. ७. लक्ष्मीपतीच्या. जलधी(समुद्रा)पासून झालेली लक्ष्मी. समुद्रमंथनकाळीं समुद्रापासुन चौदा रत्नें उत्पन्न झालीं, त्यांपैकीं लक्ष्मी एक होय. इतर तेरा येणेंप्रमाणें:– कौस्तुभमणि, पारिजातक, मद्य, धन्वंतरि, चंद्र, कामधेनु, ऐरावत (गज), अप्सरा, उच्चैःश्रवा (सातमुखांचा अश्व), विष, हरिधनु, शंख आणि अमृत. ८. चरणांतें. ९. मी. (वामनपंडित.) १०. देहवैभवातें, शरीरसंपत्तीतें. ११. हा कर्दम प्रजापतीचा पुत्र. याच्या मातेचें नांव देवहूति. कपिल यास महामुनि असेंही म्हटलेलें आढळतें. यानें आपल्या मातेला आत्मतत्त्वज्ञानाचा बोध (भागवत, स्कंध ३ अ० २५-३३) केला आहे त्यांतीलच हें प्रकरण होय. हा सांख्यशास्त्रप्रणेता होय. १२. देवहूति ही स्वायंभू मनूच्या तीन कन्यांपैकीं दुसरी. हिला मुलानें आत्मतत्त्वोपदेश केल्यावर हिनें नदीरूप होऊन देहविसर्जन केलें. (भागवत, स्कंध ३ अ० ३३.) १३. विष्णूचे. १४. चरणकमलांतें. १५. वज्र, अंकुश, ध्वज आणि सरोरुह (कमळ) हीं रेखात्मक चिन्हें ज्याचीं आहेत त्याला. (हीं चिन्हें पादतळीं असल्यास तीं शुभावह होत अशी समजूत आहे.) १६. चिन्ह. १७. भक्तांच्या हृदयांतील अज्ञानरूप अंधकार. १८. सकाळीं. १९. शंकर. २०. उदकाला. २१. विषभक्षणानें झालेला शरीराच्या दाह. २२. दग्ध झालेला. २३. महादेव. २४. कल्याणदायक, अधिक सुखसंपन्न. २५. उदक. २६. चरणकमलाला. २७. लक्ष्मी. २८. ब्रह्मदेवाची. २७. संसारनाशक (कृष्णाची).

ज्या मांडिया खगभुजांवरि वर्तमाना, ज्या सांवळ्या अतसिकाकुसुमासमाना, ।
पीतांबरावरि कटीं अतिरम्यकांची पंक्ती जिला मणिमया लघुघंटिकांची. ॥ ५
नाभीहृदीं कमळ, पुन्न विरंचि ज्यांत, त्रैलोक्यउद्भव जया जगदंबुजांत, ।
विस्तीर्ण ऊर नवयौवनभाव दावी, पांची स्तनीं उगवल्या असि भा वदावी.॥६
श्रीयुक्त हृत्कमळ त्या भवमोचनाचें, जें दे मनासि सुख वाढवि लोचनाचें, ।
ध्यावें चराचरनमस्कृतकंधरातें, जो कौस्तुभा मिरवितो अतिसुंदरातें. ॥ ७
जे मंदरें मथिति बाहु सुधांबुधीतें, ध्यावें तया सकळवीरसुधांबुधीतें ।
धारा देहाशत सुदर्शन चक्र हातीं, पद्मांत हंस करिं शंख असा पहाती. ॥ ८
कौमोदकी प्रिय गदा स्मर अंतरंगें जे माखिली असुरमर्दनि रक्तरंगें, ।
गुंजारवें करुनि सेविति भृंगमाळा, कंठीं मणी मिरवितो स्थिरजंगमाला. ॥९
झाला स्वमूर्त्यकरुणेचि करूनि रूपी, त्याचें मुखाब्जसुख कोण जगीं निरूपी? ।
गंडस्थळीं मकरकुंडलमौक्तिकांची डोले प्रभा, सरळता अति नासिकाची.॥१०
श्री ज्यांत लुब्ध कुटिलालकभृंगजाला श्री मीनयुग्म करि ज्या वदनांबुजाला. ।

---

१. गरुडाच्या खांद्यावर. २. अतसिकेच्या पुष्पांसारख्या. ३. कटिभूषण. ४. रत्नखचित घागऱ्या. ५. पाच मणि, मरकत मणि, 'ज्या चिहूनीं' असाही पाठ आहे. ६. प्रभा. ७. लक्ष्मीयुक्त. (जें हृत्कमळ लक्ष्मीचें वासस्थान आहे [illegible]) ८. विष्णूचें हृदयकमल. ९. संसारनाशकाचें. (विष्णूचें.) १०. जें भक्तां[illegible]आणि लोचनांला (डोळ्यांना) आनंदप्रद. ११. स्थावरजंगमांनीं नम्र केली [illegible]मान ज्याला अशा (हरीतें.) १२. मणिविशेष. (कृष्णाचें कंठभूषण.) याचा शब्दार्थ असा:—कुं भुवं स्तुभ्नाति व्याप्नोति कुस्तुभोऽब्धिः, तत्र भवः; म्ह० पृथ्वीला व्यापणारा जो कुस्तुभ (समुद्र) त्यांत झालेला. समुद्रमंथनसमयीं जीं चौदा रत्नें निर्माण झालीं त्यांत कौस्तुभाची गणना आहे. १३. 'रसांबुधीतें' असाही पाठ आहे. १४. एकहजार. १५. ज्याचें दर्शन शोभन आहे असें जें तें. (आयुध.) १६. हातावरचा शंख पद्मावरील राजहंसाप्रमाणें. या श्लोकांत चक्र आणि शंख यांचें वर्णन आहे. १७. विष्णूची गदा. याचा शब्दार्थ असा:—'पालकत्वात् कोः पृथिव्या मोदकः कुमोदको विष्णुः. 'विष्णुः कुमोदकः शौरिः' इति दुर्गः. तस्येयम्; म्ह० पृथ्वीचें पालन करून आनंद देणारा जो कुमोदक (विष्णु) त्याची (गदा). १८. मनांत. १९. राक्षसांस मारून निघालेल्या रक्ताच्या रंगानें. 'असुर मर्दुनि' असाही पाठ आहे. २०. भ्रमरांची पंक्ति. २१. कौस्तुभमणि. २२. 'मिरवि जो' असा पाठभेद. २३. मूर्तिमान्. (भक्तांवर करुणा करावी म्हणून जो अवतार घेऊन मूर्तिमान् झाला.) २४. वर्णन करी. २५. गालांवर. २६. मकराकृति कर्णभूषण. २७. कुरळे केसरूप भ्रमरपंक्ति ज्यांत लुब्ध आहे. २८. शोभा. २९. दोन मासे. ३०. मुखकमलाला.

[1]सुभ्रूसुखाब्ज [2]नयनाब्जयुगें करूनी शोभे, [3]जळस्थळसरोरुहभा हरूनी. ॥ ११
ध्यातें विशेष [4]अवलोकन लोचनाचें [5]तापत्रया निववि जें भवमोचनाचें; ।
सस्नेह [6]ज्यांत अतिसुंदर हास्य मंद प्रेमप्रसाद शुभ ज्यांत असे [7]अमंद. ॥ १२
[8]शोषी अशेष भवशोकसमुद्रवारी, हांसे असा परम सुंदर [9]दानवारी. ।
क्रीडा करी मुनिमनांत रिघोनि [10]काम भ्रूमंडलें भुलवि [11]त्यांसह [12]पूर्णकाम. ॥ १३
ध्यानास आश्रय असे [13]इतिहास देवें केले, जसे इतर नाठविजे सदेवें. ।
आरक्त दंत अधरामृततेज [14]जींत ध्यावा असा स्मरत विष्णु [15]हृदंबुजांत. ॥ १४
[16]रूपीं अशा हरिचिया जडतांचि भाव, प्रेमें महा उठति सात्विक [17]अष्टभाव. ।
तो नाठवे हरिहि मानसहंसरूपीं, जावूनियां मन बुडे [18]निजचित्स्वरूपीं. ॥ १५
हे ध्यानपद्धति चतुर्दशरत्नमाळा [19]पायीं समर्पिलि तया [20]पुरुषोत्तमाला. ।
[21]पद्यासि पद्यचि निघे सुखिं वामनाच्या वृत्ती असोनि हरिरूपमया मनाच्या. १६

---

१. सुंदर भिवयांनीं युक्त [illegible] मुखकमल. २. दोन नेत्रकमलांच्या योगानें. ३. जल आणि स्थल यांच्या कमलाची [illegible] केसांनीं भ्रमरांची आणि नेत्रद्वयानें मीनद्वयाची शोभा नाहींशी करून. ४ [illegible] आधिदैविक (देवतांच्या क्षोभापासून होणारा—जसा वीज पडणें), आध्यात्मिक (मनाच्या [illegible] अथवा शरीराच्या रोगापासून होणारा—जसा खरूज, ताप), आणि आधिभौतिक (पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांच्या क्षोभानें होणारा—जसा भूकंप, अतिवृष्टि, समुद्रमर्यादोल्लंघन.) ६. ज्या अवलोकनांत स्निग्धस्मित आहे असें. ७. विपुल. ८. भक्तजनाच्या संसारतापजनित शोकसागराचें सकल पाणी शोषून टाकतो. ९. दानवांचा शत्रु. (कृष्ण.) १०. मदन. ११. त्या कामासहवर्तमान. १२. ज्यांची इच्छा तृप्त आहे असा. (कृष्ण.) १३. जे इतिहास ध्यानास विषय आहे. १४. ज्या आतहास्यामध्यें. १५. हृदयकमळांत, हृदयाकाशीं. १६. परमानंद मूर्तिच्या ठायीं. १७. सात्विक आठ भावांचीं नांवें येणेंप्रमाणें:—१ स्तंभ (स्तब्धता), २ प्रलय (बेशुद्धि), ३ रोमांच (अंगावर कांटा उभा राहणें), ४ स्वेद (घाम येणें), ५ वैवर्ण्य (तोंडाचा वर्ण बदलणें), ६ वेपथु (कंप), ७ अश्रु (डोळ्यांतून पाणी येणें), आणि ८ वैस्वर्य (स्वर पालटणें.) १८. आत्मज्ञानस्वरूपीं. १९. चरणीं. २०. पुरुषांमध्यें अथवा पुरुषांहून जो उत्तम त्याला. (कृष्णाला.) २१. प्रत्येक संस्कृत श्लोकाबद्दल एक प्राकृत श्लोक.

विष्णुध्यान.[1]

(उमा.)

[2]पादसरोज [3]उरोजयुगावरि ठेवुनि सेवि [4]सरोजभवा,
[5]भृंगे असंग मुनींद्र मनीं रस घेति [6]जयांतिल नित्य नवा, ।
[7]ध्यानपरास [8]निधान सुखप्रद [9]विष्णुपरंपद जेथ जिवा,
[10]अंबुजसंभवधौतपदांबुज जें [11]चरणांबु किरीट शिवा. ॥ १
दिव्य [12]शशांक दशांगुलिकांवरि शोभति रम्य [13]पदाब्जनखें,
आठवितां मनिं संत [14]महत्तम नासुनि उत्तम देति सुखें, ।
लेश महत्त्व हि वर्णु म्हणे, परि भागलि [15]शेषअशेषमुखें;
ध्यान असें बहु दानतपें जनमानसिं होय अनेक [16]मखें. ॥ २

(मदिरा.)

चित्त असें चरणद्वय चिंतुनि चिंतितसें [17]मनें वर्तुळ घोंटे
[18]हाटकपीतपटीं कटि त्यावरि वेष्टित पुष्ट तनू मनिं वाटे, ।
विश्व[19]सरोज सुनाभिसरोवरिं ज्यांत [20]सरोरुहसंभव भेटे
पोट सुरम्य, वलित्रय ज्यावरि, आंत जगत्रयकोटि न दाटे. ॥ ३

(उमा.)

[21]श्रीप्रियमंदिर सुंदर तो उर शोभतसे सुविशाळपणें,
केवळ जो [22]करुणावरुणालय तो [23]कमलालय याचि गुणें. ।
[24]कंबु नये सम रम्य गळा, परि [25]सिंधुसुता [26]निजबंधु तिणें,
आणुनियां समते ममतेस्तव सार्थक [27]केलें तयाचें जिणें. ॥ ४

---

१. हें प्रकरण मागीलप्रमाणेंच श्रीमद्भागवत, स्कंध ३ अ० २८ श्लो० २१–३३ यांच्या अनुरोधानें लिहिलें आहे. याचें वृत्त 'सवाई' असें अलेरच्या पद्यांत म्हटलें आहे, तथापि यांत 'उमा' आणि 'मदिरा' अशीं दोन वृत्तें आहेत. २ पदकमल. ३. दोन स्तनांवर. ४. कमलापासून ज्याचा जन्म असा जो ब्रह्मदेव त्याला. ५. विषयसुखांचा संग ज्यांनीं सोडिला आहे असे थोर मुनि हेच भ्रमर. ६. ज्या कमलांतील. ७. ध्याननिमग्न, ध्यानपरायण. ८. ठेवा, स्थान. ९. श्रेष्ठपद. १०. कमलोद्भव ब्रह्मदेवानें धुतलें आहे पदकमल ज्याचें अशा. ११. पादोदक. १२. चंद्र. १३. पदकमल. १४. थोर अंधकार, अज्ञान. १५. सहस्रमुख सर्प. हा सामासिक शब्द असल्यामुळें संधि कर्तव्य असूनही तो येथें केला नाहीं. १६. यज्ञानें. १७. 'अतिसुंदर घोंटे' असाही पाठ आहे. १८. सुवर्ण. १९. कमल. २०. ब्रह्मा. २१. लक्ष्मीचें आवडतें गृह. २२. कृपासागर. २३. लक्ष्मीचें स्थान. २४. शंख. २५. लक्ष्मी. २६. लक्ष्मीचा सहोदर भाऊ. (लक्ष्मी आणि शंख यांची उत्पत्ति सागरापासून, या कारणास्तव बंधुत्वाचें नातें येतें.) २७. 'लें' आणि 'चें' हीं अक्षरें वृत्तमुखार्थ ह्रस्व म्हटलीं पाहिजेत.

सायुध सुंदर बाहुचतुष्टय पुष्ट जसे करिचे कर ते
जे भुज वीर रसा अवलंबुनि लंब हि जानुवरी पुरते ।
स्कंद सुरम्य, न साम्य दिसे वृष, होति पशुत्वगुणें पर ते,
वक्ष अपूर्व वरी रविचे कर पूर्वगिरीशिखरावरुते. ॥ ५

(मांदरा.)

श्रीमुख तें सुखनीरसरोरुह, ज्या वदनीं निगमामृतखाणी
बिंबफलाधर कोटि कलाधर आणुं शके उपमेसि न वाणी, ।
सेवि रमा परमामृत जेथिल पाहणियाचि जियेस न वाणी
पाहि अनादि अनादिपणें तरि दृग्भ्रमरांचि पुरे न शिराणी. ॥ ६

(उमा.)

श्रीहरिचें मुखपंकज त्यांत हि लोचनपंकजयुग्म वसे,
श्रीहरिचा मुखचंद्र तयांत हि सुंदर ते द्विजपंक्ति दिसे, ।
प्राकृत पंकज चंद्र न त्यासम अद्भुत हा रस त्यांसि नसे
ध्यान मुनी करिती हरिचें मनिं, सांपडती रस त्यांत असे. ॥ ७
आस्यसरोरुह हास्यलवें अति रम्य उपास्यमनोभ्रमरीं
भ्रूयुग भूरि अनुग्रहसूचक भूसुर भूपकरीं अमरीं ।
लेश अनुग्रह घेवुनि दानव मारियले अमरीं समरीं
भक्त विरक्त जनीं तरि त्यांसि च मागितलें विधिच्या कुमरीं. ॥ ८
नासिक तें तिलपुष्प म्हणों तरि त्यासि न ये तिळें हे उपमा
प्राकृत हे शुकचंचु न ये रिति चित्सुखनासिकिं जो महिमा ।
भाळ विशाळ, टिळा वरि सुंदर, वाणि न वर्णु शके सुषमा
चांगुल गाल हनू, अति सुंदर विस्मित, देखुनि जेथ रमा. ॥ ९
दोनि सहस्रदळें चरणीं तसिं चारि करीं हरिच्या कमळें
लोचनआननअंबुजकानन अंबुरुहें सकळें विमळें ।

---

१. शस्त्रांसह. २. हत्तीचे. ३. शुंडा. ४. 'अवलंब हि लंबित जानुवरी पुरते' असाही पाठ आहे. ५. गुडघ्यापर्यंत. ६. खांदा. ७. बैल. ८. किरण. ९. उदयाचलाच्या शिखरावरील. १०. उदककमळ. ११. वेदामृताची खाण. १२. तोंडल्यासारखे ओठ. १३. चंद्र. १४. कमताई. १५. नेत्रभ्रमर. १६. आवड. १७. दंतपंक्ति. १८. कमल. १९. 'कवी' अन्यपाठ. २०. मुखकमल. २१. उपासनेस योग्य. २२. पुष्कळ. २३. कृपा. २४. ब्राह्मण. २५. देवांनीं. २६. नारदानें. २७. अल्प, तिळभर. २८ राघूची चोंच. २९. सरस्वती. ३०. शोभा. ३१. हनवटी. ३२. कमळें.

चित्सुख यांत सुधारस केवळ या करितां मुनिभृंगकुळें
केशमिषें करि केशवमस्तकिं देखिलिं दिव्य मनें कुशळें. ॥ १०
रत्नकिरीट शिरीं मकराकृति कुंडल कौस्तुभ कंठिं मणी
श्रीवनमाळ गळां पद तोंवरि वेष्टित ज्यांत रमा रमणी ।
पीतपटीं कटिं सूत्र सुनूपुर दुःखहरें बिरुदें चरणीं
अंगदकंकणसंघे मुद्रावरि रत्नसमूह जसे तरणी. ॥ ११
वर्णिति वर्ण अनेकविध श्रुति तप्त सुवर्ण सुगौर तसा
सत्यपुगीं स्फुरतो स्फटिकोपम कर्मयुगीं उदयार्क जसा ।
द्वापरिं नील सुनील सुनीरद माधव याहि युगांत असा
श्यामल कोमल वामनमानसिं सुंदर या कलिमाजि ठसा. ॥ १२

(मदिरा.)

श्रीधरणीचरणीं मन ठेवुनि सेविति ज्या विमलादिक शक्ती
होवुनि भाट अचाट गुण श्रुति वर्णिति शास्त्र पुराण सदुक्ती; ।
दृष्टिलवामृतवृष्टिस लक्षुनि धावति जे स्थळिं चौरि हि मुक्ति
अंबुजसंभव शंभु मुखीं पद पूजियलें सनकादिकभक्तीं. ॥ १३
अंग पलंग करूनि भुजंगपती सुपती स्वतनूचिच केली
स्तोत्र अजस्र सहस्र मुखें मति ...गुति भक्ति निमित्त भुकेली ।
वामनवैखरी ... । हरिभक्ति निवाली
ध्यान विधा... ...ळा हरिअर्पित जाली. ॥ १४

---

१. समूह. २. 'आ पादपद्मं या माला वनमालेति सा मता' इति कलिंगः; अथवा–'आजानुलंबिनी माला सर्वर्तुकुसमोज्ज्वला । मध्ये स्थूलकदंबाढ्या वनमालेति कीर्तिता ॥'; तात्पर्यार्थ–कंठांत घातली असतां पायांपर्यंत पोंचणाऱ्या मालेला 'वनमाला' असें नांव आहे. ३. सुंदर स्त्री. ४. बाहुभूषण. ५. समूह. ६. आंगठ्या. ७. सूर्य. ८. मेघ. ९. स्तुतिपाठक. १०. सलोकता, समीपता, स्वरूपता व सायुज्यता. उपास्य देवतेच्या लोकीं राहणें ती सलोकता; उपास्य देवतेच्या संनिध राहणें ती समीपता; उपास्य देवतेचें व आपलें स्वरूप व गुण सारखे होणें ती सरूपता; आणि उपास्य देवतेमध्यें (ब्रह्मीं) मिळून लीन होणें ती सायुज्यता.

भूगोलवर्णन.

(श्लोक.)

आत्मा हेमें जसें तसा स्थिरचरीं नाना नगीं संचला,
हें नेणें, दुसतें सुवर्ण वळखे, आत्मत्व तो वंचला; ।
एवं जो भगवंत विश्व अवघे वंदूनियां त्यास मी
हा भूगोलतरंग वर्णित असें त्या चित्समुद्रीं समीं. ॥ १

सहस्रपत्राब्ज तशी धरा हे तत्कर्णिका होवुनि मेरु राहे. ।
द्वीपांचिया सिंधुचिया जळाच्या पंक्ती तयाच्याच जशा दळाच्या. ॥ २

कोटीपुढें खंदक, खंदकाही पुढें दुजा कोटचि जेंवि कांहीं, ।
द्वीपापुढें सागर, सागरासीं द्वीप, क्रमें त्यास हि वारिराशी. ॥ ३

अशी योजनें भूमि पंन्नास कोटी, मधें मंडळाकार हे मध्य कोटी; ।
पुढें कंकणाकार सर्वा धरा हो! तसे सिंधु ही, हा मनीं बोध राहो. ॥ ४

अशी सप्तद्वीप क्षितिवरि मधें त्यांत मिरवे,
वरी जंबुद्वीपें क्षिति नवचि ते भाग बरवे; ।
तयामध्यें मेरू तळिंहुनि हि जो रुंद वरता
उभा गावें लक्षप्रमित म्हणती वेद पुरता ॥ ५

---

१. हे प्रकरण श्रीमद्भागवत, स्कंध ... आणि २० यांच्या अनुरोधानें रचिलें आहे. मूळांत या अध्यायांस 'भुवनकोषवर्ण ... . २. सर्व भूतांचे दोन वर्ग आहेत:–स्थिर (स्थावर) आणि चर (जं ... उत्पत्ति अंडज, स्वेदज आणि जरायुज या तीन खाणींपासून आहे, आणि स ... उद्भिज्ज या खाणीपासून आहे. पक्षी, साप, इत्यादि अंडज; लिखा, उवा, ढे ... इत्यादि स्वेदज; मनुष्य, पशु इत्यादि जरायुज; वृक्ष, लता, कुश, काशादि उद्भिज्ज; याप्रमाणें स्थावरजंगमांचें वर्णन आहे. (भीष्मपर्व, अ० ४). ४. दागिना. ५. राहिला, असला. ६. न जाणें. ७. फसला. ८. मी वामनपंडित कवि. ९. लाट. १०. ज्ञानसागरीं. ११. ज्याला हजार पानें आहेत असें कमल. १२. पृथ्वी. १३. मधला भाग. १४. मेरुपर्वताला 'कर्णिकाचल' असें म्हणूनच नांव आहे. १५. बेट. १६. किल्ला, दुर्ग. १७. समुद्र. १८. अर्वाचीन शोधान्वयें पृथ्वीचा व्यास ८००० मैल म्ह० ८०० योजनें, परीघ २५००० मैल म्ह० २५०० योजनें, व क्षेत्रफळ २०,००,००,००० मैल म्ह० २,००,००,००० योजनें आहे. १९. वाटोळी, वर्तुलाकार. २०. सप्तद्वीपें:–'जंबूप्लक्षाह्वयौ द्वीपौ शाल्मलीश्चापरो द्विज । कुशः क्रौंचस्तथा शाकः पुष्करश्चैव सप्तमः ॥' (विष्णुपुराण). २१. पृथ्वीच्या सप्त महाद्वीपांतील हें पहिलें. २२. जंबुद्वीपाचे वर्षसंज्ञक नऊ भाग येणेंप्रमाणें:—भरत, किन्नर, हरि, कुरु, हिरण्मय, रम्यक, भद्राश्व, केतुमाल आणि इलावृत्त. २३. योजन. २४. चार वेद. (ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद).

(ओव्या).

मेरूस दक्षिण दिशे । निषधनाम पर्वत असे, ।
नीलाद्रि उत्तरे वसे, । माल्यवान् पश्चिमेसी; ॥ ६
पूर्वेसी गंधमादन, । समुद्रपर्यंत यापासून ।
भूमी भद्राश्व म्हणून । म्हणवी खंड. ॥ ७
पश्चिमे माल्यवान् पर्वत, । त्यापासून समुद्रपर्यंत ।
केतुमाल म्हणोनी विख्यात । तिसरें खंड. ॥ ८
पूर्वपश्चिम समुद्रवरी । तीन खंडें या परी, ।
इलावृत्त चहूंकडे चारी । सीमापर्वत. ॥ ९
त्यास दक्षिणेस निषधगिरी । पूर्वपश्चिम समुद्रवरी ।
दक्षिणे जातां आडवा परी । पूर्वपश्चिम तो नीट. ॥ १०
त्यास ही दक्षिण दिशे । हेमकूट पर्वत असे, ।
या दोहींमध्यें खंड वसे । हरिवर्ष म्हणूनी. ॥ ११
हेमकूट, पुढें पर्वत । दक्षिणेस, उभयसिंधूपर्यंत ।
या दों गिरींमध्यें विख्यात । किंपुरुष खंड. ॥ १२
हिमाचल दक्षिण दिशे । समुद्रवरी पृथ्वी असे, ।
तिथें हें भरतखंड वसे । कर्मभूमी. ॥ १३
एवं पूर्वपश्चिम दोन्ही । मध्यें एक दक्षिण तिन्ही ।
मेरूभोंवतीं खंडें नेमूनी । सांगितलीं साहा च. ॥ १४
आतां मेरूभोंवतें इलावृत, । त्यास उत्तरे नीलपर्वत, ।
त्या ही पुढें, नामें श्वेत- । गिरी आडवा दक्षिणे. ॥ १५
या दों पर्वतांभीतरीं । पूर्वपश्चिम समुद्रवरी ।
रम्यक् खंड तया वैखरी । बोले मुनींची. ॥ १६
यास ही उत्तर दिशे । शृंगवान् पर्वत तैसाच असे, ।
तेथ पर्यंत वसे । हिरण्मय खंड. ॥ १७

१. क्षारसमुद्र. २. नील, निषध, माल्यवान् आणि गंधमादन, असे चार महापर्वत. ३. शिखर. ४. हेमकूट आणि हिमालय यांमध्यें. ५. हिमालय. ६. पूर्वपश्चिम दिशांकडे क्षारसमुद्र. ७. भरतवर्ष ही पुण्यकर्मे करण्याची भूमि असून इतर वर्ष भोग्यभूमि आहेत. ८. नीलपर्वतापुढें. ९. नील आणि श्वेत या पर्वतांमध्यें. १०. क्षारसमुद्र. ११. वाणी. १२. शुकानी. १३. श्वेत आणि शृंगवान् या दोन पर्वतांच्या मध्यें.

तेथून उत्तरे [1]समुद्रवरी । [2]उत्तरकुरुखंड या परी. ।
एवं नवखंड कूसरी । जंबुद्वीपाची. ॥ १८

(श्लोक.)

मधें मेरु, त्याभोंवती भू अखंड, गिरी [3]चौंत दावी इलावृत्त खंड, ।
तया [4]मध्यखंडास जे पूर्वभागीं तया नाम भद्राश्व पृथ्वी विभागीं. ॥ १९
इलावृताहूनि हि पूर्वभागीं तें खंड भद्राश्व धराविभागीं, ।
जे पश्चिमे तें तरि केतुमाला या दोंस ही [5]सागरयुग्ममाळा. ॥ २०

(घनाक्षरी.)

[6]लोकें आतळ, बितळ, । तया तळीं ही सुतळ, ।
तळातळ, महातळ । एक एका खालतें. ॥
तया खालें रसातळ, । तया खालें ही पाताळ, ।
तया तळीं महा [7]व्याळ । व्यासवाणी बोलते. ॥
[8]भूमीवरी [9]भुवर्लोक, । [10]स्वर्गावरी [11]महर्लोक, ।
[12]जनतपसत्यलोक । एक एका वरते, ॥
ब्रह्मांड हें [13]विवरण, । वरी वरी [14]आवरण ।
पुढें [15]वामनचरण । सत्व तेंची उरतें. ॥ २१
कोटि योजन पन्नास । अंड कोटीचा [16]विन्यास. ।
सांगितलासे धन्यास । [17]राजयासी श्रीशुकें. ॥
मध्यें भूगोलाचें स्थळ । मेरु[18] सोन्याचा अढळ ।
तया भोंवते [19]अचळ । असंख्यात कौतुकें. ॥

---

१. क्षारसमुद्र आणि शृंगवान् पर्वत यांच्यामध्यें. २. यास 'ऐरावतवर्ष' असेंही नामांतर आहे. ३. नील, निषध, माल्यवान् आणि गंधमादन या चार पर्वतांमध्यें. ४. इलावृत्त सर्वांच्या मध्यभागीं आहे म्हणून त्यास 'मध्यखंड' असें म्हटलें आहे. ५. पूर्वपश्चिम समुद्रांची माळा (सीमा). ६. हीं सात पाताळें. (भूमीच्या अधोभागांतील सात बिलस्वर्ग.) ७. शेष. ८. मनुष्यांचें वासस्थल. ९. मुनि व सिद्ध यांचें स्थान. १०. इंद्रादि देवांचें वासस्थान. ११. भृगु इत्यादि प्रजोत्पत्तीस कारणभूत जे श्रेष्ठ प्रजापति त्यांचें राहण्याचें स्थान. १२. जनोलोक (सनक, सनंदन, सनातन व सनत्कुमार यांचें स्थान), तपोलोक (योगी इत्यादिकांचें राहण्याचें स्थळ), सत्यलोक (ब्रह्मदेवाचें वसतिस्थान). १३. उघडणें, झांकण काढणें, स्पष्टीकरण. १४. आच्छादन. १५. विष्णुपदाचें वर्णन ५ स्कंधाच्या १७ व्या अध्यायांत आहे. १६. यथाक्रम रचना, व्यवस्था. १७. परीक्षित् राजाला. १८ भास्कराचार्यादि ज्योतिषी पृथ्वीच्या आंसाला 'मेरु' म्हणतात. १९. पर्वत.

कर्णिका सेहस्रदळीं । तसा मेरू भूमंडळीं, ।
जैशा केशराच्या वळी । हेमगिरीशतकें. ॥
मेरूभोंवतें भूतळ । जैसें वर्तुळ कमळ ।
जंबुद्वीप तें केवळ । लांब रुंद तितुकें. ॥ २२
लक्ष योजनें विशाळ । मेरू सोन्याचा सुढाळ ।
जंबुद्वीप भूमी माळ । भोंवती त्या पर्वत. ॥
सोळा सहस्र योजन मेरू । भूमींत निमग्न जैसें धेतुरू ।
सुमन रुंद जों ां वरू । .... ॥
तया भोंवती ते धरा । तोची जंबुद्वीप खरा ।
लांबी रुंदीनें जो बारा । लक्ष गांव पुरता. ॥
तया वेष्टण कंकण । सिंधु नामें जो लवण ।
स्वयें वर्तुळ आपण । लक्ष गांव पुरता. ॥ २३
जंबुद्वीप हा अखंड । नवा पर्वत उदंड ।
त्या ही मध्यें नव खंड । भूमंडळ वार्णिती. ॥
मध्यें मेरु हा पर्वत । तेथें खंड इलावृत्त ।
दोन्ही समुद्रपर्यंत । दोन्हीकडे असती. ॥
तीन खंडें दक्षिणेस । तीन खंडें उत्तरेस ।
शेवटील दोन्ही जैशा । धनुष्याच्या आकृती. ॥
सिंधू उत्तर दक्षिण । दोन्ही धनुष्यलक्षण ।
सीमा पर्वतांचे गण । दोहीं प्रांतीं ये रिती. ॥ २४
सिंधु नामें जो लवण । पूर्व पश्चिम दक्षिण ।
हिमाचल तो आपण । गिरिराज उत्तरे. ॥
तें हें भरताचें खंडें । पुण्य सद्गति उदंड ।
येथें पापी लंड[11] भंड[12] । तेची नरकीं खरे. ॥

---

१. कमळांतील गर्भकोश, मध्यभाग. २. कमळी, (ज्याला हजार पानें आहेत तें.) ३. बांधेसूद, सुरेख, तेजस्वी. ४. धोतऱ्याचें फूल. ५. वलय. ६. क्षारसमुद्र. ७. पुष्कळ. (उंच आहे दांडा ज्याचा तें, असा शब्दार्थ; यावरूनच 'पुष्कळ' असा अर्थ कालांतरानें निष्पन्न झाला.) ८. मेरु-पर्वताच्या समीप. ९. धनुष्याच्या आकाराचें. १०. भरतखंडाच्या सीमा लघुआर्यसिद्धांतांत एथल्याप्रमाणेंच वर्णिल्या आहेत:—'सागरहिमगिरिमध्ये चापाकारं हि भारतं वर्षम्'. ११. उक. १२. लबाड.

एथें करिती जे पाप । तयां नरकीं संताप ।
जो जो पुण्याचा प्रताप । तो तो लोक ही बरे. ॥
एथील ची पुण्यफळ । द्वीपें खंडें हें सकळ ।
स्वर्ग अतळ वितळ । तेथूनी च हे सारे. ॥ २५
चित्तशुद्धीनें चिद्भक्ति । हरिभक्तीनें विरक्ती, ।
भक्तिविरक्तीनें मुक्ती । ऐशीं शस्त्रें बोलती. ॥
पीक ज्ञानाचा न ज्यास । सत्यलोकीं तया वास, ।
तेथें करूनी अभ्यास । अंतीं मोक्ष पावनी. ॥
मोक्ष अन्यत्र ही परी । तेथें ज्ञान होय जरी, ।
मोक्षप्रदत्व ही तरी । याच खंडीं साधिती. ॥
ज्ञानेंवीण चित्तशुद्धी । तेणें जन्मांतरीं सिद्धी, ।
आत्मतत्त्व ज्ञानबुद्धी । या च भूमी वरिती. ॥ २६
लक्ष योजनें समुद्र । खोल तितकाच रुंद, ।
लंकादिक दुर्गवृंदें । त्याचि मध्यें वर्णिती. ॥
पुढें द्वीप नामें लक्ष । तेथें प्लक्षनामें लक्ष, ।
रुंदीनें ती दोन लक्ष । लांब कंकणाकृती. ॥
रस उंसाचा केवळ । तैसें सागराचें जळ, ।
त्यानें द्वीप तें केवळ । वेष्टिलें हो बोलती. ॥
पुढें शाल्मली म्हणून । वृक्ष नामेंची करून ।
द्वीप तयाचें वेष्टन । मद्यसागर असे. ॥ २७
त्या ही पुढें कुशद्वीप । कुशस्तंभ जेंवि दीप ।
ऐसें तेज तो अधीप । जाणों द्वीपांचा दिसे. ॥
घृतसिंधूचें वेष्टण; । त्याही पुढें विचक्षण ।
[13] क्रौंचद्वीपाचें लक्षण । बोलताति हो! असें. ॥

---

१. परिणाम, फळ. २. समूह. ३. हें दुसरें महाद्वीप. येथें एक प्लक्षवृक्ष (पिंपरीचा वृक्ष) अतिशयित मोठा असल्यामुळें या द्विपास हेंच नांव पडलें. (भागवत, स्कंध ५ अ० २०.) ४. वलयाकार. ५. याच्या सभोंवतीं इक्षुरसोदाचें वेष्टन आहे. ६. शाल्मलिद्वीप हें तिसरें महाद्वीप. ७. या द्वीपाला सुरासमुद्राचें वेष्टन आहे. ८. हें चौथें महाद्वीप. ९. या द्वीपांत कुशस्तंब नामक अग्निप्रतिम तेजस्वी ईश्वरनिर्मित कुश असल्यामुळें यास 'कुशद्वीप' असें नांव पडलें. (भागवत, स्कंध ५ अ० २० श्लो० १३ पद्य.) १०. राजा, अधिपति. ११. घृतसागराच्या पलीकडे. १२. पंडित, ज्ञानी. १३. हें पांचवें महाद्वीप.

ज्यांत क्रौंच[1] डोंगर, । घेरें[2] क्षीराचा सागर ।
जया क्षीराब्धींत वैर[3] । त्याचे कन्येचा[4] असे. ॥
क्षीरनिधीपुढें[5] धाम[6] । शाकद्वीप[7] त्याचें नाम, ।
शाकवृक्ष अभिराम[8] । त्याचें नेम[9] त्या प्रती. ॥ २८
त्या ही भोंवता तो अब्धी[10] । त्याचें पाणी जाणों दधी. ।
पुढें द्वीप तें पुष्कर[11] अवधी । सातवें हें बोलती. ॥
तया वेष्टण जें जळ । गोड सिंधूचें[12] केवळ ।
त्या ही पुढें तो अचळ[13] । लोकालोक[14] येरीती, ॥
कीं ज्यां[15] भीतरी हे[16] लोक । जया बाहेरी अलोक[17] ।
सूर्य चंद्र अवलोक[18] । जयापुढें नसती. ॥ २९
ब्रह्मांडाचा मध्यभाग । भूमी त्याचा हा विभाग, ।
जिला शिरीं शेष नाग । अहर्निशी[19] वाहातो. ॥
वरी वरी सत्यलोक[20] । ब्रह्मपद जें विशोकें[21], ।
लेखितां तें सत्यलोक । कटाहा[22] ची राहतो. ॥
अंडकटाहाचें[23] दळ[24] । [25]कोश दशगुण[26] जळ ।
दशगुणची अनळ[27] । वायुपुढें वहातसे. ॥

---

१. या द्वीपांत क्रौंच नामक मोठा पर्वत असल्यामुळें यास 'क्रौंचद्वीप' असें नांव पडलें. (भागवत, स्कंध ५ अ० २०.) २. वेष्टन. ३. पति. ४. लक्ष्मीचा. लक्ष्मी ही क्षीराब्धीची कन्या, हिचा पति विष्णु हा क्षीरसमुद्रांत कलारूपानें असणाऱ्या शेष नामक सर्पावर शयन करतो, असें पुराणांत वर्णन आहे. ५. क्षीरसमुद्र. ६. स्थान. ७. हें सहावें महाद्वीप. ८. मनोहर, रमणीय. ९. शाक नामक वृक्षावरून 'शाकद्वीप' असें नांव पडलें. १०. या द्वीपाला दधिमंडोदाचें (दह्याच्या समुद्राचें) वेष्टन आहे. ११. हें सातवें महाद्वीप. १२. याला गोड्या पाण्याच्या समुद्राचें वेष्टन आहे. १३. पर्वत. १४. सप्तमहाद्वीपें आणि सप्तसमुद्र यांस पोटांत घेवून मेरुपर्वताच्या आसमंतात् शाराकोटि पन्नासलक्ष योजनांवर असणारा वर्तुलाकार महापर्वत. याच्या आंतल्या भागास लोक 'प्रकाश' व बाहेरल्या भागास 'अलोक (अंधकार—अप्रकाश) असल्यामुळें याला 'लोकालोक' असें नांव पडलें. १५. ज्या पर्वताच्या आंत. १६. प्रकाश. १७. अप्रकाश, अंधकार. १८. पहाणें. १९ रात्रंदिवस. २०. ब्रह्मदेवाचें वासस्थान. २१. दुःखरहित. २२. कढई. २३. ब्रह्मांडाभोंवतीं भूम्यादि अष्ट (पंचमहाभूतें, मन, ज्ञान, आणि अविद्या) प्रकृतींचें जें कवच आहे तें, त्याचें. २४. पान, पांकळी. २५. कोसला, आवरण. २६. दसपट. २७. अग्नि.

नभ[1] अहं[2] महत्तत्त्व[3] । दशा दशगुणकत्व ।
साक्षी[4] पुढें निर्गुणत्व[5] । वामन हें पाहातो. ॥ ३०

नामसुधा.[6]

अध्याय पहिला.

चरण पहिला.

(श्लोक.)

हरिचरणसरोजीं[7] चित्सुधासारपानें[8]
भ्रमर परमयोगी गुंजती[9] नामगानें[10], ।
हरति सकळ दुःखां, हीं सुखाचीं निधानें[11]
वद वद वद जिव्हे! वासुदेवाभिधानें[12]. ॥ १
हरिपण[13] हरिनामें[14] धातुमूर्तीसि[15] आलें,
हरिमय[16] हरिनामें विश्व संतांसि[17] झालें. ।
भवभय[18] हरिनामें साधकांचें[19] पळालें,
वद वद वद जिव्हे! रामनामें रसाळें[20]. ॥ २
हरितेंडु[21] हरिनामें लेखिली सर्वभक्तीं,
सहजसुखनिधानीं[22] देखिली ही विरक्तीं[23]. ।

---

१. आकाश. २. अहंकार, मीपणा. ३. प्रकृति पुरुषांच्या संयोगानें उत्पत्तीस कारणभूत असें जें महत् नांवाचें तत्त्व तें, प्रकृतिपुरुषांपासून उत्पन्न झालेलें उत्पत्तीचें मूलतत्त्व. ४. प्रत्यक्षदृष्टीनें पाहणारा. ५. सत्त्व, रज व तम या तीन गुणांचें राहित्य, या तीन गुणांचा अभाव. ६. हें प्रकरण श्रीमद्भागवत, स्कंध ६ अ० १–३ यांच्या अनुरोधानें रचिलेलें आहे. अमृत जसें मनुष्याला मरणापासून सोडवितें, तसें भगवंताचें नामरूप अमृत (सुधा) संसारचक्रापासून सोडवितें, असें भगवन्नामाचें माहात्म्य ह्या प्रकरणांत वर्णिलें आहे, म्हणून ह्यास 'नामसुधा' अथवा 'हरिनामसुधा' असें इष्टार्थद्योतक नांव दिलें आहे. ७. हरीच्या चरणकमलीं. ८. चित् म्ह० ज्ञान (आत्मज्ञान) तद्रूप सुधेच्या (अमृताच्या) पानानें (सेवनानें). ९. गुंजारव करतात, जपतात. ('भ्रमर' हा कर्ता आहे म्हणून 'गुंजती' या शब्दाचा उपयोग केला आहे.) १०. भगवन्नामरूप गीतें. ११. राहण्याचीं स्थानें. १२. वसुदेवाचा पुत्र जो कृष्ण त्याचीं अभिधानें (नांवें). १३. देवपण. १४. हरि असें नांव दिल्यामुळें. १५. सोनें, रुपें, पितळ इत्यादि धातूंच्या केलेल्या प्रतिमेला. १६. हरियुक्त, हरिपरिपूर्ण. ('मय' प्रत्ययाचा अर्थ 'त्याचें घडलेलें, त्यानें युक्त, त्यानें बनविलेलें' असा आहे:—जसें; मृन्मय, हिरण्मय, वाङ्मय.) १७. साधुजनाला. १८. संसारभय. १९. मोक्षप्राप्तीसाठीं प्रयत्न करणारांचें. २०. मधुर, गोड. ('आळ' हा प्रत्यय लागून 'सबळ अवळ' अशा अर्थाचे शब्द होतात:—जसें; घायाळ, लडकाळ.) २१. शरीर. २२. साहजिक सुखाचें राहण्याचें स्थान जे त्यांनीं (विरक्तीं). २३. विषयसुखाविषयीं जे निरिच्छ त्यांनीं, काम क्रोध मोहादिकांच्या स्वाधीन जे नाहींत त्यांनीं, निर्ममजनांनीं.

शुक[1]सनक[2]मुखीं जीं गाइलीं जीवन्मुक्तीं[3]
वद वद वद जिव्हे! टाकुनी लौकिकोक्ती[4]. ॥ ३
निगमहि[5] हरिनामें गर्जती वर्णवर्णीं[6]
पतित[7] तरति नामें आश्रमी[8] आणि वर्णी[9], ।
हरिपदिं हरिनामीं जेंवि मुद्रा सुवर्णीं,
जगिं कवण असा जो नाममाहात्म्य[10] वर्णी? ॥ ४
आकाशअंत[11] न कळोनिहि अंतरिक्षीं[12] आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी, ।
नामप्रतापहि[13] यथामति यांच[14] रीती, सीमा[15] न पावति, तथापि मुनींद्र[16] गाती. ॥ ५
उडति मानसहंस[17] जया नभीं[18] शलभ[19] त्याचि नभीं उडतां न भी. ।
अजितनाममहत्व[20] ऋषि श्रुती[21] वदति, तेंचि वदेन[22] यथामती[23]. ॥ ६
श्रुतिनिगमपुराणें[24] आगमक्षीरसिंधु
मथुनि अमृतरूप ग्रंथ[25] हा दीनबंधु[26], ।

---

१. व्यासाचा पुत्र. यानेंच श्रीमद्भागवत परीक्षित् राजास सांगितलें. हा उपजत आत्मज्ञानसंपन्न आणि ब्रह्मनिष्ठ होता. २. ब्रह्मदेवाच्या चार मानस पुत्रांपैकीं एक. हा मोठा ब्रह्मनिष्ठ होता. सनत्कुमार, सनत्सुजात आणि सनंदन हीं इतर तीन पुत्रांचीं नांवें. ३. जीवन्मुक्त जनांनीं. जननमरणापासून मुक्त होण्याचें साधन जें ईश्वरज्ञान (ब्रह्मज्ञान) तें ज्याला प्राप्त आहे तो जीवन्मुक्त ब्रह्मज्ञानी वेदांतवेत्ता. ४. प्रपंचसंबंधी भाषण सोडून. ५. वेद. ६. प्रत्येक वर्णांत, प्रत्येक अक्षरीं. ७. ऊर्ध्वगतीस कारणीभूत जें धर्माचरणोत्पन्न पुण्य तें ज्यांच्या पदरीं लेशही नाहीं असे पातकी पुरुष. ८. ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ, आणि संन्यास या चार आश्रमांतून कोणताही आश्रम धारण करणारे. येथें 'आश्रमी' या पदानें गृहस्थ वानप्रस्थ आणि संन्यासी इतकाच अर्थ विवक्षित दिसतो. ९. ब्रह्मचारी. १०. भगवंताच्या नांवाचा मोठेपणा. ११. संस्कृत भाषेच्या नियमानुसारें सामासिक शब्दांचा संधि करणें अवश्य असून तो 'आकाश' आणि 'अंत' या सामासिक शब्दांचा केला नाहीं. अशीं उदाहरणें वामनाच्या कवितेंत पुष्कळ आढळतात. १२. आकाशांत, पोकळीमध्यें, अंतराळीं. १३. नांवाचा विक्रम, गौरव. १४. याचप्रमाणें, अंत न कळला तरी यथाशक्ति आणि यथामति होईल तितक्या मानानें. १५. अंत. १६. मुनिश्रेष्ठ. मुनिलक्षण भगवद्गीतेमध्यें सांगितलें आहे:— 'दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः । वीतरागभयक्रोधः स्थिरधीर्मुनिरुच्यते ॥'. (अ०२ श्लो०५६) १७. प्रख्यात मानस नामक सरोवरास जाणारे हंस पक्षी. १८. आकाशांत. १९. टोळ, पतंग. शलभ आणि हंस यांच्यामध्यें सामर्थ्यसंबंधानें मोठा भेद आहे, तथापि ते एकाच आकाशांत उडतात. २०. ईश्वराचे नांवाचें मोठेपण. २१. वेद. २२. मी (वामनपंडित). २३. बुद्धिप्रमाणें. २४. पुराणें= पुराणग्रंथ. अठरा पुराणें आणि अठरा उपपुराणें; आगम=धर्मशास्त्रादि ग्रंथ; ह्या सर्वांचा मिळून झालेला क्षीरसागर. (हें वर्णन पुराणप्रसिद्ध क्षीरसमुद्रमथनाच्या कथेस अनुलक्षून आहे.) २५. 'नामसुधा' हा ग्रंथ. (जसें क्षीरसागराच्या मथनापासून विष्णूनें अमृत काढलें तसें श्रुतिपुराणशास्त्रादिकांच्या मथनापासून वामनानें 'नामसुधा' ग्रंथ काढिला हा भावार्थ.) २६. दीनांचा मित्र

प्रकट करिल आतां वामनात्मा मुरारी
श्रवणपठनमात्रें जो समस्तांसि तारी. ॥ ७

हा ग्रंथ याचिकरितां अमृताभिधानी नामें प्रसिद्ध 'हरिनामसुधा' म्हणोनी, ।
जें नाम गोड, महिमा अति गोड त्याचा, जो वर्णिती अमृतरूप परादि वाचा. ८
मोक्ष श्रुती वदति व्यास गुणप्रसादें, तो पावती सगुण नामसुधानुवादें; ।
कोण्या मिसेंकरुनि यो हरिनाम वाचे नेत्र प्रकाशति तयावरि माधवाचे. ॥ ९
नारायणा म्हणुनि एक सुतासि बाहे, नारायणाख्य नर अन्य तयासि पाहे, ।
नारायणा म्हणति लौकिकेंही प्रवाहीं नारायणाक्षिविषय क्षण होति तेही.॥१०
आवींच साक्षि सकळांसिहि पाहताहे, जो नाम घे करुण होवुनि त्यास पाहे. ।
तो धन्य कीं क्षणहि ज्यावरि विष्णुदृष्टी, थेंबीं तळें भरतसे करुणांबुवृष्टी.॥११
कर्मानुरूप फळदायक साक्षिदृष्टी सर्वांवरी तसिच तत्करुणांबुवृष्टी, ।
आहे परंतु जनपातक आड जेथें क्षेत्रें सुधेकरुनि त्या भिजवी न तेथें. ॥ १२
छायेसही सूर्य जसा प्रकाशी, जाणे तसा साक्षिहि पापराशी, ।
वृष्टीसही तोचि करी तथापि क्षेत्रांसि आच्छादिति लोक पापी. ॥ १३
नकळतहि पडे हा विष्णुनामाग्नि जेथें
दुरिततृणगृहाचें भस्म होणार तेथें, ।

---

१. वामन आहे रूप ज्याचें असा. २. मुराचा अरि. (कृष्ण.) मुर या नांवाचा एक नरकासुराचा अनुचर असुर होता, त्याला कृष्णानें मारलें म्हणून कृष्णास 'मुरारि' म्हटलें आहे. ३. जन्ममरणबंधापासून मुक्त करतो. ४. अमृत (नामसुधा) आहे अभिधान (नांव) ज्याचें असा. ५. जो महिमा. ६. परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चार भाषा (वाणी) आहेत. परा म्हणजे केवळ सूक्ष्म सकळ शब्दांचे बीजभूत योगगम्य शब्दस्वरूप जी वाणी ती. ७. अमृतरूप नामाच्या पुनरुच्चारणानें. ८. येतो. ९. माच्या (लक्ष्मीच्या) धवाचे (पतीचे) म्ह० श्रीकृष्णाचे. १०. कोणी एक मनुष्य आपल्या मुलाला नारायण अशी हांक मारतो. ११. नारायण नांवाचा मनुष्य त्या (मुलाला) अन्य (सुताहून भिन्न) असें पाहे. १२. प्रापंचिक. १३. दृष्टिविषय. १४. आपण अलग राहून उदासीनपणें पाहाणारा. १५. जो पुरुष परमेश्वराचें नांव घेतो त्याला साक्षी (परमेश्वर) करुण (दयार्द्र) होऊन सदयांतःकरणानें पाहतो. १६. करुणा(दया)रूप उदकाची वृष्टि झाली असतां उदकाच्या थेंबानें तळें भरून जातें. १७. कर्माप्रमाणें, जसें कर्म करावें त्या मानानें, कर्माच्या धोरणानें. १८. शरीरें. १९. झांकिती. २०. विष्णूचें नाम हाच अग्नि. आवडत्या विषयाचें विवेचन करतांना वामन एकच दृष्टांत वारंवार घेऊन एकच गोष्ट अनेकदां सिद्ध करून आपली तद्विषयक अभिरुचि दर्शवितो, असें आढळून येतें. अग्नीचा दृष्टांत घेऊन वामनानें एकाच तत्वाचें (नामप्रभावाचें) प्रतिपादन २३,३४,३५,४१, ४२,४३,४५,४७,४८,४९ इत्यादि पद्यांत अनेकदां उत्कृष्ट केलें आहे. २१. दुरित (पातक) हेंच तृणाचें (गवताचें) गृह त्याचें.

मग सम करुणेची आयती कृष्णदृष्टी
सिजविल करिते जे सर्वसृष्ट्यर्थ वृष्टी. ॥ १४
जसें हेम[1]मूर्तीमधें हातपायीं दिसे एक सोनेंचि तें सर्व ठायीं, ।
असा विश्व[2]रूपें स्वयें शे[3]षशायी स्वनामें जना होतसे सौख्यदायी. ॥ १५
घटादीक नारायणाचींच नामें, तरी तीं [4]अविद्यामयें [5]दुःखधामें ।
म्हणोनी [6]पुराणप्रसिद्धें विचित्रें [7]जगत्पावनें [8]विष्णुनामें पवित्रें. ॥ १६
[9]महाभारतीं ये रिती धर्मराजाप्रति [10]श्रीपतीदेखतां [11]भीष्म [12]आजा ।
वदे कीं ऋषी वर्णिती जे पुराणीं धरावी तया विष्णुनामीं [13]शिरोणी. ॥ १७
[14]श्लोकार्थ तो कीं तुज [15]भूमिपाळा! सांगेन ते [16]मी [17]हरिनाममाळा ।
जेथें प्रसिद्धें गुणकर्मरूपें नामें पवित्रें महिमाप्रतापें. ॥ १८

---

१. सोन्याच्या प्रतिमेंत. २. सर्व विश्वास व्यापून टाकणाऱ्या रूपानें. ३. शेष नामक सर्पावर (क्षीरसागरांत) शयन करणारा. (विष्णु.) ४. अज्ञानमय. ५. दुःखाचीं गृहें. ६. पुराणग्रंथांत प्रख्यात. ७. सकल जगतास शुद्ध करणारीं. ८. विष्णूचीं (सर्व भूतांस व्यापणारा त्याचीं) नामें. विष्णुशब्दाची व्याख्या:—'यस्माद्विश्वमिदं सर्वं तस्य शक्त्या महात्मनः । तस्मादेवोच्यते विष्णुर्विशेर्धातोः प्रवेशनात् ॥'. ९. व्यासकृत महाभारत नामक ग्रंथांत. (या ग्रंथास 'महाभारत' अशी संज्ञा पडण्याचें कारण दर्शविलें आहे तें असें:—'चत्वारश्चैकतो वेदा भारतं चैतदेकतः । पुरा किल सुरैः सर्वैः समस्य तुलया धृतम् ॥ चतुर्भ्यः सरहस्येभ्यो वेदेभ्योऽप्यधिकं यदा । तदा प्रभृति लोकेऽस्मिन्महाभारतमुच्यते ॥'. पूर्वी सर्व देवांनीं मिळून महाभारत आणि वेदचतुष्टय यांचें वजन केलें, तेव्हां वेदांपेक्षां भारत वजनानें ज्यास्त भरलें, तेव्हांपासून महाभारत हें नाम झालें.) महाभारतांतर्गत 'अनुशासन' नामक पर्वांतील १४९ व्या अध्यायांत 'कोणता जप केल्यानें मनुष्य जन्मसंसारबंधनापासून मुक्त होतो?' असा धर्मराजाचा प्रश्न आहे (श्लो० ३). यावर 'विष्णुसहस्रनामाचा जप केल्यानें मनुष्य सर्व दुःखापासून मुक्त होईल,' असें (श्लो०६–१२) भीष्माचें उत्तर आहे, या कथेस अनुलक्षून हें वर्णन आहे. १०. कृष्णाच्या समक्ष. ११. भीष्म शरपंजरीं पडल्यावर आठ दिवसांनीं कौरवपांडवाचें महायुद्ध समाप्त झालें. त्यांत पांडवांचा विजय झाला, पण सर्व आप्तवर्ग हत झाल्यामुळें धर्मराजाला खेद झाला. त्याचें समाधान कृष्णाच्यानें होईना म्हणून त्यानें युधिष्ठिरास भीष्माकडे नेलें ज्यानें शांतिपर्व आणि अनुशासनपर्व यांच्या द्वारा धर्माचें समाधान केलें. अनुशासनपर्वांतच 'विष्णुसहस्रनाम'संज्ञक स्तोत्र आहे. १२. शांतनुराजाचे भीष्म आणि विचित्रवीर्य हे यथानुक्रम गंगा आणि सत्यवती या दोन भार्यांपासून झालेले पुत्र. विचित्रवीर्याचे धृतराष्ट्र आणि पांडु हे पुत्र, म्हणून दुर्योधन धर्म इत्यादि नातू (पौत्र), तेव्हां भीष्म हा आजा होतो. १३. आवड, गोडी. १४. अनुशासन पर्व, अ० १४९ श्लो० १३ वा, त्याचा अर्थ. १५. हे धर्मराजा. १६. भीष्म. १७. विष्णुसहस्रनामावली.

श्रुतिस्मृतीलागिं महापुराणीं व्यासादिकांच्या वदताति वाणी ।
नामें हरीचीं तुज तींच राया! सांगेन सर्वांसहि उद्धराया. ॥ १९
महात्मयाचीं तुज नामधेयें सांगेन विख्यात मुनींद्रगेयें ।
म्हणोनि भीष्मोदित पद्य जेथें माहात्म्यशब्दें गहनार्थ तेथें. ॥ २०
महात्मा हरी जो अशेषात्मभावें घटादीक तेव्हां तयाचींच नांवें, ।
तरी तारकें तीं जनाला न होतीं जगत्पावनें जीं ऋषी वेद गाती. ॥ २१
म्हणोनि विख्यात मुकुंदनांवें जीं वर्णिती वेद मुनींद्र भावें ।
सांगेन तीं मी तुज भूमिपाळा! प्रसिद्ध जे माधवनाममाळा. ॥ २२
या कारणें जीं हरिनामधेयें, वेदीं पुराणीं मुनिवर्यगेयें, ।
ज्या त्या मिसें उद्धरिती जनाला जाळूनियां पापमहावनाला. ॥ २३
भाषांतरीं कल्पित नाम जेथें श्रद्धानुरूपेंचि फळेल तेथें. ।
प्रताप नैसर्गिक त्यास नाहीं प्रसिद्ध नामीं फळ नेणतांही. ॥ २४
हें सर्व आपण चराचर, देववर्य श्रीकांत कारण सुवर्ण, समस्त कार्य ।
नामीं स्वयें प्रगटतो भलत्याचि ठायीं या भूषणीं कनक केवळ शेषशायी.॥ २५
जगत् कार्य, तो कारण श्रीमुरारी स्वयें तोचि सर्वीं वसे निर्विकारी. ।
स्वरूपें स्फुरद्रूप सर्वत्र आहे सुखीं नाम ज्याचें तयालागिं पाहे. ॥ २६
अलंकार तो मागतां हेम आला, नव्हे हेम हें बोलवेना तयाला. ।
असीं रामकृष्णादि पुत्रादि नामें तरी सर्वही माधवाचींच धामें. ॥ २७
मागे अलंकार सुवर्ण त्याला दे केंवि सोनार सराफ बोला ।
उच्चारिते लौकिक शब्द वाणी ज्याची तया दुर्लभ चक्रपाणी. ॥ २८
न सोनें अलंकारभासास साहे मृषा त्या सुवर्णांत जो भासताहे, ।
असे हेम मिथ्या अलंकाररूपी सुवर्णीं अलंकार नाहीं तथापि. ॥ २९

१. नांवें. २. मुनिश्रेष्ठांनीं गाण्यास योग्य. ३. गूढार्थ. ४. सकल जो आत्मभाव त्यानें, आत्मत्वानें. ५. जन्ममरणापासून तारणारीं. ६. मुकुंदाचीं (विष्णूचीं) नांवें. ७. भक्तीनें. ८. पाप हेंच मोठें अरण्य त्याला. (हा अवधारणापूर्वपदकर्मधारय समास होय.) ९. स्वाभाविक, जातीचा, अंगचा. १०. स्थावरजंगम. ११. सोनें. १२. विकाररहित. (जायते, अस्ति, विवर्धते, विपरिणमते, अपक्षीयते आणि विनश्यते; म्ह० होतो, आहे, वाढतो, वृद्ध होतो, क्षीणत्व पावतो, आणि नष्ट होतो ह्या षड्विकारांनीं जो अबाधित तो.) १३. हा शब्द आरबी आहे. १४. चक्र आहे पाणीच्या ठिकाणीं म्ह० हातीं ज्याच्या तो, विष्णु. (हें व्यधिकरणबहुव्रीहिसमासाचें उदाहरण आहे. या समासाच्या विग्रहांत दोन्ही पदांच्या विभक्ति भिन्न असतात.) १५. खोटा, मिथ्या. १६. अलंकार.

अलंकारनामें नये हेम हाता, अलंकार येतो स्वयें हेम येतां; ।
समस्तांसही साधती विष्णुनामें, न विष्णूस ही बाधती दुःखधामें. ॥ ३०
या कारणें हरि म्हणाल जयासि जेथें, सर्वात्मते[1] करुनि सिद्ध मुकुंद तेथें; ।
बोळावितां निजशिशूसि[2]च त्याचि नांवें विख्यात अन्य नर 'ओ' म्हणतो स्वभावें[3].॥

सुवर्ण म्हणतां जसें कनककुंडलीं[4] तें दिसे,
मुकुंद म्हणतां तसा जनसुतादिकीं तो[5] असे. ।
सुतादिसकळांसही करुनि वर्ततो जो हरी
अशेष जनपातकें करुण तो स्वनामें हरी. ॥ ३२

[6]अजितनाम वदो भलत्या मिसें, करि [7]कृतार्थ [8]अमोघसुधारसें; ।
करुनि शा[9]कहि भक्षिल औषधी, न करि तें[10] गुण हें न घडे कधीं. ॥ ३३
न कळतां पद अग्निवरी पडे, न करि दाह असें न कधीं घडे; ।
[6]अजितनाम वदो भलत्या मिसें, सकळ पातक भस्म करीतसे. ॥ ३४
[11]श्रीविष्णुधर्मी मुनि येचि रीती [12]ओल्यापिती कीं, 'जरि [13]दुष्टचित्तीं ।
तो आठवीतां हरि पाप नाशी; नेणोनिही अग्नि तृणादिराशी.' ॥ ३५
हरी आठवीला जरी दुष्टचित्तीं [15]हरी पापमूळा कुमार्गप्रवृत्ती; ।
कळोनी जरी आठवीजे मुरारी हरी पातकें तो अशीं [16]यॉप्रकारीं. ॥ ३६
न ठावा हरी आणि ठावीं न नांवें, अशाच्या मुखा नाम आलें स्वभावें, ।
अनिच्छेकरूनी मुखा नाम आलें हरी मानितो कीं, 'मला आठवीलें.' ॥ ३७
नसे द्वैतें[17], सर्वांसही स्वात्मभावें हरी आठवे आठवाच्या स्वभावें, ।
तयाचेचि वाचेसही नाम जेव्हां[18] नरें त्या हरी आठवीलाच तेव्हां. ॥ ३८
जरी स्वात्मभाव स्फुरे[19] [20]सर्वभूतीं, स्फुरे तो [21]अहंकाररूपींच चित्तीं ।
अहंशब्द जेथें स्फुरे नाम तेथें स्मृति श्रीहरीची असे सिद्ध जेथें. ॥ ३९
असाही हरी आठवीतील पापी, हरी तो हरी सर्व पापें तथापि; ।

---

१. अशेष आत्मभावेंकरून. २. आपल्या मुलास. ३. साहजिकपणें. ४. सुवर्ण. ५. मुकुंद. ६. परमेश्वराचें नांव. ७. सफल. ८. फलदायक अमृतरसानें. ९. भाजी. १०. ती औषधी. ११. विष्णुधर्म आचरणारे. १२. सांगती. १३. दुष्ट चित्त जे त्यानें. १४. हरण करी. १५. पापापासून जिची उत्पत्ति अशी (कुमार्गप्रवृत्ति). १६. या प्रकारें करून. १७. दुजाभाव, भेदबुद्धि, मी तूं तो असा भेदभाव, जीवात्मा आणि परमात्मा हे भिन्नभिन्न असें मानणें. १८. 'तयांचेचि वाचेस ही नाम आलें, हरी मानितो कीं मला आठवीलें' असाही पाठ आढळतो. १९. स्फुरण पावे, जागृत असे. २०. सकल प्राण्यांच्या ठायीं. २१. 'मी' या रूपानें, 'मी' या भावनेनें.

असा आठवीतां अनिच्छेकरूनि तरी तो करी शुद्ध पापें हरूनी. ॥ ४०
म्हणोनीच कीं अग्निदृष्टांत येथें, न जाणोनिही घालितां भस्म तेथें; ।
न जाणोनिही नाम वाचेसि आलें स्वभावें तरी पाप त्याचें जळालें. ॥ ४१
न जाणे शिशू अग्निची शक्ति कांहीं, जळो तूळ इच्छा अशी ज्यासि नाहीं, ।
तरी घालितां अग्नि कार्पासराशीं जळे, ये रिती नामही पाप नाशी. ॥ ४२
शिशुकरें अनळें कडबा जळे, सहज अंगणिं दीसति तें वळे, ।
परि घरांतिल बीजहि आढळे न जळती कणगींतिल जोंधळे. ॥ ४३
विषयभोगसुखात्मककामना सहज वेष्टुनि जे असते मना, ।
मन कुकर्म तिच्याच बळें करी सकळपातकमूळ अशापरी. ॥ ४४
इडकुनी असि कुत्सित कामना तिजवरी हरिनामहुताशना ।
जरि अमंगळ चित्तहि घालिती, सकळ पातकबीजचि जाळिती. ॥ ४५
'न करूं पातक' निश्चय हा घडे, मन तथापिहि पापपथीं पडे; ।
जरि धरी हरिनामक वित्त हें, अशुभही शुभ होइल चित्त हें. ॥ ४६
जन न इच्छुनि शुद्धि असी जरी न कळतां हरि आठवितां तरी ।
जळति पापकुळें, अनळें जसीं न कळतांहि तृणें जळती, तसीं. ॥ ४७
येथें म्हणाल, 'जळती जरि सर्व पापें, मूळें न कां जळति नाममहाप्रतापें ? ।
नेणोनि नाम म्हणतां दुरितासि जैसें जाळी न कां सकळ पातकमूळ तैसें ?' ४८
धातूवरी अनळ नेणतें बाळ घाली, तो अग्नि धातुमळ तो अतिशीघ्र जाळी; ।
ताम्रादि भस्महि तया अनळेंचि जेव्हां कर्ता अभिज्ञ बहु जाळिल धातु तेव्हां. ॥

न जाणतहि ये मुखा 'हरि' तथापि पापें हरी;
स्मरोनि महिमा स्मरे वदनिं तींचि नामें जरी, ।
प्रवृत्तिविषयीं जरी असति त्यां जनाचीं मनें,
विरक्त करितो हरी स्वगुणनामसंकीर्तनें. ॥ ५०

---

१. कापूस. २. कापसाच्या राशीवर. ३. अग्नीनें. ४. इच्छा. ५. त्या कामनेच्या मुळें. ६. शीघ्रनि. ७. निंद्य, खराब. ८. हरिनाम हाच हुताशन म्ह० अग्नि. (हें अवधारणापूर्वपदकर्मधारय समासानें उदाहरण आहे.) ९. 'चढे' असाही पाठ आहे. १०. भगवन्नामाच्या मोठ्या प्रतापानें. (अग्नीनें.) ११. पातकास. १२. न जाणतां. १३. तांबें इत्यादि. १४. ज्ञाता. १५. आठवोन. 'कळोनि' असाही पाठ आहे. १६. संसाराविषयीं. १७. हरि (विष्णु) आपल्या गुणांच्या आणि नांवांच्या संकीर्तनानें लोकांची मनें संसाराविषयीं लोलुप असलीं तरी त्यांच्या ठायीं विरक्ति (वैराग्य) उत्पन्न करतो.

श्रीमद्भागवतीं अजामिळकथा व्यासें नृपातें शुकें
नामाचा अमित प्रताप वदतां हें वर्णिलें कौतुकें; ।
तेथें निर्णय विष्णुदूत वदती तो वामनाच्या मुखें
येथें 'नामसुधें'त वर्णिल हरी श्रोत्यांस जेथें सुखें. ॥ ९१
अध्याय तीन ईतिहास महापुराणीं, टीका तदर्थ रचिली क्षितिलोकवाणी, ।
अध्याय एथ तितुकेच करी मुरारी, तीहींसही चरण सुंदर चार चारी. ॥ ९२
अध्याय तो प्रथम 'नामसुधें'त तेथें, त्याहीमधें चरण हा पहिलाचि एथें, ।
संपूर्ण अर्पुनि मुकुंदपदारविंदीं सर्वात्मतेकरुनि वामन त्यास वंदी. ॥ ९३

चरण दुसरा. ॥

(श्लोक.)

षष्ठस्कंधमुखीं अजामिळकथा, संक्षेप टीका तिची
श्रीगोविंद करील वामनमुखें छायात्मविश्रांतिची; ।

१. श्रीमद्भागवत, स्कंध ६ अध्याय १, २, ३, यांत. २. कान्यकुब्ज देशांतील ब्राह्मणाची (अजामिळाची) गोष्ट. ३. परीक्षित् राजातें. ४. प्राचीनकालिक वृत्तांची कथा. ('धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशसमन्वितम् । पूर्ववृत्तं कथायुक्तमितिहासं प्रचक्षते ॥;' म्ह० धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांसंबंधें ज्यांत उपदेश आहे असें पूर्वी घडलेल्या गोष्टींचें जें वर्णन, त्याला इतिहास म्हणतात.) ५. श्रीमद्भागवत हा ग्रंथ अठरा महापुराणांपैकीं आहे. (अष्टादश पुराणांचीं नांवें:— 'ब्राह्मं पाद्मं वैष्णवं च शैवं भागवतं तथा । तथान्यन्नारदीयं च मार्कंडेयं च सप्तमम् ॥ आग्नेयमष्टमं प्रोक्तं भविष्यन्नवमं तथा । दशमं ब्रह्मवैवर्तं लिंगमेकादशं तथा ॥ वाराहं द्वादशं प्रोक्तं स्कांदं चात्र त्रयोदशम् । चतुर्दशं वामनं च कौर्मं पंचदशं तथा ॥ मात्स्यं च गारुडं चैव ब्रह्मांडाष्टादशं तथा॥.' उपपुराणेंही अठराच आहेत. पुराणाचीं लक्षणें पांच आहेत:—'सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वंतराणि च । वंश्यानुचरितं चेति पुराणं पंचलक्षणम् ॥;' याचा भावार्थ, (१) सर्ग म्हणजे प्रकृति, महत्तत्त्व, अहंकार इत्यादि यथानुक्रम कारणांची उत्पत्ति; (२) प्रतिसर्ग म्हणजे देव, मनुष्य, पशु इत्यादिकांची उत्पत्ति; (३) चंद्रवंश, सूर्यवंश इत्यादिकांचें वर्णन; (४) चवदा मन्वंतरें; (५) सूर्यचंद्रवंशांतील श्रेष्ठ राजांचें चरित्रकथन; या पांच लक्षणांनीं युक्त जो काव्यग्रंथ त्याला पुराण म्हणतात.) ६. लोकभाषा, प्राकृतभाषा. ७. मूळांत तीन अध्याय आहेत म्हणून या 'नामसुधा'काव्यांतही तीनच अध्याय आहेत, आणि प्रत्येक अध्यायाचे चार पाद आहेत. ८. विष्णूच्या पदकमळीं. ९. सर्वभावानें, सकल मनानें. १०. भागवताच्या ६ व्या स्कंधाच्या आरंभीं. ११. अजामिळ हा कनोज (कान्यकुब्ज) देशांतील एका विद्वान् अग्निहोत्री ब्राह्मणाचा मुलगा. याला एका शूद्रस्त्रीलावण्याचा मोह पडला, तिला ही याला पाहून मोह उत्पन्न झाला. मग अजामिळानें स्वकुटुंबपरित्याग करून तिचा स्वीकार करून तिच्या संगतीं विषयसेवनांत बहुतेक आयुष्य घालविलें. तिच्यापासून त्यास दहा मुलें झालीं. त्यांत नारायण या नांवाचा सर्वांहून धाकटा आवडता मुलगा होता. त्यास पुत्रस्नेहानें सहज 'नारायणा! ये,' अशी हांक मारिली. अंतसमयीं पुत्राच्या निमित्त ईश्वराचें नांव मुखांतून आलें म्हणून विष्णुदूत यास वैकुंठास नेण्यासाठीं आले. तों यमदूत अगोदरच हा मोठा पातकी असें समजून यास घेऊन चालले होते, पण विष्णुदूतांनीं त्यास सोडविलें. नंतर यालाही पश्चात्ताप झाला. तेव्हां यानें शूद्रस्त्रीचा त्याग करून अवशिष्ट आयुष्य गंगातीरीं भगवच्चिंतनांत घालविलें. अंतीं त्याला उत्तमलोकप्राप्ति झाली.

श्रोत्यांच्या श्रवणोदरांत अलसें त्रासें समासें करी
व्याख्या 'नामसुधा' हरी करितसे, जे पापतापा हरी. ॥ १
परिसुनि शुकवाक्यें सर्व भूगोळ भूपें
नरककथनकाळीं तेथ ऐकोनि पापें, ।
जननरकनिपातें फार संतप्त झाला;
जगदघहर रायें श्रीशुका प्रश्न केला. ॥ २
शुकाच्या मुखें पंचमस्कंध कानीं परीक्षिन्नृपें आदरें आयकोनी ।
चुके यातना केंवि हा प्रश्न केला, पुढें षष्ट हा तेथुनि ग्रंथ झाला. ॥ ३
जें पंचमीं हरिकथामृत दिव्य प्याला, उद्धाररूप अवघा अनुवाद केला; ।
यानंतरें पुसतसे परिहार पापा, जो चूकवी नरकनामकअग्नितापा. ॥ ४
नृप म्हणे, 'कथिल्या तुम्हि दुर्गती, परि वदा चुकती कवणे रिती? ।
पुरुष आचरल्या कवणे स्थिती गमन तो न करी नरकाप्रती?' ॥ ५
'प्रायश्चित्त अघानुरूप करितां हीं नासती पातकें,
ऐशा दुर्गतिनिर्गती कथियल्या रायासि आधीं शुकें. ।
प्रायश्चित्त समस्त कर्ममय, हें रायासि वाटे वृथा,
बोले, 'कीं गजशौच हें सकळही याची वृथा कां कथा? ॥ ६
हस्तीतें धुतलें, जळीं वसविलें, मालिन्यही नाशिलें,
तेणें तें पहिलें स्वकर्म वहिलें तीरींच आरंभिलें, ।

---

१. संक्षेपानें. २. टीका. ३. पातक आणि त्रिविध ताप यांतें. ४. भागवत, स्कंध ५ अ० १६ पहा. ५. भागवत, स्कंध ५ अ० २१ यांत नरकस्थितीचें वर्णन आहे. ६. जगाचें पाप घालविणारा. ७. परीक्षित् राजानें. परीक्षित् हा अभिमन्यूचा उत्तरेपासून झालेला पुत्र. या मुलाचें नांव विष्णुरात असें होतें, परंतु 'परीक्षित्' हेंच नांव लोकप्रसिद्ध झालें. याला उदरांत असतां अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रापासून श्रीकृष्णानें सोडविलें होतें, तेव्हां तो बाहेर आल्याबरोबर गर्भांत असतां जो पुरुष दिसला होता तो तर हा नसेलना अशा बुद्धीनें ज्याच्या त्याच्या मुखासभोंवतीं (परि) पाही (ईक्षते), म्हणून परीक्षित् हें नांव त्यास पडलें. (भागवत, स्कंध १ अ० १२ श्लो० ३०.) ८. नरकयातना. ९. सहावा स्कंध. १०. पांचव्या स्कंधात. ११. पुनः पठण. १२. निरसन. १३. नरक. ('स्यान्नारकस्तु नरको निरयो दुर्गतिः स्त्रियाम्' अमरकोष, कांड १ पातालभोगिवर्ग.) १४. स्कंध ६ अ० १ श्लोक ६ याचा हा अनुवाद आहे. १५. केलेल्या पापांचा परिहार व्हावा म्हणून धर्मशास्त्रांत सांगितलेलें उपवासादि अनेकविध कर्म. १६. पातकानुरूप, थोड्या पापाला थोडें मोठ्याला मोठें. पापाच्या गुरुलाघवास अनुसरून जें योग्य तें. १७. नरकांत न पडण्याचे उपाय. १८. कुंजरशौच, हत्तीचा शुद्धकरणा. १९. मलिनत्व. २०. तत्काळ.

शुंडाग्रें[1] धरिलें धुळीस, भरिलें सर्वांगही आपुलें,
प्रायश्चित्त दिलें तथापि न भलें ज्याचें मन क्षोभलें[2]. ॥ ७
प्रायश्चित्त जना कृपामृतघना[3]! तें सांग कीं या मना
पापाच्या दहनावरील[4] पवना[5] वारी हरी[6] कामना, ।
जो पापी घटना प्रवृत्तिरचना दुर्वार[7] ते यातना
प्रायश्चित्त पुन्हा स्मरोनि वचना बोलें जगत्पावना[8]!' ॥ ८
करी असा प्रश्न नरेंद्र जेव्हां रहस्य[9] सांगे मुनिवर्य[10] तेव्हां. ।
म्हणे[11], 'खरें होतिल शुद्ध पापी, न पापबीजें[12] जळती तथापि. ॥ ९
अज्ञा[13] जनाला अधिकार जेथें, न पापबीजें जळतील तेथें; ।
यों[14] कर्मशुद्धी गजशौचरूपा, हें ही खरें तूं वदलासि भूपा! ॥ १०
मोठें[15] प्रायश्चित्त तें आत्मविद्या[16], नाशी जे कां पापमूला[17] अविद्या; ।
विद्या[18] नाशी पातकें आणि पुण्यें नानाजन्मीं[19] संचितें जीं अगण्यें. ॥ ११
हें तों खरें, परि न जोंवरि चित्तशुद्धी, तों प्राणियांसि न घडे निजबोधसिद्धी[20].[21] ।
ते शुद्धि तों भगवदर्पणकर्मयोगें[22], पापें स्वयें जळति सर्वहि त्या प्रसंगें. ॥ १२
कर्में दासपणें[23] करूनि निपुणें[24] नारायणीं[25] अर्पणें,
पापातें क्षपणें[26], रमापतिगुणें[27] प्रेमामृता सेवणें, ।

---

१. सोंडेच्या अग्रानें. २. विषयासक्त झालें. ३. कृपारूप अमृताच्या मेघा (शुका). ४. अग्नि. ५. वायु. ६. हरण करी. ७. दुर्निवार, अवश्यंभावी, टाळण्यास अशक्य. ८. जगतास शुद्ध करणाऱ्या (शुका.) ९. गुप्त गोष्ट, तत्त्व. १०. श्रीबादरायणी. ११. श्लोक ११ पहा. १२. प्रायश्चित्तानें पापी जन पापमुक्त होतील, परंतु त्या योगें पापाचा समूळ नाश व्हावयाचा नाहीं, पापाचें बीज कायम राहील. १३. अविद्वान् कर्माधिकारी असल्यामुळें अविद्येचा नाश न होऊन पापाचें बीज कायम राहतें. १४. पापाचें बीज नष्ट न होतां केवळ बाह्यकर्मद्वारा मिळालेली शुद्धि ही हत्तीच्या क्षणिक स्वच्छतेसारखी आहे. १५. मुख्य. १६. आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान. १७. पाप आहे मूळ (उत्पत्तिस्थान) जिचें अशी (अविद्या). १८. आत्मविद्येनें (ब्रह्मज्ञानानें) पापपुण्याचा भेद नष्ट होतो, हा भेदाभेद राहत नाहीं. १९. अनेक जन्मांत सांचलेलीं, जमलेलीं. २०. आत्मज्ञानप्राप्ति. २१. 'मिळे' ह्या अध्याहृत क्रियापदाचा कर्ता. २२. भगवंताला सर्व कर्म अर्पण केल्याच्या योगानें. (भगवद्गीता, अध्याय ९ श्लो० २७— 'यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्। यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥.' तात्पर्य, हे अर्जुना, तूं जें कांहीं करितोस, जें खातोस, जें हवन करतोस, जें दान करतोस, जें तप करतोस, तें सर्व मला अर्पण करावें अशा बुद्धीनें करीत जा.) २३. सेवकभावानें. २४. कुशलतेनें. २५. कृष्णार्पण करणें. २६. नाश करणें. २७. लक्ष्मीच्या पतीच्या (विष्णूच्या) गुणस्मरणानें.

सत्संगीं वसणें, स्मृतींत असणें, एकांतिचें बैसणें,
सर्वा हें करणें, भवाब्धि तरणें, दुर्वासना मारणें. ॥ १३

ऐसी केवळ भक्तिमात्र करितां कैवल्यही पावती
भक्तीवांचुनि अन्यथा न चुकती तेव्हां तरी दुर्गती; ।
मद्याच्या कलशासि शुद्ध करितां व्यर्थेंचि तीर्थें जसीं,
श्रीगोविंदपदारविंदविमुखां कर्मैं समस्तें तसीं. ॥ १४

कृष्णार्पणें करिति जे निज सर्व कर्मे, सिद्धी अनेक घडती हरिदास्यधर्में, ।
पापें समस्त जळती, उठती विरक्ती, वाढे जसी जसि मुकुंदपदाब्जभक्ती. ॥ १५

हरिभजनिं असे तो शीघ्र कैवल्य लाधे,
नरक चुकति हें तों थोडियामाजि साधे.' ।
म्हणउनि शुक बोले श्लोक ते व्यासवाणी
सुजन धरुत चित्तीं हेचि गीर्वाणवाणी. ॥ १६

'आयासाविण ही कथा परिसतां गोडी हरीच्या गुणीं
ज्या चित्ता उपजे, निवे सहज तें त्याच्या पदीं तत्क्षणीं; ।
ऐसें अर्पिति कर्म जें सहजही जे एकदां त्यां मना
ते स्वप्नीं नयनीं न देखति यमा, कैंच्या तयां यातना ? ॥ १७

इतुकि ही हरिभक्ति कसी जना? म्हणसि साध्य जडा मलिना मना; ।
तरि नृपा! हरिनामसुधागुणें सकळ साधनमात्र गमे उणें. ॥ १८

नकळतां हरिनामसुधा मुखीं जरि पडे, जन होय तरी सुखी. ।
जरि महत्व कळोनिहि वैखरी हरि म्हणे, मग काय तया उरी? ॥ १९

सुतमिषें हरिनाम अजामिळें वदनिं आणुनि उद्धरिलीं कुळें.' ।
शुक म्हणे, 'इतिहासहि तो नृपा! तुज वदेन, करूनि महाकृपा.' ॥२०

---

१. संसाररूप सागर. २. दुष्ट वासनांचा उच्छेद करणें. ३. मोक्ष. ४. ज्याप्रमाणें पवित्र नद्या (तीर्थें) सुराकुंभास शुद्ध करूं शकत नाहींत, त्याप्रमाणें (भक्तिविना) कितीही प्रायश्चित्तें घेतलीं तरी तशीं कर्में जो नारायणपराङ्मुख आहे त्याला शुद्ध करूं शकत नाहींत, (श्लोक १८ पहा). ५. जो श्रीभगवच्चरणकमललीन नाहीं त्याला. ६. तशीं व्यर्थ आहेत, तीं कर्में शुद्धिदायक नाहींत. ७. वैराग्य, विषयसुखविमुखता. ८. कृष्णपदारविंदनिष्ठा. ९. 'करि भजन असे जो शीघ्र कैवल्य लाधे' असाही पाठ आढळतो. १०. व्यास जो श्लोक वर्णन करी तो शुक सांगे. ११. हरीला. १२. श्लोक १९ पहा. १३. वाणी. १४. अवशिष्ट, बाकी. १५. श्लोक २० पहा.

चरण तिसरा.

(श्लोक.)

शुक म्हणे मुनि, 'आयिक राजया ! द्विज अजामिळनाम कनोजया ।
निज कनोजपुरीं वृषलीपती परम पातकि पातकसंगती. ॥ १
दासीचा पति नष्ट दुष्ट अवघें ब्राह्मण्यही दाकिलें,
अठ्यांशीं वरुषें वया सकळही त्यानें तिसीं घातलें; ।
तीच्या पोषणपालनार्थ सकळें तो आचरे पातकें,
तीच्या गर्भदरींत जो उपजतां मानी मनीं कौतुकें. ॥ २
श्रुति वदति जयाचा गर्भ पोटांत जीच्या
पुरुषचि सुतरूपें गर्भवासांत तीच्या; ।
कळत कळत जों जों पुत्र दासीस होती,
द्विज सुख बहु तों तों मूढ मानी स्वचित्तीं. ॥ ३
जरठ तो वृषळीउदरीं दहा सुतमिषें उपजोनि सुखी महा; ।
सुत तिचे अति सादर खेळवी, विविध लाड रसें करि, ओंळवी. ॥ ४
नारायणाख्य सुत त्यांत कनिष्ट झाला, तो आवडे अवघियांहुनि फार त्याला. ।
वृद्धासि याउपरि होइल बाळ कैचें, भावें अशा करित लालन फार त्याचें.॥ ५
जरठ खेळवुनी निज बाळ तो सफळ मानि अजामिळ काळ तो. ।
परिसतां वचनें मृदु बोबडीं सुखमृगांबुमधें मन दे बुडी. ॥ ६
असा खेळवी पातकाच्या फळातें, करी धन्य तन्नामधेयें कुळातें; ।
तयाच्या मिसें नाम नारायणाचें हरी सर्वही पाप त्या ब्राह्मणाचें. ॥ ७

---

१. ब्राह्मण. ('द्विज'शब्दाचे अनेक अर्थ आहेत:–'द्विजः स्याद्ब्राह्मणक्षत्रवैश्यदंतांडजेषु ना' (मेदिनी); म्ह० ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, दांत आणि पक्षी ह्या सर्वांस द्विवार जन्म आहे. 'जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते,' अथवा 'मातुर्यदग्रे जायंते द्वितीयं मौंजिबंधनात् । ब्राह्मणक्षत्रियविशस्तस्मादेते द्विजाः स्मृताः ॥;' इ० ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांचें मातेपासून जन्म होऊन पुनः मुंज झाल्यानें दुसरें जन्म होतें म्हणून तें द्विज होतें. दांत, पक्षी, यांचें द्विवार जन्म स्पष्टच आहे.) २. कान्यकुब्ज नगर प्राचीनकाळीं फार मख्यात होतें. त्याचेंच 'कनोज' असें अर्वाचीन नांव झालें. ३. शूद्रस्त्रीपति. ४. ज्याचा सदाचार नष्ट असा. ५. ब्राह्मणत्वही. ६. 'असें वय अहो त्यानें तिशीं घातलें' असाही पाठ आहे. ७. वेद. 'पतिर्जायां प्रविशति गर्भो भूत्वा स्वमातरम् । तस्यां पुनर्नवो भूत्वा दशमे मासि जायते ॥' या श्रुतीस अनुलक्षून हें लिहिलें आहे. ८. हा सामासिक शब्द असून येथें संधि केला नाहीं. ९. प्रेमानें हांक मारी. १०. लाड करणें, लाडी गोडी लावून पोसणें. ११. मृगरूप मृगजळामध्यें. १२. कृतकृत्य, प्रख्यात, यशस्वी. १३. त्या मुलाच्या नांवानें. १४. हरण करी.

'ये ये नारायणा ! रे ! वद वद वचनें गोड नारायणा ! रे !
जेवीं नारायणा ! रे ! क्षुधित बहुत तूं आजि नारायणा ! रे ! ।
कोठें नारायणा ! रे ! त्यजुनि मज नको जावुं नारायणा ! रे !
मातें नारायणा ! रे ! तुजविण न गमे वेळ नारायणा ! रे ! ॥ ८
उष्णांत नारायण खेळताहे, गृहींच नारायण तो न राहे. ।
नारायणा शीतळ पाज पाणी' नारायणीं रंगलि विप्रवाणी. ॥ ९
'नारायणा जें प्रिय खाद्य व्हावें, नारायणा तें अति शीघ्र द्यावें. ।
नारायणा मी करुं काय वाणी ?' नारायणीं रंगलि विप्रवाणी. ॥ १०
'नारायणावांचुनि मी न जेवीं, नारायणावीण न नीरें सेवीं. ।
नारायणा धुंडुनि शीघ्र आणी' नारायणीं रंगलि विप्रवाणी. ॥ ११
'नारायणास झणि होइल दुष्टदृष्टी नारायणास झणि कीटकदंशदृष्टी, ।
नारायणास झणि रागिजतील कोणी' नारायणस्मरणिं रंगलि विप्रवाणी.॥ १२
'नारायणासम शिशु त्रिजगांत नाहीं, नारायणीं न अणुमात्रहि दोष कांहीं. ।
नारायण प्रियतमे ! गुणरत्नखाणी' नारायणस्मरणिं रंगलि विप्रवाणी. ॥ १३
असा सर्वदा छंद नारायणाचा, प्रियेसीं सदा वाद त्याच्या गुणांचा. ।
मनीं स्वप्निंही लागला छंद ऐसा, जसा जागरीं वर्तवी स्वप्निं तैसा. ॥ १४
पापद्रुमीं नवल पुण्य फळासि आलें, नारायणा म्हणुनि तें सुतनाम झालें. ।
नारायणा म्हणुनि यद्यपि पुत्र पाहे, नामप्रताप उगला न तथापि राहे. ॥ १५
लक्ष्मीकांतकृपासुधाघन जगीं सर्वांवरी वर्षतो,
जे कां पातकझोंपडींत दडती त्यांतेंचि न स्पर्शतो. ।
विप्राची अघझोंपडी न कळतां नामाग्निनें जाळिली,
तेव्हां कृष्णकृपांबुवृष्टि सहसा माथां पडों लागली. ॥ १६
नामाग्निनें अघकुळें जळतां अशेषें, संतोषला हरि तयावरि नामघोषें. ।
'द्यावा तयासि निज केवळ भक्तिधंदा' ऐसी अहो उपजली करुणा मुकुंदा.॥ १७
टाकूनि तो वृषलिसंगति, भक्तियोगीं लागोनि, अक्षयनिजात्मसुखासि भोगी. ।
ऐसी कृपा उपजली करुणालयाला निर्माण येविषयीं एक उपाय केला. ॥ १८

---

१. 'क्षुधित असशि तूं' असाही पाठ आहे. २. मीं काय करुं तें सांग. ३. उदक. ४. गुंग झाली. ५. न जाणो, कदाचित्. ६. कोण्या दुष्टाची दृष्टिबाधा. ७. किडा चावल्याची बाधा. ८. रागें भरतील. ९. जागृतींत. १०. पापवृक्षाच्या ठायीं. ११. भगवंताच्या नांवाचा पराक्रम. १२. उगाच, निमुटपणें. १३. भगवंताच्या कृपारूप सुधेचे (अमृताचे) घन (मेघ). १४. हा समास फारसा समजत नाहींत. १५. लपून राहतात. १६. हा अग्नीचा दृष्टांत या काव्यांत वारंवार योजिला आहे. १७. सकळ. १८. येथें 'वृषली' शब्दांत वृत्तसुखार्थ 'लि' असें ह्रस्व अक्षर योजिलें आहे.

यमासही मोहन वासुदेवें केलें असें कीं, यमधर्मदेवें ।
असोनि आयुष्यहि त्या द्विजाला, निष्पापही तो द्विज आणवीला. ॥ १९
आयुष्य शेष म्हणऊनिच त्या द्विजासीं नेलें न विष्णुसदनाप्रति विष्णुदासीं. ।
आयुष्य शेष असतां यमधर्मराया तो मृत्युकाळ गमला, तरि विष्णुमाया. ॥ २०
अंतीं कथा शुकहि वर्णिल याच रीती, कीं वांचला तदुपरांतिक तो द्विजाती. ।
आयुष्यही सरलिया जरि विप्र वांचे प्रारब्धनेम लटिके मग या जिवांचे. ॥ २१
आतां म्हणाल, 'सुतनाममिषेंच पापें गेलीं जळोनि हरिनाममहाप्रतापें, ।
त्याला न भक्ति घडली म्हणऊनि देवें भक्तीनिमित्त दिधलें वय वासुदेवें. २२
जे जे जीवन्मुक्त ते भक्त मोठे, प्रारब्धाचे भोगिती भोग खोटे, ।
ते प्रारब्धें सर्वथा जो न मोडी येथें कैसा आपुला नेम सोडी ? ॥ २३
दिल्हें त्यासि आयुष्य हें कां म्हणावें ? यमा मोहिलें हेंचि अंगीकरावें; ।
पुढें शेष आयुष्य तें भक्तिभावें सरावें तदंतीं स्वलोकासि न्यावें.' ॥ २४
असा माधवें सत्य संकल्प केला, मनीं घातला मोह तेव्हां यमाला. ।
द्विजाचें किती एक आयुष्य आहे कसा आणवूं ? मोहला हें न पाहे. ॥ २५
सुतमिषें हरिनाम मुखीं सदा जळति त्याकरितां अघआपदा, ।
परि अगोचर हा महिमा यमा, म्हणुनि आणवि विप्रकुळाधमा. ॥ २६
द्विजाचे दुरन्याय ते आठवीले, तिघे दूत आणावया पाठवीले, ।
उभे मस्तकीं तांबडे केश भारी, मुखें वांकुडीं अंग नानाविकारी. ॥ २७
काळीं मुखें मारिति चंड हाका, 'बांधा धरा हा नरकांत टाका.' ।
धरूनि फांसे विकराळ हातीं दंष्ट्रा कराळा वदनीं न माती. ॥ २८
बहु त्रासला विप्र देखोनि त्यांला, म्हणे, 'त्रास होईल नारायणाला; ।
मुलांमाजि तो गुंतला दूरि खेळीं.' द्विजें त्यासि प्राचारिलें अंतकाळीं. ॥ २९
अकस्मात 'नारायणा ! ये' म्हणोनी म्हणे विप्र उच्चस्वरें ओळऊनी. ।

---

१. यमधर्माला मोहित केलें. २. श्रीकृष्णानें. ३. त्यानंतर. ४. ब्राह्मण. ५. मुलाचें नांव 'नारायण' या निमित्तानें. ६. जननमरणबंधापासून मुक्त होण्याचें साधन जें वेदांतज्ञान (ब्रह्मज्ञान) तें ज्यांला प्राप्त झालें असे ब्रह्मज्ञानी. ७. हा सामासिक शब्द असून येथें संधि केला नाहीं. ८. गुप्त, इंद्रियांस अग्राह्य, अज्ञेय. ९. द्विजवंशांतील नीच. १०. दुष्ट अनीतिकारक कर्मे. ११. श्लोक २८. पहा १२. पाश. १३. दारुण, भयंकर. १४. दाढा. १५. प्रेमानें हाक मारून.

यमाचा पडे लिंगदेहास फांसा, उठे विप्रवाणीमधें घोष ऐसा. ॥ ३०
निघे स्थूळदेहांतुनी लिंग[3] जेव्हां सुताच्या मिसें नामवाचेसि तेव्हां, ।
उडी त्यामधें घातली विष्णुदूतीं गदा शंख पंकेरुहें चक्र हातीं. ॥ ३१
ते तोडिले पाश तिहीं यमाचे जे किंकर श्रीपुरुषोत्तमाचे, ।
दटाविले ते यमदूत दापें त्या ब्राह्मणा सोडविलें प्रतापें. ॥ ३२
टकमकां यमदूत तयांकडे चकित होवुनि पाहति बापुडे, ।
धरुनि धैर्य तथापिहि त्यांप्रती समयिं त्या यमकिंकर बोलती. ॥ ३३

चरण चवथा.

(श्लोक.)

[6]तीथे तयांसि म्हणती, [7]यमशासनाला उलंघणार तुम्हि कोठिल कोण? बोला. ।
सांगा तुम्ही अमर, कीं उपदेव, किंवा गंधर्व[10], सिद्ध[11], करणार सुरेंद्रसेवा[12]?॥ १
कोठें हो असतां? अपूर्व दिसतां, [13]हेमांबरें नेसतां,
अम्लाना कमळांचिया [15]अलिकुळीं माळा गळां घालितां, ।
चौघांही भुज चारि, पीनें[16] सरळे श्रीचंदनें [17]चर्चिले
चौघे रत्नहिरण्यभूषणवरीं सर्वत्रही अर्चिले. ॥ २
शस्त्रास्त्रें धरितां समान, तरुणे चौघे तुम्ही, सांवळे,
डोळे भाळ विशाळ पुष्ट बरवे, रूपें बळें आगळे ।

---

१. स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण असें देहचतुष्टय आहे. पृथ्वी, आप्, तेज, वायु आणि आकाश या पंचभूतांचे देह बनले आहेत. प्रत्येक भूताच्या पांच पांच भागांनीं म्हणजे एकंदर पंचवीस भागांनीं लिंगदेह (सूक्ष्मदेह) झालेला आहे. जेव्हां प्रेतभाव होतो तेव्हां हा लिंगदेह आत्म्याबरोबर जातो. सूक्ष्मदेहालाच लिंगदेह असें म्हणतात. २. प्रत्येक भूताचे पांच भाग, अशा पांच भूतांचे पंचवीस भागांचा स्थूलदेह बनला आहे या स्थूलदेहालाच जडदेह असें म्हणतात. ३. लिंगदेह; स्थूलदेहाचा लय झा[illegible]वर लिंगदेह अहंकाररूपानें उरणारा आहे. ४. पद्म. ५. विष्णूचे. ६. यमाचे तिघे दूत. ७. आज्ञेला. ८. देव. ९. मुख्य देवांहून इतर. १०. यक्ष, उपदेव. ११. देवविशेष. यांस अणिमादि आठ सिद्धि प्राप्त झालेल्या असतात. यांचे दोन प्रकार आहेत:— सर्वांगसिद्ध आणि एकांगसिद्ध. यांचें वसतिस्थान आकाश. (अणिमा महिमा चैव लघिमा गरिमा तथा । ईशित्वं च वशित्वं च प्राकाम्यं प्राप्तिरेव च ॥' ह्या आठ सिद्धि आहेत. 'अणिमा लघिमा प्राप्तिः प्राकाम्यं महिमा तथा । ईशिता वशिता चैव तथा कामावशायिता॥' अशींही यांचीं नांवें आहेत.) १२. इंद्राची चाकरी. १३. सुवर्णासारखीं पीत (पिवळीं) वस्त्रें. १४. न कोमेजलेली. १५. भ्रमरसमूहयुक्त. १६. पुष्ट. १७. चर्चिले.

तेजें आपुलिया दिगंततमही दूरुनि संहारितां,
दूतांला यमधर्मराजविभुच्या आम्हांसि कां वारितां?' ॥ ३
शुक म्हणे, 'यमकिंकर ये रिती वदति विष्णुनिदेशकरांप्रति ।
परिसतां हरिपार्श्वग हांसिले, घनरवें मग गर्जत बोलिले. ॥ ४
'धर्मदूत तरि हे म्हणवीती, पापहीन नरकाप्रति नेती.' ।
भाव हा धरुनि आंत विनोदें पूसती हरिसभासद मोदें. ॥ ५
'धर्मराजविभुचे तुम्हि जेव्हां, धर्म जाणत असां तुम्हि तेव्हां,।
पूसतों म्हणुनि एक तुम्हाला धर्मतत्त्व, तुम्हि सत्वर बोला. ॥ ६
कर्तें सर्वहि दंडयोग्य अथवा जीवांमध्यें नेमिले
कीं तें पाप असो नसो परि तुम्ही दंडार्ह ते लेखिले.' ।
ऐसे तत्परिहास दास हरिचे हांसोनियां बोलिले,
कीं, 'निष्पातक जो तयासि नरका हे न्यावया पातले.' ॥ ७
विनोदें असें दूत सर्वोत्तमाचे पुसों लागले, दूत त्यांतें यमाचे ।
प्रवृत्तिप्रवाहें यथाशास्त्ररीती वरीं उत्तरें मृत्युचे भृत्य देती. ॥ ८
तीं वर्णिलीं मुनिवरें निवडोनि जेथें संक्षेप त्यामधुनही वदिजेल येथें[12]. ।
वैकुंठ[13]नाममहिमा श्रवणानिमित्तें उत्कंठितें तदमृतार्थ तृषार्तचित्तें. ॥ ९
म्हणति 'विहितें[14] वेदीं 'धर्म' त्याला म्हणावें,
स्मृति[15]निगमनिषिद्धें ते 'अधर्म' स्वभावें. ।
शुभ अशुभहि कर्में जीं करी जीव जेथें
तैंतु हृदयिं पहाती देव सूर्यादि[17] तेथें. ॥ १०
देवांत साक्षि यमधर्महि त्यांत आहे, पाप्यास तों तदनुरूप[18]चि दंड पाहे. ।
जीवांसि पातकफळें सकळांसि देतो, धाडूनि दूत निरया[19]प्रति त्यांस नेतो. ॥ ११

---

१. अध्याय १ श्लो० ३१-३६ पहा. २. विष्णूचे दूत. ३. हरीच्या जवळ रहाणारे सेवक, विष्णुदूत. ४. मेघध्वनीनें. ५. यमधर्माचे दूत. ६. आनंदानें. ७. धर्माचें स्वरूप, लक्षण, प्रमाण इत्यादि. ८. त्यांची (यमदूतांची) थट्टा. ९. लोकव्यवहार. १०. दास. ११. शुकें. १२. या 'नामसुधा' काव्यांत. १३. विष्णुनामगौरव. १४. स्थापित, प्रणीत. १५. मनुस्मृति इत्यादि ग्रंथांनीं आणि वेदांनीं (निगम) निषिद्ध, धर्माचा विपर्यय हा अधर्म. १६. अल्प. १७. सूर्य, चंद्र, वायु, अग्नि, आकाश, भूमि, उदक, हृदय, मन, दिवस, रात्रि, दोन संध्याकाळ आणि यमधर्म हीं सर्व मनुष्यांचें वृत्त जाणतात, हीं मनुष्यकृतीस साक्षी असतात. १८. पापास योग्य असा, पापकर्मानुरूप. १९. नरकाप्रति.

प्रस्तूत हा द्विज अजामिळ शुद्ध पूर्वी, संपन्न सर्व सुगुणीं अतिमान्य सर्वीं, ।
आणावयास समिधा कुश पुष्प पानें रानासि विप्रवर पाठविला पित्यानें. ॥ १२
परततां समिधा कुश घेवुनी, तरुण सुंदर देखिलि कामिनी, ।
पुरुष एक तिसीं रत देखिला, पिवुनि मद्य मदें बहु मातला. ॥ १३
उपवनिं नरनारीद्वंद्व उन्मत्त भारी
कुसुमशरविहारी, युग्म दिग्वस्त्रधारी ।
स्मर हृदयविदारी, देखतां या प्रकारीं,
द्विज जरि बहु वारी, नावरे चित्त हारी. ॥ १४
मनसिज द्विजमानस या मिसें खवळुनी करि तीकारितां पिसें ।
बहुहि आवरितां मन नावरे, हृदयिं तो मकरध्वज वावरे. ॥ १५
मग तिच्या सदनाप्रति जावुनी, धन तिला तदपेक्षित देवुनी, ।
रतिरसें वरि लंपट होवुनी, विचळला अधरासव सेवुनी. ॥ १६
पित्यानें बहू आर्जिलें वित्त होतें, दिल्हें द्रव्य तें या द्विजें सर्व तीतें; ।
महा मोहला नीचकांतांगसंगें, स्वधर्मासही टाकिलें त्या प्रसंगें. ॥ १७
तिच्या स्नेहपाशें जसा बद्ध झाला, न ते आवडे धर्मपत्नी द्विजाला. ।
तिला टाकिलें, टाकिलीं मायबापें; तिसीं आचरूं लागला सर्वपापें. ॥ १८
तिच्या पोषणातोषणाच्या निमित्तें बहू मेळवूं लागला पापवित्तें. ।
तिला ध्यातसे सर्वदा दुष्ट चित्तें, असा कंठिला काळ येणें प्रमत्तें. ॥ १९
या कारणें द्विजकुळाधम शीघ्र तेथें नेवूं, असे धरुनि दंड कृतांत जेथें. ।
भोगील दुष्कृतफळा नरकासि जेव्हां, हे पापभोग अवघे सरतील तेव्हां.'॥ २०
शुक म्हणे, 'यमकिंकर ये रितीं वदति धर्म अनेक तयांप्रती; ।
श्रवणिं ऐकुनि या वचनास ते 'हरि हरी' म्हणती हरिदास ते.' ॥ २१
तो तों अजामिळ तिहीं द्विज सोडवीला, त्याच्या हितार्थ उपदेश तयासि केला. ।
नामप्रताप कथिला मग त्याप्रसंगें, नामें अमोघ हरिच्या जनपाप भंगें. ॥ २२
तें उत्तरप्रकरणीं जगदात्मबंधू बोलेल वामनमुखें करुणैकसिंधू. ।
स्कंधांत या प्रथम हाचि महापुराणीं अध्याय दिव्य, वदली मुनिवर्यवाणी. ॥२३

---

१. दर्भ. २. रमणी. ३. वागेंत. ४. कामक्रीडासक्त. ५. दोन, जोडपें. ६. दिगंबर, नग्न. ७. काम. ८. मन हरण करी. ९. मदन. १०. संचार करी, शिरे. ११. तिनें इच्छिलेलें. १२. ओष्ठसंबंधी मध. १३. संपादन केलें. १४. विवाहित स्त्री. १५. माजलेल्यानें, वेड्यानें. १६. यमराज. १७. पापाचें फळ. १८. विष्णुदूतांला. १९. फलोत्पादक, कार्यसाधक. २०. जगन्मित्र, ईश. २१. भागवतामध्यें. २२. शुकाची वाणी.

अध्याय जैसा पहिलाच तेथें, तैसाच हा 'नामसुधे'त येथें. ।
भावार्थ गूढार्थ यथार्थरूपें निरूपिला श्रीहरिच्या प्रतापें. ॥ २४

द्वितीयापासूनी धरुनि सकळा व्यासवचना
हरी टीकाकर्ता तदुपरि महाराष्ट्र रचना. ।
तथापि श्लोकींचें प्रतिपद न भाषेंत मिरवे,
जसे देहीं डोळे दिसतिल तसे श्लोक बरवे. ॥ २५

अध्याय दुसरा.

चरण पहिला.

(श्लोक.)

अध्यायीं दुसऱ्या प्रतापमहिमा नामामृताचा स्वयें
श्रीवैकुंठपदाब्जभृंग कथिती नानापरी निश्चयें. ।
गेला ज्या श्रवणें अजामिळहि तो जेथें स्वयें श्रीपती,
आतां काय पहा मुनींद्र वदतो येथूनि रायाप्रती. ॥ १

शुक म्हणे, 'इतुकी हरिकिंकरीं परिसतां यमकिंकर वैखरी[1], ।
सकळनीतिविशारद[2] त्यांप्रती वदति, आयिक तें धरणीपती! ॥ २

'अन्याय आचरण तें यमकिंकरांचें,' हें बोलणें परमधर्मधुरंधुरांचें, ।
ऐकोनि मानुनि मनीं हरिदास भारी हे श्लोक पांच[3] वदती प्रभु! या प्रकारीं.॥३

नें पापी न दंडार्ह ऐशास जेथें, करीती वृथा ये रिती दंड तेथें; ।
अधर्म स्वयें स्पर्शतां धर्मवंतां, अहो! कष्ट[4] ते वाटती थोर संतां. ॥ ४

जे मायबाप[6] जनशासन[7]दंडधर्ते, जे साधु सर्वसम जे नयनीतिकर्ते, ।
ऐशासही विषमता[8] उपजेल जेव्हां, कोणास हे शरण जातिल लोक तेव्हां? ॥ ५

अन्याय आचरति संत समर्थ जेथें, तैसेच सर्व जनही करितील तेथें; ।
तेव्हां बुडेल जग भाव धरूनि, ऐसा हा श्लोक[9] यावरि पहा वदतील कैसा? ॥ ६

---

१. वाणी. २. नीतिचतुर, न्यायनिपुण, नयकोविद. ३. स्कंध ६, अध्याय २ श्लो० २-६ पहा. ४. 'अहो कष्टम्' इत्यादि दुसरा श्लोक पहा. ५. शिक्षेस पात्र. ६. 'प्रजानां पितरो ये च' इत्यादि तिसरा श्लोक पहा. ७. शासन करणारे, अनुशिक्षक. ८. मनाची असमता, अदंड्यजनास दंड करण्याची बुद्धि. ९. 'यद्यदाचरति' इत्यादि चवथा श्लोक पहा.

जैसा वर्ततो एक कल्याणकारी, जगीं वर्तती सर्वही त्याप्रकारीं; ।
वदे तो सदाचार शास्त्रार्थ जैसे, जगीं वर्तती सर्वही लोक तैसे. ॥ ७
श्लोकत्रयींकरुनि शासनदंडधर्ते होवूनि हे नव्हति केवळ नीतिकर्ते, ।
ऐसें वदोनिहि अतःपर बोलती कीं विश्वासघातकहि केवळ हे त्रिलोकीं. ॥ ८
माझा मित्र सखा म्हणोनि हृदयीं विश्वासला जो असा,
अंकीं ठेवुनि मस्तकासहि निजे त्याला वधी तो असा; ।
निष्पापा यमधर्मराज नरकीं घालूं म्हणे जेधवां,
विश्वासूनि अशास शुद्ध जन हे होती कसे तेधवां? ॥ ९
निष्पाप केवळ अजामिळ नामघोषें, गेलीं जळोनि कृतपापफळें अशेषें. ।
याला कसें म्हणति पातक या च भावें नामप्रसंग वदतील महाप्रभावें. ॥ १०
येथूनि नाममहिमा वदती हरीचा, ऐका विलास हरिकिंकरवैखरीचा; ।
प्रत्यक्षशब्दउपमाअनुमानरीती श्रोत्यांसि जे रिति घडे महिमाप्रतीती. ॥ ११
हा तों भूतभविष्यपातककुळा जाळूनियां राहिला,
कीं नारायणनाम जो विवशही होवूनियां बोलिला; ।
कल्याणालय नामधेय हरिचें आलें मुखा जेधवां
याचे जे भवपाश ते हरियले श्रीमाधवें तेधवां. ॥ १२
म्हणाल 'पौंपघ्न म्हणूनि त्याचे आलें न नारायणनाम वाचे;' ।
'झाला कसा नाश समस्तपापा?' म्हणाल ऐका तरि त्या प्रतापा. ॥ १३
जेव्हां नारायणा ये म्हणउनि वदला अक्षरें चारि वांचे,
प्रायश्चित्तें अशेषें सहजचि घडलीं, नाशले दोष त्याचे; ।
तावन्मात्रेंचि याचीं सकळहि दुरितें पातकें ही जळालीं,
जेव्हां नारायणाचीं स्ववदनसदनीं अक्षरें चारि आलीं. ॥ १४
नाशावया पापकुळासि कांहीं नामाअसा अन्य उपाय नाहीं; ।
म्हणोनि पंचद्वय धर्मदूतां वाखाणिती तें हरिदास आतां. ॥ १५

---

१. 'जसा वर्ततो लोककल्याणकारी' असाही पाठ आहे. २. 'यस्यांके शिर आधाय' हा व या पुढचा असे दोन श्लोक पहा. ३. उत्संगीं, मांडीवर. ४. हरिभक्तांच्या वाणीचा. ५. चार प्रकारांनीं. प्रत्यक्ष, शब्द, उपमा आणि अनुमान—हे चार प्रकार. ६. प्रत्यय, विश्वास, अनुभव. ७. झालेल्या आणि होणाऱ्या पातकांच्या राशीला. ८. पराधीन. ९. कल्याणाचें गृह, स्वस्त्ययन. १०. संसारबंध. ११. पाप नाश करणारें. १२. मूळांतील आठवा श्लोक पहा. (स्कंध ६, अध्याय २.) १३. श्लोकद्वय १६० श्लोक नवम आणि दशम. (अध्याय २.)

मित्रद्रोही मद्यपी वित्तहारी[1] स्त्री गौ[2] विप्र क्ष्मापती[3] यांसि मारी, ।
ऐसे नाना आणखी पापकारी यांला शुद्धी देवुनी नाम[4] तारी. ॥ १६
या दोंश्लोकीं पापिया शुद्धिधामें प्रायश्चित्तें बोलिलीं विष्णुनामें, ।
येथें अंतीं दूसऱ्याच्या चतुर्थीं[5] पादीं पाहा बोलिलीं जीं समर्थी. ॥ १७
श्लोकांचिया त्रिचरणीं सकळांसि शुद्धी अत्यंत जेथ न पुन्हा अणु पापबुद्धी, ।
तें हेंच कीं अजितनाम म्हणाल कैसें? त्याचें निमित्तहि चतुर्थपदांत ऐसें. ॥१८
विषय बुद्धिस होय रमापती म्हणति यास्तव 'तद्विषया मती,' ।
विषय बुद्धिस ज्याकरितां हरी परम उत्तम नाम अशापरी. ॥ १९
सकळहि अघबीजें नाशती अंतरींचीं,
अतिअघहर नामें यास्तव श्रीहरीचीं. ।
हरि विषय मतीचा कीर्तनें होय जेव्हां,
करतळगत[6] त्याला चारिही[7] मोक्ष तेव्हां. ॥ २०
वदनिं तद्गुणकीर्तन[8] जेथवां, मन तदर्थक तन्मय[9] तेथवां; ।
म्हणुनि कीर्तनिं तद्विषया मती, विषय विष्णु मतीस असे रिती. ॥ २१
विषयहि हरि होते बुद्धि तन्नाम[10] जेथें
म्हणउनि दुसराही होतसे अर्थ येथें; ।
परि उचित दुजा या प्रस्तुतीं अर्थ झाला
नकळत हरिनामें पापमेळा[11] जळाला. ॥ २२
नारायणस्मरण बुद्धिस पुत्रभावें झालें, तथापि हरि दृष्टि पडे स्वभावें; ।
एकास एक जन घेवुनि नाम बाहे, तन्नामधारक[12] दुजाहि तयास पाहे. ॥ २३
न पाचारितां आपणा जो स्वभावें स्वयें 'ओ' म्हणे आणि पाहे स्वभावें; ।
न सर्वज्ञ तो विष्णु सर्वज्ञ कैसा पहाता न जाणोनि संदेह ऐसा? ॥ २४
सर्वत्र हें कथियलें हरि सर्वसाक्षी[13] जेथें स्वनामकरुणेस्तव त्यास लक्षी, ।
नामप्रताप हरि नाम कळोनि ऐसा, पाहे कृपेकरुनि त्यास हरी न कैसा? ॥२५

१. चोर, स्तेन. २. गाई. ३. राजा. ४. विष्णुनामोच्चारण. ५. दुसऱ्या श्लोकाचा (दशमश्लोकाचा चवथा चरण) 'यतस्तद्विषया मतिः' असा आहे. ६. हातीं आलेला, तळहातांत असलेला, स्वाधीन ७. सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्य. ८. त्याचें (विष्णूचें) गुणकीर्तन. ९. विष्णुमय. १०. त्याचें (हरीचें) नांव. ११. पापाचा ढीग. १२. ज्याचें (दुसऱ्याचें) नांव धारण करणारा. जसें, 'गोविंद' या नांवाचे दोन मनुष्य असले आणि कोणी तरी एका गोविंदास उद्देशून हांक मारिली, तर दुसरा गोविंदाही तिकडे पाहतो तसें. १३. सकल चराचरांतील घडामोड आपण उदासीन असून पाहणारा, प्रत्यक्षदर्शी.

'पाचारितो निजसुतासि मदीयनावें म्यां कां कृपेकरुनि त्यास अहो ! पहावें ?' ।
सर्वज्ञही परि जना न असा उपेक्षी, नेणोनि नाम म्हणतांहि कृपाळु लक्षी. २६
जो कां दयाळु सुख सर्वजना अपेक्षी नामप्रताप समजोनि कसा उपेक्षी ? ।
नामें अघें जळति हें तरि सर्वसाक्षी जाणें अशारिति अजामिळबुद्धि लक्षी.॥२७

जीवोद्धारनिमित्त जो अवतरे मत्स्यादि रूपें धरी,
तीथें वेद पुराण शास्त्र अवघें ज्याकारणें जो करी, ।
साक्षी आणि समर्थ आणि करुणासिंधु स्वयें जो हरी,
तन्नामें भलत्या मिसें वदति जे त्यांला कसा नुद्धरी? ॥ २८

हा पूर्वपक्ष हरिला हरिनेंच येथें, आतां पुढें वदति पार्षद काय तेथें ? ।
आणीकही म्हणति पापहरें विचित्रें होती तरी न जसिं केवळ नाममात्रें. ॥ २९

प्रायश्चित्तें बहुत वदती वेदवक्ते, तथापी
[12]त्यीं त्या कर्में करुनिहि जरी शुद्ध होतील पापी, ।
रामा कृष्णा मुरहर हरे या पदीं शुद्धि जैसी
प्रायश्चित्तें इतर न कधीं शुद्धि देतील तैसी. ॥ ३०

[13]श्लोकीं असें कथुनि तीं चरणें करूनि, तें बोलती जरि किमर्थ असें म्हणूनी।
श्रीविष्णुदूत हरिनाम गुणानुवादें येथें निमित्त वदतील चतुर्थ पादें. ॥ ३१
हरति सकळ पापें उत्तमश्लोकनामें तदुपरि रचितांतें रूचती विष्णुधामें. ।
हरिगुण हरिनामीं पाहतां अर्थ त्याचा, मग विषयविषाचा अंतरीं ताप कैंचा ?॥

कडुवट बहु वाटे शर्करा पित्तरोग्या,
परि परम सितों ते पित्तनाशासि योग्या; ।
सहज मधुर तेंही पित्त नासूनि देहीं
निज अति [1]रुचि दावी, आवडों दे न कांहीं. ॥ ३३

---

१. इच्छी. २. प्राण्याचा उद्धार करावा या निमित्तानें. ३. अवतार धारण करतो. ४ मत्स्य
कूर्म वराह इत्यादि. ५. न+उद्धरी=उद्धार न करी. (येथें 'अ'ला परसवर्ण होवून संधिकार्य झालें
आहे.) ६. हरि भलत्या मिसें नामोच्चारण करणाराला कसा मुक्त करणार नाहीं हा.
७. दुसऱ्यानें उत्तर द्यावें (उत्तरपक्ष करावा) अशा बुद्धीनें केलेला जो प्रश्न तो. ८. जिंकून घेतला.
९. परिषदेंतील (सभेंतील) मनुष्य, सभासद. १०. स्कंध ६ अध्याय २ श्लो० ११ पहा.
११. ब्रह्मवादी. १२. चांद्रायणादिक कर्में. १३. अकराव्या श्लोकांत. १४. विष्णुनामें (उत्तम
आहे श्लोक म्ह० स्तुति ज्याची तो—विष्णु.) १५. कडवट ('वट' हा प्रत्यय विशेषणास लागून
न्यूनाधिक्यदर्शक विशेषणें होतात.) १६. साखर. १७. शर्करा. १८. गोडी.

कडुवट हरिनामें वाटती पापियाला,
  परि दवडुनि पापें, गोड होती तयाला; ।
मग विषयसुखाची नाठवे त्यास वार्ता,
  म्हणउनि न पुन्हा तो होय अन्यायकर्ता. ॥ ३४

हरुनि सकळ पापें गोड होतील नामें,
  मग मनिं अभिरामें[1] सूचती विष्णुधामें; ।
हरि सकळहि पापें तत्फळें दुःखवृंदें[2]
  'हरि हरि' म्हणवीलें यास्तव श्रीमुकुंदें. ॥ ३५

न कळत हरिनामें नासती पापमात्रें,
  परि करिति कृतार्थ श्रीपति[3]प्रीतिनेत्रें; ।
तदनु हरिकटाक्षें नाम जाणोनि घेती,
  गुणिं मिठि पडतां ते पातकी केंवि होती ? ॥ ३६

मधुर मधुर नामें दाविती अर्थ दृष्टी,
  मधुरिपुमय[4] तेव्हां नामनिष्ठांस सृष्टी; ।
वसति सकळ भूतें भूषणें जेंवि हेमीं[5],
  हरिमय जग देखे वासुदेवाख्यधामीं. ॥ ३७

नर पुरुष असीं हीं जीवनावें अपारें,
  गुणमय नरतत्वें बोलिजे त्यांस नारें[6]. ।
अयन[7] सकळ नाराधार आत्माच साचा,
  मुनिवर[8] वदती हा अर्थ नारायणा[9]चा. ॥ ३८

मृषा सर्व आधार त्याला गुणाचा, असे सर्व नारांसि नारायणा[10]चा; ।
जगत् व्यक्त[11] अव्यक्त[12] हें सर्व नारें प्रकाशी चिदात्मा[13] तदाधार सारें. ॥ ३९

---

१. रमणीय, मनोहर. २. समुदाय. ३. विष्णु. ४. विष्णुमय. ५. सुवर्णांत. ६. न-रसंबंधी उदकें. (नर=परमात्मा, परमेश्वर.) ७. आश्रय, स्थान. ८. मनु इत्यादिक. ९. 'आपो नारा इति प्रोक्ता आपो वै नरसूनवः । ता यदस्यायनं पूर्वं तेन नारायणः स्मृतः ॥' (म-नुस्मृति-अध्याय १ श्लो० १०), 'नाराणामयनं यस्मात्तस्मान्नारायणः स्मृतः' (ब्रह्मवैवर्त) १०. नर म्ह० परमात्मा, त्यापासून झालेलीं आकाशादि कार्यें नारें. हींच आहेत अयन. आधारस्थान ज्याचें तो नारायण. ११. बाह्येंद्रियांस गोचर. १२. इंद्रियांना गोचर नाहीं तें. १३. परमात्मा.

व्यक्त प्रपंच नभआदिक पंचभूतें
अव्यक्त बुद्धि मन मीपण आणि चित्तें; ।
नारें असीं, अयन आश्रय यांच नारां
नारायण प्रभु खरा, लटक्या विकारा. ॥ ४०

नारांसि जो आश्रय या प्रकारें नारायणा आश्रय तेंचि नारें; ।
नारांसि जो आश्रय ईश झाला, तो जीव कीं आश्रय हे जयाला. ॥ ४१

नारायणाश्रित अशेषहि जीव नारें
भूमीवरी असति, जेंवि नदींत नीरें. ।
पाण्यांत त्या दरडि दीसति जीव तोही,
नारायणात्मक दिसे प्रतिबिंब देहीं. ॥ ४२

साक्षी विमुक्तजनआश्रय आणिखीही
नारायणार्थ बहु बोलति अंत नाहीं; ।
हीं ज्ञानगम्य हरिचीं गेहनार्थ नामें,
या वेगळीं सुगम जीं गुणकर्मधामें. ॥ ४३

मेघश्यामल कोमलांग म्हणतां जो सांवळा कोंवळा,
श्रीपीतांबर नाम दाखवि मनीं कासेस सोनेसळा; ।
वाचे कौस्तुभकंठ नाम म्हणतां तें रत्न दावी गळां,
भूभारांतक तो रणांगणिं दिसे दंडी खळांच्या कुळां. ॥ ४४

श्रीरामा म्हणतांचि जो करिं धरी कोदंड सीतापती,
गोपीवल्लभ वेणु लावुनि मुखीं दावी विचित्रा गती; ।
लक्ष्मीवल्लभ विष्णु शेषशयनीं चक्रादि चिन्हें करीं,
ब्रह्मा दाखवि पद्मनाभ म्हणतां तो नाभिपद्मोदरीं. ॥ ४५

या श्लोकीं अकराविया चरण हा चौथा कसा वाटतो,
जैसा वामनवामपाद गगनीं ब्रह्मांड तो आटतो. ।

---

१. पृथ्वी, आप्, तेज, वायु, आकाश, हीं पांच तत्वें. २. नरोत्पन्न कार्यास. ३. उदकें. ४. ज्ञानानें जाणण्यास योग्य. (गम्य=ज्ञेय. जे धातु गमनार्थक असतात ते बहुधा ज्ञानार्थकही असतात.). ५. ज्यांचा अर्थ दुर्बोध तीं. ६. पीतांबर. ७. कौस्तुभ म्ह० कुस्तुभापासून (समुद्रापासून) मंथनकालीं उत्पन्न झालेला मणिविशेष, तो आहे कंठीं ज्याच्या तो विष्णु. ८. कौस्तुभ. ९. मनुष्य. १०. वामनरूपधारी विष्णूचा डावा पाय.

[1]गंगा त्यांतुनि ही जशी त्रिभुवनीं, टीका तयाची असी
येथें 'नामसुधा' मधूनि निघते त्रैलोक्यकर्णीं तसी. ॥ ४६
नामीं असे अर्थ अनेक जेथें, सिद्धांत हा जो ग्रथितार्थ एथें; ।
कीं नाम नाशी अतिपापराशी, नामार्थ पापें सहमूळ नाशी. ॥ ४७
स्फुरे अर्थ वाचेसि ये नाम जेव्हां हरी पातकें आठवे नाम तेव्हां. ।
धरी कीर्तनीं चित्त नामार्थ गोडी सुखें सर्व सोडी तई पापखोडी. ॥ ४८
प्रायश्चित्तें सर्वही व्यर्थ जेव्हां नामीं, ऐसी शुद्धि अत्यंत तेव्हां, ।
या श्लोकाचा अर्थ भावार्थ ऐसा, चित्ताकाशीं चि[2]त्सुधारश्मि जैसा. ॥ ४९

चरण दुसरा.

(श्लोक.)

प्रायश्चित्तें बहु, परि न तीं शुद्धि अत्यंत देती,
जैसीं नामें सुलभ हरिच्या जीं गुणां सूचवीती. ।
तेथें जेव्हां मन रुचि धरी तो पडे केंवि पापीं
ऐसें पूर्वी वि[3]शद वदले विष्णुदूत प्रतापी. ॥ १

आतां म्हणाल असि होवुनि विष्णुभक्ती, दुर्वासना जरि करी विषयीं प्रसक्ती, ।
हेही न केवळ विशुद्ध म्हणाल जेव्हां, सांगों रहस्य म्हणती हरिदास तेव्हां. ॥ २
[4]नामींच शुद्धि, जरि आचरला तथापी धांवेल तेंचि मन मागुति त्याच पापीं, ।
तेही न शुद्धि बरवी परि याच नामीं जें शुद्धसत्व मन तें न बुडेल कामीं. ॥ ३
नकळत महिमाही, जाळिती सर्व पापें त्रिभुवनपतिनामें आपुलीया प्रतापें; ।
पुनरपि मन पापीं धांवतें तें न धांवे, जरि हरिगुणगोडी अंतरंगीं ठसावे. ॥ ४
ऐसी तथापिहि न इच्छिति शुद्धि कामीं कामीं प्रवर्तति जरी हरिच्याच नामीं; ।
जे इच्छितील असि शुद्धिहि दीर्घबुद्धी त्यांची त्वरेंकरुनि होइल सत्वशुद्धी. ॥ ५
विषय [5]तामस [6]राजस, इंद्रियें गढुळ, सत्व अखंड गुणद्वयें, ।
विषय वाटति गोड बहू मना, म्हणुनि सोडवती न कधीं जना. ॥ ६
करिति कीर्तनही हरिचें मुखें, परि मनीं अतितुच्छतरें सुखें, ।
मन निघो विषयांतुनि ये रिती, विषयनिष्ठ कदापि न इच्छिती. ॥ ७
करिति कीर्तन तेसमयीं हरी वदति मात्र, परंतु न अंतरीं; ।
प्रकटतो मनिं माधव जे स्थळीं प्रबळ ते स्थळिं काम न हा बळी. ॥ ८

१. विष्णुपदी. २. चंद्र, अमृतांशु. ३. स्पष्ट. ४. श्लोक १२ वा पहा. ५. तमोगुणयुक्त. ६. रजोगुणयुक्त.

विषय शत्रु मनीं जयिं वाटती मनिं तया हरिचे गुण दाटती; ।
विषयपाश अशेषहि तूटती, मग कधीं कुपथीं न रहाटती. ॥ ९
परि न शुद्धि असी जन इच्छिती तरति जे असि शुद्धि अपेक्षिती; ।
जरिं अपेक्षिति काय तया उणें? परम शुद्धि रमापतिच्या गुणें. ॥ १०

रज तम गुण दोन्हीं दुष्ट अत्यंत, यासी
हरिगुणअनुवादी छेदिती निश्चयासी. ।
करुनि विमळ सत्त्वा त्या नरा सत्त्वधीरा,
पुनरपि अणु लागों नेदिती पापवारा. ॥ ११

असिहि शुद्धि अपेक्षिति जे जनीं त्वरित ते तरती हरिकीर्तनीं; ।
म्हणुनि निर्णय हा अतिनिश्चयें कथियला हरिच्या भृतकीं स्वयें. ॥ १२
परमशुद्धि न इच्छिल तो जरी, करिल शुद्धहि पाप पुन्हा तरी; ।
म्हणुनि संशय हा धरितो गळां, तरि पहा तुम्हि येथ अजामिळा. ॥ १३
सुतमिषें घडतां हरिकीर्तनें पतित उद्धरिलाचि जनार्दनें; ।
परि हरूनि कुसंग सुसंगती करुनि दीधलि त्यासहि संगती. ॥ १४
सहज कीं हरिकीर्तन जो करी, सुमति त्यासहि देइल तो हरी; ।
परम शुद्धिहि जे जन इच्छिती, सुमति दे हरि तोचि रमापती. ॥ १५
परि मनीं अतिशुद्धि अपेक्षिती, त्वरित ते फळ उत्कट पावती. ।
त्यजिति ते विषयात्मक वासना, जितचि मुक्ति अहो! मग त्या जनां.॥ १६
म्हणुनियां मथितार्थ कसे परी पतितपावन यो वदनीं हरी. ।
त्वरित नासति पूर्विल पातकें, मग हरी हळु दाविल कौतुकें. ॥ १७
इतर शुद्धिहि तो हरि देतसे, परि जसा क्रय विक्रय होतसे. ।
करिति जे व्रत तीर्थे तपें जसीं, हरि विशुद्धिहि देत असे तसी. ॥ १८
निज अपत्यजना सकळांपरी सकळ लक्षिति लोक असा हरी; ।
वदनिं नाम अखंड जयांचिया करि समस्तहि शुद्धि तयांचिया. ॥ १९
म्हणुनि ये रितिनेंचि अजामिळा, सुमति देवुनि सोडवि तो गळा; ।
श्रवण हें निजदाससुखें तया करवुनी करितो हरि हे दया. ॥ २०
इतर शुद्धिस हा महिमा नसे, अजितनाम न जेथ मुखीं वसे; ।
म्हणुनियां जन हो! भलत्यापरी.पतितपावन यो वदनीं हरी. ॥ २१

---

१. बंध. २. सकल. ३. वर्तती. ४. इच्छिती. ५ भृत्यांनीं. ६. अतिशय. ७. पतितांला–पातकिजनांला पवित्र करणारा. ८. येवो. ९. परमेश.

पतितपावननामपदें जसीं करिति शुद्धि न तीं इतरें तसीं ।
म्हणुनि नेवुं नका नरकाप्रती द्विज असें हरिकिंकर बोलती. ॥　२२

नेवूं[1] नका तुम्हि अतःपर या द्विजाला, संहार ज्यास्तव अघां[2] सकळांस झाला; ।
कीं जेधवां मरणकाळि मरों निघाला, तेव्हां मुखीं पतितपावन विष्णु आला.॥२३

मरणसमयिं त्याचें नाम वाचेसि आलें,
म्हणउनि अवघेंही पाप याचें जळालें; ।
जितेचि अजित नामें हीं न जेव्हां समर्थें,
म्हणउनि मनिं शंका श्रोतयां या श्रुतार्थें. ॥　२४

अभिप्राय हा व्यक्त[3] होईल जेव्हां, मनींहूनि शंका निवारेल तेव्हां. ।
अहो! वर्णिला मूळ पद्यार्थ[4] ऐसा, बरा आयका येथ भावार्थ कैसा. ॥ २५
पूर्वश्लोकीं वासनात्यागरीती, जे कां शुद्धी इच्छिती, त्यांस होती; ।
ऐसे जें कां बोलिले त्या द्विजांला, नाहीं झाला येथ संदेह ज्याला. ॥ २६
अशेष पापें म्हणतां जळालीं, जे शुद्धि त्याला न कळोनि झाली; ।
तो मृत्यु येतां इतुक्यांत कांहीं कुकर्म झालें तरि शुद्धि नाहीं. ॥　२७
असें बोलती दूत चित्तीं यमाचे म्हणोनी मनीं दूत सर्वोत्तमाचे; ।
विचारूनियां बोलती मृत्यु[5] तेव्हां, मुखीं याचिया स्वामिचें नाम जेव्हां.॥२८

'देहावसानसमयीं जरि पाप झालें, देहावसानसमयीं जरि नाम आलें; ।
कांहींच शुद्धि नसली जरि त्यासि पूर्वीं, हें[6] एक नामचिहि शुद्धि करील पूर्वी.॥
हा अंतकाळ नरकाप्रति जावयाचा, काळीं अशाहि जरि गर्जलि नाम वाचा; ।
मागील सर्वहि अहो! अघ तें जळालें; धाकेंचि जे नरक सर्वहि ते पळाले. ॥
नेवूं नका म्हणुनि जे म्हणतों तुम्हांला, तें नाम शेवटिल हें फैळलें[7] द्विजाला;।
पूर्वा[8] मुखीं सुतमिषें हरिनाम आलें, तें नाम यासि अतिशुद्धिसि हेतु झालें.३१
हा आजि नाममहिमा श्रवणासि आला, सत्संग जो क्षणहि हाचि फळेल याला.।
टाकूनि संग भजतां हरिनाम घोषें दुर्वासना जळति त्या अघबीजशेषें[9].' ॥ ३२
गंभीर भाव हृदयांत धरूनि ऐसा, ते बोलिले अजितकिंकर बोल तैसा, ।
कीं प्राणयानसमयीं हरिनाम जेथें, नेवूं नका पुरुष तो नरकास तेथें. ॥ ३३

---

१. श्लोक १३ पहा. २. पापांला. ३. स्पष्ट. ४. मूळांतील १२ व्या('अथैनं मापनयत' इत्यादि) श्लोकाचा अर्थ. ५. मरणकाळीं. ६. 'हें एक नाम वदतांच विशुद्धि सर्वी' असाही पाठ आहे. ७. फलप्रद झालें. ८. कारण. ९. पापमूळें.

येथें सूचविलें जनांस सकळां दूतीं हरीच्या असें,
कीं देहीं हरिनाम अंतसमयीं येणार वाचे कसें ? ।
जैसें पुत्रमिसें अजामिळमुखीं जें नाम होतें सदा,
आलें तेंचि तदर्थ नाम हरिचें गर्जा मुखीं सर्वदा. ॥ ३४

म्हणति ते हरिकिंकर त्यावरी, 'तुम्हि म्हणाल न हा स्मरला हरी, ।
सतत हा स्मरला निजआत्मजा घडलि शुद्धि म्हणाल कशी द्विजा ? ॥ ३५
तरि सुधा कसिही पडतां मुखीं हरि जरामरणासि, करी सुखी.' ।
धरुनि भाव मनांत असा बरा, वदति वैष्णव त्या यमकिंकरा. ॥ ३६

सांकेत जीं निजसुतादिनिमित्त नामें, संकेतरूप रचलीं परि शुद्धिधामें. ।
गोविंद नाम हरि माधव चक्रपाणी कोण्या मिसें तरि वदो, परि धन्य वाणी.॥

हरि हरि म्हणुनी हा नाचतो काय वेडा ?
अज अजित म्हणूनी गर्जतो काय रेडा ? ।
मुखिं हरि पैरिहासें ये अशाही प्रकारें
तरि जळतिल पापें पापियांचीं अपारें. ॥ ३८

घडि घडी वदनीं हरि आळवी, स्वहरिदासपणें जन चाळवी; ।
सकळ पापकुळें जळती तरी, करुनि दंभ हरी म्हणतो जरी. ॥ ३९
हरिकथा उदरार्थ जरी करी, स्वगुण नाम करी नलल्यापरी; ।
विकितसे उदरार्थ फुलें जरी, शुभ सुगंध कधीं न चुके तरी. ॥ ४०

'हरि ! हरि ! हरि !' ऐसें बोलतां काय होतें ?
'हरि हरि' म्हणती हा नावडे शब्द मातें. ।
हरि म्हणति असाही हेळणेनें तथापी
'हरि हरि' म्हणतां तो होय निष्पाप पापी. ॥ ४१

कोण्या मिसेंकरुनि ये हरिनाम वाचे, जे पापराशि अवघे जळतील त्याचे; ।
वाचे जरी सुतनिमित्तक नाम आलें, सांकेत्य कीर्तनमिसें अघ तें जळालें.॥४२
आतां म्हणाल, 'हरिनाम समस्त पापें नासूनि उद्धरिलही सहजप्रतापें, ।
दुर्मृत्युनें मरति, दुर्गति सिद्ध याला दुर्मृत्युचे नरक चूकति केंवि बोला ?'॥४३
'तरि न दुर्मरणें करि दुर्गती' म्हणुनियां हरिकिंकर बोलती; ।

१. मुलाला. २. विष्णूचे सेवक. ३. श्लोक १४ पहा. ४. थट्टेनें. ५. प्रेमानें हांक मारी. ६. पापराशि. ७. पोट भरण्यासाठीं. ८. अवज्ञेनें, धिक्कारपूर्वक. ९. संकेतपूर्वक, संकेतानें केलेलें. १०. स्वाभाविक सामर्थ्यानें. ११. नरक.

'जरि हरिस्मरणें मरणें घडे भलतसें नरकीं न तरी पडे.' ॥ ४४

पेंडे, अडखळे, गळे, करपदादि भंगे, मरे.
डसे भुजग, अग्निही करुनि जीविता अंतरे. ।
मरेल जरि मारितां, तरि न त्या नरा यातना,
स्मरेल मरतांच जो विवशही जगत्पावना. ॥ ४५

विवशतें न सुखा हरि ये तरी, नर वदे हरिनाम सदा जरी, ।
म्हणुनियां हरिनाम सदा मुखीं जपति गर्जति तेचि जगीं सुखी. ॥ ४६

प्रायश्चित्तें नासती पापमात्रें, बीजें त्यांचीं राहती तीं विचित्रें, ।
[10]तींही जाती, आवडे नाम जेथें, ऐसें मार्गें वर्णिलें स्पष्ट येथें. ॥ ४७

पूर्वी येथें विशद कथिलें कीर्तनाच्या प्रतापा
आतां सेवा हरिचरणिंची जे स्तुती स्तोत्ररूपा, ।
तेथें नामेंकरुनिच महा पातकी शुद्ध होती,
ऐसें बोलों म्हणुनि हृदयीं चिंतिलें विष्णुदूतीं. ॥ ४८

जीं कीर्तनीं तारक विष्णुनामें, सेवा मिसें[15] तींच विशुद्धिधामें; ।
आतां असें बोलति तेचि वाचे श्लोकद्वयें किंकर माधवाचे. ॥ ४९

थोरां थोरें, लाहना लाहनालीं प्रायश्चित्तें ब्राह्मणीं बोलियेलीं; ।
पापें त्यांनीं भस्म होती, तथापी राहे जें कां चित्त जें पापरूपी. ॥ ५०

मळ अनादि मनांत कुवासना हरि तिला हरिपादउपासना; ।
भजनिंही हरिनामक मंत्र ते अजितनामक सर्वहि तंत्र तें. ॥ ५१

स्तुति स्तोत्र सन्मात्र सूक्तें विचित्रें समस्तांतरीं विष्णुनामें पवित्रें. ।
करीती तिहीं पुंडरीकाक्षपूजा, हरी श्रीहरी त्यांचिया पापबीजा. ॥ ५२

---

१. श्लोक १५ पहा. २. मार्गांत इत्यादि. ३. भग्नगात्र झाल्यामुळें. ४. साप. ५. दंडानें इत्यादि. ६. पराधीन, बेशुद्ध, मरणोन्मुख. ७. जगतास शुद्ध करणारा असा जो (विष्णु) त्याला. ८. पराधीनतेमुळें. ९. त्या पापांचीं. १०. बीजेंही. ११. नष्ट होतात. १२. स्कंध ६ अध्याय १ श्लोक ११ यांत प्रायश्चित्तानें पापाचा आत्यंतिक निर्हार (समूल नाश) होत नाहीं असें सांगितलें आहे. १३. स्पष्ट. १४. महिमा. १५. कोणत्याही निमित्तानें. १६. आत्मशुद्धतेचीं स्थानें. १७. श्लोक १६–१७ पहा. १८. मनु आदि द्विजांनीं. १९. तथापि पापाचें बीज नष्ट होत नाहीं—असा भावार्थ. २०. येथें समासामुळें संधि कर्तव्य असून केला नाहीं. २१. विष्णुपूजा. (पुंडरीकासारखे म्ह० कमळासारखे अक्ष म्ह० डोळे ज्याचे तो.)

अतिच धर्मसुताप्रति भारतीं वदलि जान्हविनंदनभारती; ।
'पुससि तूं जरि धर्म युधिष्ठिरा ! वदतसें मज जो गमला वरा.' ॥ ५३
हा श्लोक भीष्ममुखिचा परमार्थ जेथें भाषेकरूनि वदिजेल तदर्थ येथें. ।
'स्तोत्रें स्तुती करुनि जे हरिभक्तिपूजा हा एक धर्म दिसतो मज धर्मराजा ! ५४
या धर्मा सकळांत संमत मला तो धर्म हा आगळा,
नाहीं त्यासम धर्म आणिक नृपा ! तो धर्म या वेगळा. ।
जो स्तोत्रें दृढभक्तिनें प्रतिदिनीं गोविंद हा पूजणें,
ऐसें कृष्णसमीप भीष्ममुखिचें श्रीभारतीं बोलणें. ॥ ५५
नामप्रताप हरिचा सकळां पुराणीं व्यासादि बोलति मुनीश्वर वेदवाणी; ।
याकारणें परम नामचि जेथ तेथें, जें प्रस्तुतीं वदति हें हरिदूत येथें. ॥ ५६
असें कीर्तनें आणि सेवादिरूपें महा शुद्धि दे विष्णुनाम प्रतापें, ।
न जाणोनि जाणोनि उच्चारितां ही हरी पातकें, येथ वैषम्य नाहीं. ॥ ५७
जसजसा अति सादर कीर्तनीं, तसितसी हरिभक्ति फुगे मनीं, ।
परि पुरातन पातक तों उरे भेलतसे हरिनाम वदो, पुरे. ॥ ५८
वदति येथुनि पंद्युगें रसें अजितकीर्तन हें उपमामिसें; ।
गमन ते करिती मग तेथुनी, शुक वदेल अतःपर येथुनी. ॥ ५९
'नकळत कळतां घे उत्तमश्लोकनामें,
सहज निजगुणेंही नासती पापधामें; ।
नकळत कळतांही घालिती अग्नि जेथें
करि सहजगुणें तो भस्म जाळूनि तेथें. ॥ ६०

१. महाभारतांतील अनुशासनपर्वाच्या १४९ व्या अध्यायांत. याच अध्यायांत 'विष्णुसहस्रनामस्तोत्र' आहे. २. भीष्माची वाणी. (जन्हुराजानें गंगा आणिली म्हणून गंगेला जान्हवी असें म्हणतात. 'जान्हवी' हा शब्द येथें वृत्तसुखार्थ ऱ्हस्व लिहिला आहे.) ३. 'एष मे सर्वधर्माणां धर्मोऽधिकतमो मतः' इत्यादि विष्णुसहस्रनामस्तोत्रांतील श्लोक पहा. ४. श्रेष्ठ. ५. घोर युद्ध समाप्त झाल्यावर धर्माला ज्ञातिवधानें अत्यंत खेद झाला. त्याचें निरसन कृष्णाच्यानेंही होईना, तेव्हां त्यानें धर्माला भीष्माकडे आणिलें. त्यानें शांतिपर्व आणि अनुशासनपर्व यांच्या द्वारा धर्मास अनेक प्रकारें बोध करून त्याचें समाधान केलें. त्या प्रसंगीं हें धर्मभीष्मांचें बोलणें (प्रश्नोत्तरभाषण) कृष्ण, अनेक ब्रह्मर्षि व राजर्षि यांच्या समक्ष झालें. ६. पुराणग्रंथांत. (पुराणें १८ आणि उपपुराणें १८ आहेत.) ७. भेद, वैपरित्य. ८. उरे न. ९. समजून अथवा न समजून, कसेंही. १०. श्लोक १८–३९ पहा. ११. दृष्टांतरूपानें, दाखला देऊन. १२. हरिनामें. (उत्तमश्लोक–ज्याचा श्लोक म्ह० नामस्तव तमोरूप अज्ञान नष्ट करतो तो.) १३. पापाचीं घरें. १४. हा अग्नीचा दृष्टांत या प्रकरणांत अनेकवार वामनानें योजिला आहे.

श्रीउत्तमश्लोक म्हणूनि त्याचें श्लोकांत या वर्णिति नाम साचें. ।
सत्कीर्ति जे श्लोक[1] तिला म्हणावें, जे विष्णुनामात्मक रूप भावें. ॥ ६१
गोपाळबाळ म्हणतां व्रजबाललीळा,[2] नामें[3] सुचे हृदयिं केशवकीर्तिमाळा; ।
गोपींगनारमण[4] नाम विलासलीला वीहार[5] सूचवि असें हृदयीं तयाला.॥ ६२
वदनिं नाम धनंजयसारथी[6] उभय कृष्ण[7] मनीं दिसती रथीं; ।
शतसहस्र[8] असीं हरिनामकें अजितकीर्तिसुधारसधामकें.[9] ॥ ६३
ऐसीं जगत्पावन विष्णुनामें वैकुंठकीर्त्यात्मक[10] पुण्यकामें ।
नेणोनि जाणोनि मुखासि आलीं, पापें तयाचीं अवघीं जळालीं. ॥६४
न अग्नि टाकी स्वगुणासि[11] जेव्हां, टाकी कसें नाम गुणासि[12] तेव्हां ? ।
जाळी स्वनामेंचि अघें अपारें ते उत्तमश्लोक अशा प्रकारें. ॥ ६५
नामें हरीचीं हरिकीर्तिरूपें न नाशिती हीं जरि लोकपापें; ।
प्रसिद्धमात्रेंचि कसें म्हणावें तो उत्तमश्लोक म्हणोनि नांवें. ॥ ६६
विख्यात पापी[13] बहुसाल[14] होती, वेदीं पुराणीं श्रवणासि येती; ।
तसी नव्हे कीर्ति रमापतीची, तारी जगा ख्याति असीच तीची.॥ ६७
हरी पाप तें नाम कोण्याप्रकारें, स्मरे सादरें त्यासि सौख्यें अपारें; ।
जसी नेणतां औषधी रोगें[15] नाशी, पुढें सेवितां तेचि दे सौख्यराशी. ॥६८
करि अहो ! गुण कांचन[16] औषधी, न करि कां हरिनामसुधानिधी ?' ।
धरुनि भाव असे मित बोलिले, मग उगे हरिकिंकर राहिले. ॥ ६९

चरण तिसरा.

(श्लोक.)

अजितनाममहत्व[17] अशा परी कथियलें बरवें हरिकिंकरीं. ।
उभय दूत अतःपर वर्तती कथिल तें शुभ भूमिपतीप्रती. ॥ १
शुक म्हणे, हरिकिंकर ये रिती परम वैष्णवधर्म[18] तयांप्रती ।
करुनि निर्णय ते यमपाशही द्विजनिबंधक[19] तोडियले तिहीं.' ॥ २

१. 'श्लोक' या शब्दाचा अर्थ 'सत्कीर्ति' असा आहे. २. गोकुलांतील मुलांची क्रीडा. ३. हरिनामानें. ४. गोपीवल्लभ. ५. या स्थलीं वृत्तसुखार्थ 'वी उपसर्ग दीर्घ केला आहे. ६. अर्जुनाचा सारथी. (कृष्ण.) ७. अर्जुन आणि वसुदेवतनय. (कृष्ण.) ८. लक्ष, अगणित. ९. ईश्वराच्या यशोरूप अमृताचीं स्थानें. १०. विष्णु. (रैवत मन्वंतरांत झालेला विष्णुचा अवतार.) ११. दाहकशक्ति. १२. पावकशक्ति, पावन करण्याचा गुण. १३. पिंगळा, गजेंद्र, अजामिळ इत्यादि. १४. पुष्कळ. १५. श्लोक १९ पहा. १६. सुवर्ण. १७. परमेश्वराच्या नांवाचा महिमा. १८. भागवतधर्म. १९. ब्राह्मणाला बंध करणारें.

दूतीं यमाच्या मग काय केलें ? अजामिळाचें मग काय झालें ? ।
[1]अध्यायपर्यंत मुनींद्रवाणी बोलेल हें सर्व [2]महापुराणीं. ॥ ३
यानंतरें कुपित ते यमदूत तेथें गेले त्वरें करुनियां यमधर्म जेथें. ।
[3]वृत्तांत हा वदति [4]संयमनीपतीला जो कां जगीं [5]त्वदनुशासनभंग झाला. ॥ ४
आतां द्विजें क्षणहि [6]वैष्णवसंगतीनें केलें पहा स्वहित जें [7]वृषलीपतीनें ।
सांगेल तें शुकमुनींद्र महीपतीला, तें आयिका, द्विज [8]सुमंगल केंवि झाला. ॥ ५
'नृपा ! विप्र निष्पाप निष्पाश झाला, भयें सोडिलें सर्वथा त्या द्विजाला, ।
करी वंदनें दूत [9]पादांबुजाला धरी मस्तकीं आदरें त्या [10]रजाला. ॥ ६
विप्रास आयुष्य असोनि देवें यमासही मोहुनि वासुदेवें ।
तो दूतहस्तें द्विज आणवीला स्वकिंकराहातुनि सोडवीला. ॥ ७
स्वकिंकरांच्या वदनें तयाला श्रीवल्लभें हा उपदेश केला ।
यानंतरें वांचतसें द्विजाती ऐशामधें ते हरिदूत जाती. ॥ ८
आयुष्य शेष म्हणऊनि पुन्हा शरीरीं विप्र प्रवेश करि [11]सूक्ष्मशरीरधारी, ।
त्या देखतांचि हरिकिंकर गुप्त झाले, अस्ताचळाप्रति [12]दिवाकर [13]चौरि गेले. ॥ ९
त्यानंतरें वृत्ति अजामिळाची कथा महत्संगतिच्या फळाची ।
श्लोकत्रयें प्रस्तुत त्या द्विजाला हें सांगतों कीं अनुताप झाला. ॥ १०
[14]अनंतदूतांसि [15]कृतांतदूतीं निवेदिली [16]वैदिकधर्मरीती, ।
अन्याय ते स[17]र्व अजामिळाचे निवेदिले, दंडहि त्या फळाचे. ॥ ११
कृतांतदूतांसि अनंतदूतीं निरूपिले वैष्णवधर्म संतीं ।
सद्भक्ति त्यांच्या वचनें द्विजाला ऐकोनि पापें अनुताप झाला. ॥ १२
म्हणतसे, 'मम कर्म पहा पहा वृषलिपासुनि वार दहा दहा ।
[18]उपजलों उदरांत अहा ! अहा ! पतित मी पतितांत महा महा. ॥ १३
ब्राह्मण्य म्यां बुडविलें वृषलीपतीनें आयुष्य हें दवडिलें अति दुर्मतीनें.' ।
ऐसें स्मरोनि निज सर्व कुकर्म पापें दुःखी अजामिळ बहू स्वकृतानुतापें. ॥ १४

---

१. दुसऱ्या अध्यायाच्या समाप्तीपर्यंत, ४९ व्या श्लोकापर्यंत. २. श्रीमद्भागवतांत. ३. विष्णुदूतांनीं केलेली गोष्ट. ४. यमाला. (संयमनी–यमाची राजधानी.) ५. तुझ्या आज्ञेचा भंग. ६. विष्णुदूतसमागमानें. ७. अजामिळानें (वृषली–शूद्री.) ८. निष्पाप. ९. चरणकमळाला. १०. पादधूलीला. ११. लहान शरीर धारण करणारा. १२. सूर्य. १३. चार विष्णुदूत. १४. विष्णुदूतांस. १५. यमदूतांनीं. १६. वेदोक्त, वेदप्रणीत. १७. श्लोक २६–२८ पहा. १८. पति पुत्ररूपानें आयेच्या ठिकाणीं उत्पन्न होतो या समजुतीस अनुलक्षून हें वर्णन आहे.

श्लोकत्रयेंकरुनि आणिकही स्वकर्में तो आठवील घडलीं जितुकीं अकर्में ।
जों पूर्वकर्मअनुताप मनास नाहीं तों सत्पथीं रुचि मना उपजे न कांहीं.॥१५
जें दीपतुल्य कुळ कोजळ त्यांत झालों, धिक्कार हा मजचि जो कुपथीं रिघालों.।
स्त्री धाकुटी, बहु भली, तिस टाकिलें म्यां; जे मद्यपी धरिलि ते वृषली अँगम्या.॥
परम वृद्ध पिता जननी बरी मजविणें गैति ज्यांस न दूसरी ।
बहु तपोनिधि आणि तपस्विनी त्यजियलीं अँकृतज्ञपणें वनीं. ॥　१७
आतां मला नरक होतिल मोठमोठे, धर्मघ्न जेथ पैचती अतिदुष्ट खोटे.' ।
ऐसा अजामिळ मनीं वैहुतप्त झाला एथूनि वर्णितिल जें घडलें द्विजाला.॥१८
नरकहरणचिंता प्राप्त होतां द्विजाला, स्मृतिगत हैरिदासप्रोक्त वृत्तांत झाला.।
द्विज मग हरिनामीं आत्मकल्याण मानी म्हणुनि कथिल आतां पंचपद्येंकरूनी.॥
श्लोकद्वयें आठवुनी तयाला, संवाद अन्योन्य जयांत झाला ।
श्लोकत्रयें ब्राह्मण त्या करूनी कल्याण माझें म्हणऊनि मानी. ॥　२०
म्हणे, 'हें प्रैत्यक्षें नयनिं दिसलें, स्वप्न अथवा,
तिघे कोठें गेले धरुनि मज जे वोढिति जिवा ।
अहा ! गेले कोठें पुरुष चैवघेही जिहिं मला
बळें त्यांपासूनी हरुनी नयनानंद दिधला. ॥　२१
मी तों अगण्य पतितांतहि अग्रगण्य प्रख्यात मद्यप तथापिहि काय पुण्य ? ।
कीं देखिलें नयनिं त्या विबुधोत्तमातें तेणें प्रैसन्न मन नाशिलसे तैमातें. ॥ २२
नाहींतरी मज अमंगळपापियाचे, ये केंवि या मरणिं माधवनाम वाचे ? ।
मी दुष्ट नष्ट अतिपातकि काम खोटें, नारायणा म्हणुनि मंगळ नाम कोठें ? ॥
ऐसें असोनिहि मुखीं हरिनाम आलें, नेणों मैहासुकृत कोठुनि हें उदेलें. ।
मी तों स्वयें पतित निर्लज विप्रहंता होणार काय मज हें न जयासि चिंता'.॥
द्विज असें शुभसूचक मानुनी स्वहित केवळ चिंतिल एथुनी ।
कथिल तो सुमनोरथ निश्चयें शुक मुनीश्वर पद्यचतुष्टयें. ॥　२५

---

१. हा सामासिक शब्द असल्यामुळें संधि कर्तव्य असूनही कवीनें केला नाहीं. २. श्लोक २७ पहा. ३. शिरलों. ४. स्वीकारण्यास अयोग्य. ५. आधार. ६. श्लोक २८ पहा. ७. उपकार न जाणून, कृतघ्नपणानें. ८. श्लोक २९ पहा. ९. दुःख सोसतात. १०. अत्यंत पीडित. ११. हरिदासांनीं सांगितलेला. १२. श्लोक ३० पहा. १३. चार विष्णुदूत. १४. स्वच्छ, शांत, विकसित. १५. अज्ञान, दुःख, अंधकार. १६. शुभ. १७. जाणत नाहीं. १८. मोठें पुण्य. १९. हा शब्द येथें संस्कारहीन आहे.

द्विज अतःपर [1]यत्न म्हणे करूं पवन इंद्रिय चित्तहि आवरूं ।
मन बुडे न तमांत पुन्हा जसें करिन [2]साधनवृंद म्हणे तसें. ॥ २६
छेदूं [3]बंध अनादिही प्रथम जो झाला [4]अविद्याबळें
[5]जीच्या आवरणें सुखासि सरतां दुर्वासनेचीं कुळें ।
[6]विक्षेपें बहु कामना उपजतां, कर्मे करी [7]वोंगळें
त्यांचीं भोगिलिया विणें न चुकती जीं कर्ममूळें फळें. ॥ २७
[8]सांख्यें आत्मअनात्मता निवडतां, शब्दें अविद्या हरूं
योगज्ञान[9]हुताशनांत अवघ्या वृत्तींसिही संहरूं ।
तेव्हां [10]संचित नाशतां, उपजती कर्मे अकर्मेपणीं
प्रारब्धासहि भोगितांच सरऊं ऐक्यें उरूं निर्गुणीं. ॥ २८
जों प्रारब्ध असेल तोंवरि भजों सर्वात्मभावें हरी,
पाहों तो [11]स्थिरजंगमीं बहुघटीं मातीच जैसी खरी ।
जे मध्यस्थ अमित्र मित्र अवघे तद्रूप पाहों स्वयें
सर्वांचा प्रिय सोयरा निजसखा आत्मा असा निश्चयें. ॥ २९
ऐसे निश्चय गुंफितां, वृषलिचे फांसे गळां प्रीतिचे
देखे, आठवती विशेषहि [12]रतक्रीडादिकीं जे तिचे ।
या पापेंचि कृतांतपाश पडले होते पहा हो! मला
ऐसें आठवितां विरक्ति उठतां तात्काळ झाला भला. ॥ ३०
ऐसे हे विषयांत दोष नसतां कां टाकिती हो! भले
मिष्टान्नीं विष, येरिती विषय ते त्या ब्राह्मणा वाटले ।
बोले प्रस्तुत [13]आर्यकार्य करणें कीं हे जगन्मोहिनी
माया स्त्रीसम ईस टाकुनि निघों निःसंग संगीं वनीं. ॥ ३१
करुनि [14]मर्कट नाचविलें मला, कट कटा अतिलंपट मी तिला ।
प्रियतमा अधमा मज वाटली, वय समस्त घडी जसि लोटली. ॥ ३२
हा देह मी म्हणुनि मानुनि दुष्टकर्में आयुष्य म्यां सरविलें अवघें अधर्में ।
प्रत्यक्षही जड असत्य जिता शवाला नाहीं प्रतीति इतुकें न कळे जिवाला.॥ ३३

---

१. श्लोक ३५ पहा. २. उपायसमूह. ३. श्लोक ३६ पहा. ४. अज्ञानाच्या जोरानें. ५. अविद्येच्या. ६. चित्तवैकल्यानें, भ्रमिष्टपणानें. ७. वाईट, खराब, अमंगळ. ८. सांख्यशास्त्राप्रमाणें. ९. अग्नीत. १०. सांचलेले, सांठलेलें कर्म (प्रारब्ध). ११. चराचरांत. १२. सुरतलीला. १३. चांगलें काम. १४. श्लोक ३७ पहा.

आतां म्हणे द्विज अहंममता शरीरीं टाकीन जे चिर तृषा रविरश्मिनीरीं ।
उल्लंघनें कठिण यद्यपि विष्णुमाया तन्नामकीर्तनउपाय असे तराया. ॥ ३४

करिन कीर्तन मी दिनयामिनी, स्फुरति कामगृहें सुतकामिनी, ।
जसजसें सुख होइल कीर्तनीं तसतसा मग निर्लज्ज नर्तनीं.' ॥ ३५

अशा कीर्तनीं नर्तनीं चित्तशुद्धी त्वरें होवुनी होतसे ध्यानशुद्धी; ।
हरीच्या पदीं स्थैर्य चित्तास जेव्हां, स्फुरे विष्णु आत्मा स्वत:सिद्ध तेव्हां. ३६

उपजले सुमनोरथ जे जसे द्विज समस्तहि आचरला तसे ।
त्यजिल सर्वहि तो मन नेमुनी, म्हणुनि एथुनियां वदतो मुनी. ॥ ३७

क्षणैकसत्संगतिच्या फळानें केलें तसें सर्व अजामिळानें ।
उदासता ते रुचली द्विजाला सांडूनि दासी हरिदास झाला. ॥ ३८

गंगाद्वारासि गेला, मनिंहुनि पहिला संग तो टाकियेला,
गातां वाचे हरीला मनमळ हरिला, श्रीहरी मोहरीला ।
ध्यानीं तन्निष्ठ झाला, हृदयिं उमजला विष्णु आत्मा द्विजाला,
ध्यातां श्रीमाधवाला भवदव शमला, नामनादें निवाला. ॥ ३९

द्विजाची शुकाचार्य वैकुंठयात्रा वदूं पाहतो पंडुच्या पुत्रपौत्रा ।
असे मूळिंचे पांच हे श्लोक आतां, करीतील टीका सुखें सौख्य गातां.॥४०

कचित् गंगातीरीं हरिगृहिं हरिद्वारनगरीं
निजा चिंता योजी द्विजवर चिदाकाशकुहरीं ।
दृढ प्रत्याहारें नियमुनि मनीं इंद्रियगणा
चिदाकारें चित्तेंकरुनि भजतां विप्र अगुणा. ॥ ४१

चिदाकाराचित्ताहुनिहि निज आत्मा पलिकडे
असें योगी पाहे तरिच मनिं हे उन्मनि पडे ।
चिदाकारें आहे मन म्हणुनि राहेल तितुका
निरोधी त्या वृत्ती उपजतिल हा योग इतुका. ॥ ४२

---

१. सूर्यकिरणांनीं उत्पन्न होणारी जी उदकरूप भ्रांति तिच्या ठायीं. (मृगजळांत.) २. श्लोक ३८ पहा. ३. अहोरात्र. ४. हा शब्द येथें संस्कारहीन आहे, यामुळें सदोष समजला पाहिजे. असे दोष पंडितांच्या काव्यांत पुष्कळ आढळतात. ५. क्षुद्र स्त्री. ६. वृषलीसंग. ७. मोहित केला. ८. संसाररूप दावाग्नि. (वणवा.) ९. वैकुंठास जाणें. १०. परीक्षित् राजाला. (पंडूचा पुत्र अर्जुन, त्याचा पौत्र म्ह० नातु अभिमन्युपुत्र—परीक्षित्.) ११. चैतन्याकाशरूप गुहेंत. १२. इंद्रियांस शब्दादिविषयांपासून परावृत्त करण्यानें. १३. मनाचा लय होतो अशी पांचवी अवस्था.

न जेथें चिच्छक्ती सहजचि असे निर्गुणपणीं
अखंडानंदाचा अनुभव असे ऐक्यसगुणीं, ।
असे देवा जीवा सहज अगुणीं ऐक्यचि परी
असा आत्मा पाहे तरिच कळला त्यासिच हरी. ॥ ४३
अशा अनुभवीं दिल्ही बुडि अजामिळाच्या मनें
समाधि सरतां मनीं किमपि इच्छिलें चिंतनें. ।
अशांत हरिदास ते नयनिं चौघही देखिले
द्विजें वळखिले मनीं सतत जे सुखें रेखिले. ॥ ४४
करी जों नमस्कार चौघांजणाला जसे चौघ ते पांचवा विप्र झाला ।
पडे अंग पूर्वीच गंगाप्रवाहीं भुजा चारि देखे नव्या दिव्यदेहीं. ॥ ४५
करिं गदांबुज अंबुदसांवळा कटितटीं तडिदंबर मेखळा, ।
सतत षोडशवार्षिक कोंवळा हरि करी हरिनाम अजामिळा. ॥ ४६
जलज शंख रथांग गदा करीं, कनकरत्नविमान तयावरी, ।
द्विज अजामिळ तो हरिकिंकरीं मिरविला हरिपार्षदशेखरीं. ॥ ४७
असा विप्र वैकुंठलोकासि नेला, फिरेना पुन्हा, जो असा तेथ गेला. ।
म्हणूनि स्वयें श्रीपती स्वामि जेथें ऋषी बोलतो पावला विप्र तेथें. ॥ ४८

चरण चवथा.

(श्लोक.)

जेथेंचि श्रीपति, अजामिळ तेथ नेला. ऐसें मुनींद्र नृपतिप्रति बोलियेला. ।
भावार्थ कीं न चवती जन त्या विभागीं. तो पावला गति अजामिळ नामयोगीं.॥ १
श्री भू दुर्गा भाग हे तीन जेथें,- श्रीवैकुंठीं पावती धन्य तेथें ।
ज्ञानी भक्त श्रीविभागास जाती, तैशा स्थानालागिं गेला द्विजाती. ॥ २
जय विजय गळाले ते न त्या श्रीविभागीं
गतभवतमशेपें विप्रशापप्रसंगीं; ।
गजे जलचर पूर्वीं दोघ अन्योन्यशापें
गति परमहि जे कां ते न भक्तिप्रतापें. ॥ ३

---

१. हा शब्द संस्कारहीन आहे. २. श्लोक ४२ पहा. ३. श्लोक ४३ पहा. ४. कमळ. ५. चक्र. ६. हरीच्या सेवकांत अग्रस्थानीं. ७. श्लोक ४४ पहा. ८. शुक. ९. परीक्षित्. १०. पतन पावतात. ११. भाग्यवान्. १२. अजामिळ. १३. जय आणि विजय हे विष्णूचे द्वारपाळ. सनत्कुमारांच्या शापानें हे वैकुंठभ्रष्ट होऊन असुरयोनींत जन्म पावले. (भागवत, स्कंध ३ अ० १५.) १४. पडले, भ्रष्ट झाले. १५. हत्ती. १६. नक्र.

लव जरी असती हरिभक्ति ते उभय बंधु धनार्थ न शापिते, ।
म्हणुनि त्याच मतें [1]सनकादिकां कुवचनें वदले हरिसेवकां. ॥ ४

कृष्णार्पणें करुनियां तप यंज्ञ तीर्थें पुण्यें अगण्य बहु जोडियलीं समर्थें ।
नेलें म्हणूनि हरिनें स्वपदासि दीना, श्री[3]भाग लभ्य न म्हणोनिहि भक्तिहीना. ५

[4]श्रीमद्भागवतीं गजेंद्र हरिनें जो सोडवीला स्वयें
[5]इंद्रद्युम्न नृपाळ जो गतभवीं तो वेगळा निश्चयें ।
[7]हे तों पद्मपुराणिंचे निज सखे भाऊ धनाकारण
देती शाप परस्परें द्विजपणीं 'हो नक्र हो वारण. ॥ ६

गजपति धरिला तो गंडकीमाजि नक्रें
स्तुति करि गज तेव्हां मारिला नक्र चक्रें ।
जय विजय असे ते दोघ वैकुंठवासी
[10]असुरपण पुराणीं विप्रशापें तयांसीं. ॥ ७

द्विजेंवर हरिनामें शुद्ध अत्यंत झाला,
[12]परिहरुनि अविद्या आत्मतत्वीं निवाला. ।

---

१. सनक, सनत्कुमार, सनत्सुजात आणि सनंदन हे ब्रह्मदेवाचे चार मानसपुत्र. हे मोठे ब्रह्मनिष्ठ विष्णुव्रतपरायण होते. २. जय विजय हे दोघे ब्राह्मण यजनयाजनरत आणि भगवत्परायण होते, म्हणून त्यांस विष्णूनें वैकुंठीं द्वारपाळ केलें. ३. वैकुंठावतारीं विष्णूनें लक्ष्मीच्या प्रार्थनेवरून नूतन निर्मिलेला वैकुंठभाग. ४. श्रीमद्भागवत, स्कंध ८. ५. हा द्रविड देशाचा राजा होता. हा अगस्तिमुनीच्या शापानें गज झाला अशी कथा श्रीमद्भागवतांत आहे. अध्याय २–४. ६. इंद्रद्युम्न राजाचा संबंध जयविजयांशीं नाहीं, असा सांगण्याचा भाव. ७. जय आणि विजय. हे विष्णुद्वारपाळ पद्मपुराणांतील वर्णनाप्रमाणें सहोदर बंधु होते. हे ब्राह्मण असून यजन हवन करीत असतां, एका प्रसंगीं यांचीं यज्ञदक्षिणेनिमित्त भांडणें झालीं तेव्हां त्यांनीं एकमेकांस रागाच्या आवेशांत शाप दिले–एक हत्ती झाला व एक नक्र होऊन गंडकी नदींत राहिला. (यथार्थदीपिका–अध्याय १४ ओव्या १६१–१७०.) नंतर श्रीविष्णूनें कृपाळु होऊन त्यांस शापनिर्मुक्त केल्यावर ते उभयतां वैकुंठांत द्वारपाळ झाले. ८. द्विज असल्यामुळें शाप देण्याचा अधिकार यांस होता. ९. या दोघा ब्राह्मणांचा यज्ञदक्षिणेनिमित्त कलह होऊन परस्परशापानें एक गज व एक नक्र झाला.) १०. दैत्यपण. ब्रह्मदेवाचे सनकादिक मानसपुत्र वैकुंठास गेले असतां, या जयविजयांनीं त्यांस आंत जाण्याचा प्रतिबंध केला. तेव्हां त्यांस राग आला, व त्यांनीं तुमचें देवत्व जाऊन तुम्ही तीन वेळ असुरयोनींत जन्म घेऊन नंतर पूर्वपद पावाल असा त्यांस शाप दिला. या शापानुसार जय आणि विजय हे अनुक्रमें हिरण्यकशिपु व हिरण्याक्ष, रावण व कुंभकर्ण, आणि शिशुपाळ व वक्रदंत असे तीनदां असुर झाले. ११. अजामिळ. १२. नाशून.

म्हणवुनि हरिनें तो श्रीविभागास नेला
पुनरपि परतेना जो असा तेथ गेला. ॥ ८
या कारणें श्रीशुक बोलिलेला कीं, 'जे स्थळीं श्रीपति तेथ गेला, ।
दुर्गापती भूपति जेथ तेथें गेला न, भावार्थ असाच एथें.' ॥ ९
कोण्ही कैवल्य मोक्षाविण न गणिति, ते बोलती गौण मुक्ती,
जे कां अव्यक्तमात्रीं सतत रत जया नावडे विष्णुभक्ती, ।
कैसें कैवल्य त्यांला पुनरपि सगुणीं लाविलें अंतरंगा
होती सिंधूंत बिंदू हरिजन, मिळती सागरीं जेंवि गंगा. ॥ १०
वनाच्या मुखें सिंधुचा बिंदु जैसा मिळे सागरीं, निर्गुणीं मोक्ष तैसा. ।
सदा भेटते ऐक्य पावोनि गंगा समुद्रीं असी भक्ति हे अंतरंगा. ॥ ११
फिकी मुक्ति भक्तीपुढें ज्ञानियाला, स्वयें मुक्ति देती पहाती तयांला. ।
मुमुक्षूसही कामना मोक्षकामीं, न भक्तास जे देखती मुक्ति नामीं. ॥ १२
पडे देह तों त्याचि देहीं मुकुंदा पहाती जगीं टाकुनी लोकनिंदा, ।
सरे कर्म त्याचें पडे देह जेव्हां, हरी ने स्ववैकुंठ लोकासि तेव्हां. ॥ १३
मुमुक्षू जरी सेविती अंबुजाक्षा, तरी मागती नित्य कैवल्यमोक्षा. ।
स्वभक्तां जरी मुक्तिचारी उपेक्षा हरी मुक्ति भक्तीं तरी दे स्वपक्षा. ॥ १४
स्वभक्तांसही देवुनी दिव्य मुक्ती, हरी देतसे मुक्ति ही माजि भक्ती. ।
जसें नित्यमुक्तां ५ देहत्व देहीं असे देहसारूप्य मोक्षादिकांहीं. ॥ १५
अमृत केवळ सेवुनि राहती परि सुधामधुरत्व न पाहती, ।
अमृत होवुनिही रसनामिसें अमृत सेविति भाग्य पहा कसें. ॥ १६
जनन मरण मेलें, दुःख अज्ञान गेलें,
हरिमय वपु केलें विष्णुलोकासि नेलें. ।
न जळति लव लोळें शेषवक्त्राग्निजाळें
घडतिल विधिगोळे ते न होतील काळें. ॥ १७
विकुंठासुतें निर्मिलें पूर्णकामें हरीनेंचि वैकुंठ वैकुंठनामें, ।
ल्यीं तें नुरे मोक्ष हो नित्य कैसें बरें नेणतां बोलती एक ऐसें. ॥ १८

---

१. श्रीविभागीं. २. अप्रधान. ३. मुख्य तत्व. ४. इच्छा. ५. विष्णूला. ६. विकुंठा ही रैवत मन्वंतरांतील विष्णूच्या अवताराची (वैकुंठाची) माता. हिच्या पतीचें नांव शुभ्र. (भागवत, स्कंध ८ अध्याय ५).

विकुंठेच्या पोटीं हरि मनुजरूपें अवतरे,
　तसी लोकाकारें तनु करुनि वैकुंठ पसरे, ।
यथाकाळें जैसे अजितअवतार प्रगटती
　तसीं लोकाकारें सकळ हरिरूपें उमटती. ॥ १९

करी योगेनिद्रा हरी शेषशायी, लयीं नीजती मुक्त त्याचेच ठायीं; ।
करी सृष्टि होवूनि जागा मुरारी तयीं ऊठती मुक्तही याप्रकारीं. ॥ २०

जयीं निर्मिली सृष्टि होती न कांहीं, विकुंठेस हो! तेधवां ठाव नाहीं. ।
तयीं दाविला लोक जो ब्रह्मयाला विकुंठात्मजें निर्मिलें कीं त्याला. ॥२१

विकुंठेचिया जेंवि पोटासि आला, तसा लोकही तोचि वैकुंठ झाला; ।
विकुंठेचिया तोचि गर्भांत पूर्वी कसा जन्मला जो सदा सर्व उर्वीं. ॥ २२

निजेही लयीं सृष्टि सर्वांत जागे जगीं रामकृष्णादि होवूनि वागे, ।
तरी तें अनादित्व तैसें न भागें न वैकुंठलोकासि सादित्व लागे. ॥ २३

वैकुंठावरि काळचक्र फिरतें कोणी असें बोलती,
　त्यांचे सर्वहि बोल फोल बरवें हें तत्व ते नेणती. ।
नाहीं षड्गुण ईश्वरत्वहि जरी तो योगनिद्रा करी
　काळाचें तरि चक्र हें फिरतसे माना तयाही वरी. ॥ २४

काळीं ईशहि सांपडे, तरि गती दे कोण बोला अरे!
　काळग्रस्त न काळपाश चुकवी ऐसें पहाना बरें, ।
तो जेव्हां निजतो लयीं जन निजे वैकुंठिंचा तेधवां,
　त्या योगांतुनि सर्व मुक्त उठती तो ऊठतो जेधवां. ॥ २५

द्रष्टा सर्व गिळूनि जोंवरि असे वैकुंठही तोंवरी
　योगीं निद्रित तो तई निजति हें कांहीं न त्यां ऊपरी; ।
द्रष्ट्यावांचुनि रज्जु सर्प न दिसे द्रष्टाचि होतां दिसे,
　मायामात्रचि कंठरूप हरिचें तेथें अविद्या नसे. ॥ २६

नव्हे सर्प हा, हार मायाच देहीं, असी शुद्धमाया रमाकांतदेहीं; ।
असे शुद्धमायाच वैकुंठधामीं तया पावला विप्र तो धन्य नामीं. ॥ २७

वैकुंठासि अशा अजामिळ असा नामप्रतापें करी
　गेला भागवतीगतीस न करी कैवल्य जीची सरी. ।

---

१. परमेश्वराचे अवतार. २. जागृतपणा, प्रबोध, विषयांतरव्यावृत्ति करणारी निद्रा. ३. 'सृष्टिकालांत जागे' असाही पाठ आहे. ४. स-आदित्व. ५. वैष्णवगतीला. ६. तुलना.

नामाचा महिमा अतर्क्य [1]निगमा तो एथ कांहीं मुनी
    श्री[2]द्वैपायनपुत्र बोलत असें श्लोकद्वयें नेमुनी. ॥ २८

[3]ज्याणें धर्म समस्तही बुडविले, जो निंद्य दासीपती,
    जो नष्टव्रत, ज्यास नेत असतां भोगावया [4]दुर्गती, ।
ऐशाही समयीं अजामिळ असा तत्काळ तो सूटला;
    नामें श्रीहरिच्या अनादि रचला तो बंधही तूटला. ॥ २९

[5]नोहीं त्याहुनि कर्मबंधन दृढ च्छेदावया आणिखी
    मोक्षापेक्षक त्यास कीर्तन सदां तैसें हरीचें मुखीं ।
नामें जें मन शुद्ध तें रजतमा टाकी तयावेगळें
    तें कर्मी न मिळे पुन्हा हरिगुणीं सप्रेम जें आगळें. ॥ ३०

शुक म्हणे, '[6]भरतान्वयनंदना ! हरिल पातक कर्महि बंधना; ।
अजितकीर्तन ऐकचि सर्वथा, इतर जें तप तीर्थ कथा वृथा. ॥ ३१

प्रायश्चित्त न अन्य नामसम हें श्रोत्यां जरीं बिंबलें,
    गंगा काय करील ये रिति मनीं गंगा बहू तुंबलें; ।
एथें तीर्थपदानुकीर्तन अशा एका पदें श्रीशुकें
    [7]श्लोकीं सूचितसें सभे मुनिजना रायासही कौतुकें. ॥ ३२

गंगाख्य [8]तीर्थ चरणीं उपजे जयाचे, तो विष्णु तीर्थपद बोलति विप्र वाचे; ।
तीर्थांघ्रि तो म्हणुनियां म्हणतांचि पायीं गंगा दिसे अजितनाम समस्तदेहीं. ॥ ३३

नामें स्फुरे तनु समग्र मनांत जेव्हां [9]मंदाकिनी पदनखांत दिसेल तेव्हां; ।
व्यापूनि नाम असणार समस्त अंगा त्याची कसी सरि करी चरणांबुगंगा ? ॥ ३४

पादांगुष्ठींच गंगा त्रिभुवनपतिचें नाम हें अंगअंगा,
    जे कां व्यापी विहंगासननखशिख ते दाखवी अंतरंगा; ।
गंगा ही पापभंगा परिहरुं न शके वासनेच्या कुसंगा,
    हस्तीही त[10]त्तरंगा धुति [11]विषयदिवा इष्टचित्ता[12]पतंगा. ॥ ३५

गंगेंतही गज जसा धुतला तथापी घाली शिरीं धुळि तसें जन चित्त पापीं ।
स्नानेंकरूनि जरि पावन देह झाला पापीं प्रवृत्ति घडणार पुन्हा तयाला. ॥ ३६

---

१. वेदाला. २. व्यासपुत्र. (शुक.) ३. श्लोक ४५ पहा. ४. नरक. ५. श्लोक ४६ पहा. ६. भरतवंशाला आनंद करणाऱ्या, परीक्षित् राजा. ७. ४६ व्या श्लोकांत. ८. विष्णुपदी. ९. गंगा. १०. लाटा. ११. विषयरूप दीप. १२. शलभा.

म्हणाल 'गंगा हरि पूर्वपापें, शुद्धी अशा नामसुधाप्रतापें.' ।
दोहींसही मागुति पापवृद्धी होणार नामीं तरि काय सिद्धी? ॥ ३७
पूर्वीच हा निर्णय एथ झाला, नामीं द्विधा शुद्धि असे जनाला; ।
उच्चारमात्रेंचि हरूनि पापा दावीतसे त्याउपरि प्रतापा. ॥ ३८
आजन्म गंगास्नपनेंचि केलीं दुष्टेंद्रियें तीं विषयीं भुकेलीं, ।
गंगातटींही हरिकीर्तनानें संहारिला संग अजामिळानें. ॥ ३९
करुनि तीर्थ तप व्रत मागती श्रवण कीर्तन केवळ सद्गती, ।
म्हणुनियां हरिनामसुधा जसी न गति जान्हवि देवुं शके तसी. ॥ ४०
हरि जसें जळ अन्न तृषा क्षुधा, हरि तसी जनभूकतृषा सुधा; ।
परि सुधा अजरामरता करी, न इतरें, हरिनाम अशापरी. ॥ ४१
जगीं नानाकामी धरुनि रति नामींच तरले,
विरक्तीच्या धामीं धरुनि रति नामींच उरले; ।
सदा तीर्थग्रामीं तरि विषयभूमीं उतरले,
सुखेंही स्वर्गामीं विषयविषधामींच भरले. ॥ ४२
याकारणें तीर्थपदानुकीर्तनें दुर्वासनेपासुनियां निवर्तनें, ।
चित्तें असंगें हरिनामनर्तनें होतां न होती विषयीं प्रवर्तनें. ॥ ४३
जरि म्हणाल 'अशा हरिकीर्तनीं विषयसंग न कां उपजे मनीं?' ।
तरि शुकोदित उत्तर अर्ध हा विशद अर्थ करूनि बरा पहा. ॥ ४४
हरिगुणीं उपजे रति जेधवां, रजतमीं न मिळे मन तेधवां; ।
सतत गुंफिल जो गुणरत्न तो न करि काचमणीप्रति यत्न तो. ॥ ४५
अमृतसिंधुतरंग उठे मुखीं नमन आठवि आंबिल तें मुखीं, ।
हरिगुणीं मन घे जरि आवडी, मग न दे विषयांत कधीं बुडी. ॥ ४६
विषय राजस तामस इंद्रियें विमळसत्वचि मानस निश्चयें, ।
अमळसत्वहि तुच्छसुखस्पृहा रजतमाकरितां धरितें पहा. ॥ ४७

---

१. स्नानें. २. ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें अशीं पांच पांच मिळून दहा होतात:–'श्रोत्रं त्वक् चक्षुषी जिह्वा नासिका चैव पंचमी । पायूपस्थं हस्तपादं वाक् चैव दशमी स्मृता ॥' (मनुस्मृति–अध्याय २ श्लोक ९०). ३. विषय पांच आहेत:–'रूपं शब्दो गंधरसस्पर्शाश्च विषया अमी' (अमरकोष–१, ५, ७). ४. भागीरथी. ५. हरिनामाशिवाय अन्य उपायानें. ६. गोडी. ७. परतणें, मागें फिरणें. ८. 'न यत्पुनः कर्मसु सज्जते मनो रजस्तमोभ्यां कलिलं ततोऽन्यथा' इत्यादि उत्तर अर्ध (श्लोक ४६). ९. स्पष्ट. १०. लाटा.

अमुखमिश्रित सर्वहि हीं सुखें सुखचि तें हरिकीर्तन जें सुखें, ।
जरि मनासि असें सुख आढळे रजतमीं न कधीं मग तें मिळे. ॥ ४८
विषय कर्म असंग न घे मनीं निरत जो हरिकीर्तननर्तनीं, ।
म्हणुनि तीर्थतपोव्रत त्याहुनी अधिक हें हरिनाम म्हणे मुनी. ॥ ४९
हरियले जनसंशय हो !. शुकें कथियलें हरिकीर्तन कौतुकें ।
प्रकरणश्रवणस्मृतिवर्णनीं कथिल पद्ययुगें फळ एथुनी ॥ ५०
जो हें [1]असें नरकहारक गुह्य कर्णी ऐकेल, जो [2]सदितिहास विलास वर्णी, ।
तोही न जाय नरका, न तयास डोळां पाहों कदापिहि शके यमदूतमेळा. ॥ ५१
[3]नै जाय नरकाप्रती नवल काय हें भूपती ?
अमंगळहि पूज्य तो मनुज विष्णुलोकीं अती, ।
असा सदितिहास हा श्रवणवर्णनें सद्गती
करी जरि अनुष्ठवे, फळ न बोलवे तें किती. ॥ ५२
फळ इतरपुराणीं तीर्थयज्ञव्रतांचें
वदति रुचिनिमित्तें तेथ तें लभ्य कैंचें ? ।
न वदति फळ तैसें बोलणें [4]तैथ्य जेथें
कटुक रुचिनिमित्तें बोलती तींत एथें. ॥ ५३
[5]धर्मः प्रोज्झितकैतवोऽत्र म्हणुनी श्रीव्यास ऐसेपरी
षष्ठस्कंधमुखींच श्लोक दुसरा तेथें प्रतिज्ञा करी; ।
ज्या धर्मी कपटार्थ लेशहि नसे तो ये स्थळीं बोलणें,
हा वाक्यार्थ म्हणूनि एथ अवघें नाणें खरें तोलणें. ॥ ५४
जो लाभ या श्रवणवर्णनिं बोलियेला कीं तो अमंगळ तरी हरिलोक त्याला, ।
श्रद्धेकरूनि हरिभक्ति करूनि जेव्हां ऐकेल वर्णिल, फळप्रद होय तेव्हां. ॥ ५५
श्रोता श्रद्धायुक्त ऐकेल जेव्हां तो वैकुंठालागिं जाईल तेव्हां, ।
जो भक्तीनें यासि वर्णील वक्ता [6]श्लोकीं सांगे लोक हा त्याचि भक्तां. ॥ ५६
श्रद्धा आस्तिकनामबुद्धि महिमा जो वर्णिती तो खरा,
ऐसा निश्चय बाणतां स्वचरणें वैकुंठ येतें घरा. ।

---

१. श्लोक ४७ पहा. २. चांगला इतिहास, पापनाश करणारा म्हणून 'सद्' हें विशेषण योजिलें आहे. ३. श्लोक ४८ पहा. ४. सत्य. ५. अत्र (या भागवतामध्यें) प्रोज्झितकैतवः धर्मः (निष्कपट असा धर्म) सांगितलेला आहे. ६. 'शृणुयाच्छ्रद्धया युक्तो' इत्यादि ४७ व्या श्लोकांत.

ऐसाही इतिहास हा परिसती त्यांला नुपेक्षी हरी,
त्यांचीं आचरणें अमंगळ जरी नासूनि तीं उद्धरी. ॥ ५७
म्हणुनि शेवट पद्यहि येरिती वदतसे शुक भूमिपतीप्रती; ।
प्रकरणश्रवणीं हरिकीर्तनीं तरति विस्मय हा न गमे मनीं. ॥ ५८
मेरों टेंकला विप्र पुत्रोपचारें, हरीचें वदे नाम लोकैप्रचारें; ।
असा पातकी विष्णुलोकासि गेला, म्हणे भक्तिभावें उणें काय त्याला?॥ ५९
प्रकरणश्रवण स्मृतिवर्णनें धरुनि भाव मनीं हरिकीर्तनें, ।
नवल काय जगीं जरि तो तरे? श्रवणमात्र करूनिहि उद्धरे. ॥ ६०
प्रकरणश्रवणेंहि तरे जई नवल काय अनुष्ठिल तीं तईं? ।
म्हणुनि भाव असा शुक बोलिला, तँदनु 'नामसुधे'त निरूपिला. ॥ ६१
षष्ठस्कंधमुखीं अजामिळकथा अध्याय हा दूसरा,
श्रीमद्भागवतांत नाममहिमानिर्धार जेथें खरा. ।
टीका 'नामसुधा' म्हणूनि रचिली हे वामनाच्या मुखें
श्रीकृष्णें सुरस प्रसन्नवदनीं कानीं मनीं दे सुखें. ॥ ६२

अध्याय तिसरा.

चरण पहिला.

(श्लोक.)

अध्यायीं तिसऱ्या मुरारिचरणप्रेमें महानिश्चयें
दूतांतें यमधर्मराज वदतो नामप्रताप स्वयें. ।
ऐसें गुह्य कसें अहो! प्रकटलें श्रोत्यांस हें विस्मयें
होती यास्तव वर्णितो मुनि नृपप्रश्नास पँद्यद्वयें. ॥ १
राजा पूसतसे, 'स्वसेवकजनीं हें वर्णिल्या ऊपरी
त्यांसी तो यमधर्म त्या अवसरीं बोले कसी वैखरी? ।
आज्ञा मोडुनि पाश तोडुनि बळें वैकुंठिच्या किंकरीं
पापी सोडविला असें परिसतां बोले कसें त्यावरी? ॥ २

---

१. 'म्रियमाणो हरेर्नाम' इत्यादि ४९ वा श्लोक पहा. २. पुत्राच्या निमित्तें. ३. लोकाचारास अनुसरून म्हणाला, भक्तिभावानें नामोच्चारण केलें असें नव्हे; 'मरों टेंकला' म्हणून अवश आणि श्रद्धाविहीन होता. ४. करील. ५. त्या वर्णनास अनुसरून. ६. निश्चय. ७. स्कंध ६ अध्याय ३ श्लोक १–२ पहा. ८. वाणी.

स्वामी ! हा यमदंडभंग कवणापासूनि आम्ही असा
नाहीं आइकिला, तुम्ही कथियला नामप्रतापें जसा. ।
हे इत्यादिक लोकसंशय जगीं छेदी असा दूसरा
नाहीं यास्तव धर्म काय वदला तो वाद सांगा बरा.' ॥ ३
मुनिवरासि असें धरणीश्वरें चरित हें पुसतां अतिआदरें, ।
अजितनाममहत्वसुधारसें निववितो शुक मागुति या मिसें. ॥ ४
शुक म्हणे, 'नृपती ! हरिकिंकरीं फिरविले यमकिंकर यापरी, ।
सकळ सांगति सूर्यसुताप्रती स्वपति जो यम संयमनीपती.' ॥ ५
कृतांतासही ऐकतां क्षोभ व्हावा धरूनी अशा बोलती दुष्ट भावा. ।
असें बोलतां सप्तपद्यें विचित्र स्वयें सांगतो राजया व्यासपुत्र. ॥ ६
शुक म्हणे, "यमदूत यमापुढें वदति कोपकरें वचनें दृढें; ।
म्हणति, 'शासनकार अहो ! किती त्रिभुवनीं वद संयमनीपती ! ॥ ७
करिति दंड उदंडहि जेधवां नियमभंगचि कीं मग तेधवां ? ।
सरलिया वय आणविशी जया इतर येवुनि सोडविती तया. ॥ ८
करिति दंड अनेक असे जई, प्रभुपणें अवघेचि वृथा तई; ।
सकळ मंडळनाथनृपासनें जसि परस्पर मोडिति शासनें. ॥ ९
तुजचि आजिवरी प्रभु लेखिलें, न कधिं शासन आणिक देखिलें, ।
नवल आजिच हें जनिं वर्तलें, परम दुर्धर शासन पर्तलें. ॥ १०
पतित केवळ जो वृषलीपती द्विज तुझ्या वचनें नरकाप्रती ।
धरुनि चालवितां वरि सांवळे पुरुष चारि चतुर्भुज पावले. ॥ ११
तिहिं असें तव शासन मोडिलें, पतितबंधन तें दृढ तोडिलें; ।
कवण ते प्रभु ! सांग बरें परी श्रवण योग्य असे असिले तरी. ॥ १२
आकर्षिला पतित घालुनि पाश जेव्हां, 'नारायणा !' म्हणुनि मारिलि हाक तेव्हां; ।
चौघांचिही उडि तया समयांत आली, आलों झणी भिसि असी ध्वनि दीर्घ बोली. १३

---

१. यमधर्म. २. शुकाला. (ज्याचें मन दुःखानें उद्विग्न होत नाहीं, सुखाच्या ठायीं ज्याची इच्छा रहात नाहीं, आवड भय आणि क्रोध हीं ज्याचीं निवृत्त झालीं आहेत, अशा पुरुषाला 'स्थिरबुद्धि मुनि असें पंडित म्हणतात. भगवद्गीता—अध्याय २ श्लोक ५६.) ३. सूर्यपुत्र (जो यम) त्याला. ४. संयमनी नाम नगरीचा प्रभु. (यम.) ५. यमाला. ६. क्रोध. ७. श्लोक ४–१० पहा. ८. त्री-लोकाचे शास्ते, नियमन करणारे. ९. आज्ञोल्लंघन. १०. अनेक शास्ते असणें व्यर्थ आहे. ११. चक्रवर्ती राजा. १२. आज्ञा. १३. शास्ता. १४. अजामिळ. १५. आज्ञेनें.

'महाराज ! ते सांग हे कोण वाचे?' यमातें असें पूसती दूत त्याचे. ।
असें ऐकतां त्या यमें काय केलें? शुकें हें वदायास आरंभियेलें. ॥ १४
शुक म्हणे, 'यमकिंकर ये रिती पुसति, ऐकुनि संयमनीपती ।
हरिपदांबुज हें स्मरला मनीं मग वदे हृदयीं सुख मानुनी. ॥ १५
यम म्हणे स्वमनीं यमकिंकरा मजविणें न दिसे प्रभु दूसरा, ।
म्हणुनि जो अखिलेश रमापती प्रथम वर्णिल त्यास तयांप्रती. ॥ १६
प्रभु मजविण मोठा ज्याचिया चित्स्वरूपीं
स्थिरचरजग ऐसें [1]अंबरें तंतुरूपीं ।
स्थिति भव लय तीन्हीं [2]अंशमात्रें करीतो
रविसुत म्हणतो कीं स्वामि माझा हरी तो. ॥ १७
स्वयें विष्णुरूपें करी जो स्थितीतें जगत्कर्तृता त्याच लक्ष्मीपतीतें ।
करी सृष्टि तो ब्रह्मरूपें मुरारी तसा रुद्ररूपेंचि संहारकारी. ॥ १८
वृषभनासिकिं घालुनि वेसनी वश करूनि जसा फिरवी धनी ।
सकळ लोक जया वश येरिती अवधियांहुनि थोर रमापती. ॥ १९
ऐसेंच तत्व तरि टाकुनि वासुदेवा शास्त्रज्ञही करिति कां पर अन्यसेवा? ।
ऐसे कथीं म्हणति ते परधर्म आतां याचें रहस्यहि वदेल तयां स्वदूतां. ॥ २०
लोकीं द्विपाद पशु सर्वमनुष्य झाले, दुर्वासनामयवनांत पळों निघाले, ।
बांधोनि त्यांस सकळांसहि उद्धरावें केलें तदर्थ निजवैखरिरूप दावें. ॥ २१
तद्वैखरी निगमरूपचि थोर दावें जेथें अनेक गळबंधन देवनावें, ।
तेथें असो भलतिया गळबंधनीं तो कैसा तरी निगमदामनिबद्ध होतो. ॥ २२
दाव्यांत बद्धपशु जे तितुक्यांस चारा घाली धणी म्हणुनि धांवुनि येति दारा, ।
येवूनियां धरितसे पशु आपलाला थारा, तथापिहि न जाणति त्या धण्याला. २३
याकारणें निगम सर्वहि थोर दावें, इंद्रादिरूपगळबंधन त्यांत नांवें, ।
कोण्या मिसेंकरुनि वैदिककर्म केल्या स्वर्गादिसद्गति न दुर्गति त्यास मेल्या. २४
यज्ञादि सर्वहि फळें हरि तोचि देतो इंद्रादि मुख्य म्हणऊनि यजी जरी तो, ।
हे अस्मदादिक असीं निगमांत नांवें मूढा जनासि गळबंधन हेंच दावें. ॥ २५
आम्हासि आहुति समर्पिति आणि पूजा, आम्हीं शिरीं धरुनि पाववुं देवराजा, ।
दाव्यांत बद्धपशुवत् गळबंधनेंही आम्ही उपास्य परि बाह्य जसे विदेही. ॥ २६
आम्हांस सर्व अधिकारहि वासुदेवें हे दीधले विविध नेमुनि देवदेवें, ।
हीं शासनें शिरिं धरूनि भितों तयाला, आम्हां स्वतंत्रपण कोंवि घडेल बोला? २७

---

१. पटांत. २. ब्रह्मा, विष्णु आणि रुद्र या अंशरूपांनीं. ३. वेदरूप दाव्यांनें अत्यंत बद्ध.

यमास सर्वोत्तमतातयाचे जे बोलिले दूत सकोप वाचें, ।
यमें दिलें उत्तर हें तयांतें स्मरोनि सर्वेश्वर विष्णु चित्तें. ॥ २८

चरण दुसरा.

(श्लोक.)

समस्तांहुनि थोर गोविंद ऐसें कळे जे रिती बोलिला धर्म ऐसें, ।
तयाचेच ते चौघेही दूत आतां असें धर्म बोलों पहातो स्वदूतां. ॥ १
तिहीं मोडिलें तूझिया संयमाला, असें बोलिले दूत जे कां यमाला, ।
वदाया तया गोष्टिच्या उत्तरातें पुन्हा वर्णितो धर्म सर्वेश्वरातें. ॥ २
सगुणनिर्गुण एक रमापती, म्हणुनि वर्णितसे यम त्या प्रती, ।
सगुण इच्छितसें नकळे कसें, कथिल पद्ययुगें पहिलें तसें. ॥ ३
मी धर्मराज सुरराज दिशाधिराजे ब्रह्मादिदेव ऋषि आणिक थोर जे जे, ।
नेणों तदिच्छित न जाणति तत्त्ववेत्ते ऐशास जाणति कसे जन आणि ते ते? ४
सगुणचेष्टित हें न कधीं कळे, अगुण तो कवणासहि नाकळे, ।
म्हणुनियां वर संयमनीपति अकळ निर्गुण वर्णिल त्यांप्रती, ॥ ५
प्राणेंद्रियादि सकळांसहि जो कळेना, वाचेस आणिक मनासिहि आकळेना, ।
शुद्धें मनें अनुभवाप्रति ये तथापी, तेव्हां पतंग मन होय चिदात्मदीपीं. ॥ ६
ऐसा अतर्क्य हरि त्या प्रभु माधवाचे ते दूत होतिल म्हणे यमधर्म वाचे, ।
श्लोकद्वयेंकरुनि हेंचि वदेल आतां टीकामुखें करुनि होइल सौख्य संतां. ॥ ७
तुम्हि मनोहर जे नर देखिले निजसुखात्मरसें करिं रेखिले ।
मज गमे बहुतेक रमापतीजवळि ते असणार महामती. ॥ ८
हरिगुण हरिरूपीं दूत ते माधवाचे
हरिमयजग दृष्टीं पाहती नामवाचे; ।
सुरवर शिरिं त्यांच्या वंदिती पायधूळी,
त्रिभुवनिं हरिभक्तां रक्षिती सर्वकाळीं. ॥ ९
जगिं अदृश्यपणें जन लक्षिती, भगवदीक्षणपात्र अपेक्षिती, ।
हरिजनासि कधीं न उपेक्षिती, मजहिपासुनि ये रिति रक्षिती. ॥ १०
'नारायणा!' म्हणुनियां म्हणतांचि वाचे ते छेदिले तिहिंच तैं दृढ पाश त्याचे, ।
कानीं मुखांत नरकांतक नांव जेथें कैचें उरे नरकदुर्गतिदुःख तेथें ? ॥ ११

---

१. ब्रह्म्याच्या बापाचें. (विष्णूचें.) २. हा शब्द संस्कारहीन आहे. अशीं उदाहरणें पंडितांच्या कवितेंत पुष्कळ आढळतात. ३. मनोनिग्रहाला. ४. त्यानें इच्छिलेलें.

वाटे तयां धर्म समस्त जाणों नामप्रतापास किमर्थ नेणों. ।
येथें पहा येविषयीं स्वदूतां श्लोकत्रयें वर्णिल काय आतां. ॥ १२

श्रीमद्भागवतांत भक्त हरिचे सप्रेम वाखाणिती
जे साक्षाद्भगवन्मुखें प्रगटले कोण्ही तयां नेणती. ।
ते श्रीभागवताख्यधर्म कळती कैसे तुम्हाला अरे !?
जो बाराजण मात्र जाणत असों, ऐका तयातें बरें. ॥ १३

ब्रह्मा शंभु कुमार नारद शुक प्रल्हाद किंवा बळी
कीं वैदेहि मनु स्वयंभुसुत जो कीं कौरवाचे कुळीं ।
जो गंगासुत भीष्म आणि कपिल प्रख्यात कीं मी स्वयें
जाणों वैष्णवधर्म जो कळकिया प्राणी तरे निश्चयें. ॥ १४

हा श्रीभागवताख्यधर्म इतुक्यां बाराजणां ठावुका,
कां तो गुप्त असा म्हणाल, तरि तें सांगेन मी आइका. ।
जो कां गुह्य निजात्मबोध गुरुच्या भक्तीविणें नाकळे,
तो हा वैष्णवधर्म विष्णुकरुणेवांचूनि कैसा कळे ? ॥ १५

विज्ञान जें अतिरहस्य विशुद्ध वेदीं, तेथेंचि भागवतधर्म न भक्ति भेदीं, ।
ज्याकारणें प्रिय कलत्र सुतादि वित्तें तेव्हांचि भक्ति जरि तो उमजेल चित्तें. १६

म्हणविती बहु वैष्णव आपणा, परि न जाणति भक्तिचिया खुणा; ।
हरि असें दुसरें जरि नावडे तरिच ते हरिभक्ति तयां घडे. ॥ १७

प्रिय हरी सकळांहुनि जाणती परि जयास्तव ते प्रिय नेणती, ।
भजति कीं सुख दे हरि आपणा प्रियतमीं निजजीव हरी उणा. ॥ १८

निजसुखार्थ धनादि जसीं प्रियें प्रिय हरी स्वसुखार्थचि निश्चयें, ।
धन सुताहुनि आवडि आपुली तसि हरीहुनि भक्ति नव्हे भली. ॥ १९

भजति मुक्तिनिमित्त हरी जरी निजनिमित्त तदर्थ नव्हे तरी, ।
भजति मानधनार्थ नृपा जसे हरिस मुक्तिनिमित्तक हे तसे, ॥ २०

जरि न मुक्तिनिमित्तहि सेविती, तरि किमर्थ उपास्य रमापती ? ।
जगिं वृथाचि न मंदहि वर्तती, वदति शास्त्रविशारद येरिती. ॥ २१

---

१. पुढील श्लोकांत सांगितलेले. २. सनत्कुमार. ३. जनक. ४. नारद. ५. यम. ६. मोक्ष पावे. ७. श्लोक २१ पहा. ८. स्त्री. ९. शास्त्रकुशल.

प्रयोजनावांचुनि मूर्ख ते ही प्रवर्तती न त्रिजगांत[1] देही; ।
शास्त्रज्ञ होवूनि वृथा हरीला कां सेवितां ? हें समजोनि बोला. ॥ २२
म्हणाल आतां गुण गोड भारी याकारणें आवडतो मुरारी, ।
सुधा बहू गोड सुरेंद्रलोकीं[2] ऐकोनि तीतें न भजाचि कां कीं ? ॥ २३
स्वभक्ता न जाणे सुधा आणि कांहीं कृपाळू हरीसारखी होत नाहीं. ।
असें बोलती तें तयाला पुसावें कृपा घेवुनी काय सांगा करावें ? ॥ २४
कोण्या प्रकारें निजदुःख नाशी नासूनि दुःखा करि सौख्यराशी, ।
या कारणें तो प्रिय देव जेव्हां स्वप्रीति देवाहुनि थोर तेव्हां. ॥ २५
निजसुखार्थ हरी प्रिय जेधवां, अधिक आपुलि आवडी तेधवां, ।
हरिहुनी प्रिय आणिक ही असी निगमसंमतभक्ति[3] घडे कसी ? ॥ २६
मैत्रेयीप्रति[4] याज्ञवल्क्य[5] निगमीं[6] विस्तार हा बोलिला,
कीं ज्यालागिं समस्तही प्रिय असा आत्माच हा आपला; ।
जो कां आवडतो निमित्त नसतां तो जाणसी तेधवां,
कांहीं ही तुज जाणणेंचि न उरे सर्वज्ञ तूं तेधवां. ॥ २७
जें जें लौकिकसौख्य वैदिकहि जें ज्या आपणा कारणें,
वाटे आवडतें तसा प्रियतम[7] स्वात्माचि[8] जो आपणे; ।
ज्याची आवडि निर्निमित्त[9] हरि ही ज्याकारणें आवडे
तोचि श्रीहरिसा कळे तरिच हे सद्भक्ति[10] ठायीं पडे. ॥ २८
आत्मा सर्वजडप्रकाशक असें लोकीं बहू जाणती,
जाणोनि श्रुतकीर्तनादि सद्गुणप्रेमा मनीं नेणती; ।
कोण्ही ते सद्गुणींच निष्ठ परि हा आत्मा प्रिय श्रीहरी,
ऐसें भक्तिरहस्य नेणति न हे सद्भक्ति दोहीं परी. ॥ २९
म्हणतसे श्रुति कीं पशुतुल्य तो इतर मानुनियां हरि सेवितो, ।
म्हणुनि आत्मपणें हरि सेवणें परमवैष्णव तो तरि बोलणें. ॥ ३०

---

१. त्रिलोकीं. २. देवलोकीं. ३. वेदमान्य भक्ति. ४. याज्ञवल्क्य मुनीच्या दोन स्त्रियांतील एक. ही मोठी ब्रह्मनिष्ठ होती. दुसऱ्या स्त्रीचें नांव कात्यायनी. मैत्रेयीनें ब्रह्मविद्येचें ज्ञान आपला नवऱ्यापासून संपादिलें. ५. हा मोठा ऋषि होता. मिथिलाधिप जनकानें याजपासून ब्रह्मविद्या संपादित केली. ६. वेदांमध्यें (येथें) बृहदारण्यक नामक उपनिषद्ग्रंथांतर्गत मैत्रेयी याज्ञवल्क्य यांच्या संवादांत. ७. अतिप्रिय. ८. निज आत्मा. ९. कारणरहित. १०. उत्तम भक्ति.

श्रुत्यर्थ तो स्पष्टचि दीसताहे, न भेद हा वैष्णवधर्म साहे; ।
ऐक्येंचि जें कां भजणें हरीचें तेथेंचि हें भागवतत्व साचें. ॥　३१
गुरुमुखें कळली [1]स्वचिदात्मता तदुपरांतिक जो गुरु देवता ।
उभयभक्ति निजात्मपणें करी, सकळ होय कृपा गुरुची तरी. ॥　३२
ऐसेंचि [2]बोले श्रुति 'यस्य देवे' म्हणूनियां अर्थ इचे पहावे. ।
धरूनि येथें स्फुट या श्रुतीतें यथामति व्याकरिजेल तीतें. ॥　३३
श्रुत्यर्थ कीं 'तत्वमसी'ति वाक्यें देवीं जसी भक्ति निजात्मऐक्यें; ।
जैसीच देवीं गुरुभक्ति जेव्हां तैसी करी सिद्धि तयासि तेव्हां. ॥　३४

आत्मानात्मविवेकमात्र गुरुच्या तेव्हां कृपेनें कळे,
[3]जीवेशैक्यउपाधितें निरसितां शिष्यास तें आकळे; ।
देवीं आत्मगत प्रियत्व उमजे तैसें गुरूचे स्थळीं
ऐसी भक्ति करील चित्तलहरी तेव्हां गुरे चिज्जळीं. ॥　३५
चित्ताची लहरी [4]चिदंबुधिजळीं त्याची मुरे जेधवां,
चैतन्यास जडांत तंतुवसनीं देखे असें तेधवां; ।
ज्ञानाचा [5]परिपाक होय, परि हें सर्वोत्तमभावीं जयीं
भक्ति श्रीगुरुदेवपादकमळीं याची ठसावे तयीं. ॥　३६

सहज आवडिजे [6]निजिचा निजीं जितुकि भक्ति मुकुंदपदांबुजीं, ।
श्रवण कीर्तन आवडिनें असा न करि वैष्णव तों बरि तो कसा. ॥ ३७
गुरुमुखें कळल्यावरि आत्मता सगुणभक्ति निरर्थक तत्वता, ।
म्हणति वैष्णव तेहि न सर्वथा वदति अद्वयशास्त्र वृथा कथा. ॥ ३८
श्रवण कीर्तन भक्ति न जोंवरी मनन तों सगुणीं स्थिरता धरी, ।
निज चिदात्मकता कळली जरी न हरिभक्तिविणें स्थिरता तरी.॥ ३९
म्हणुनियां म्हणते श्रुति कीं जयीं गुरुरमापतिभक्ति घडे तयीं, ।
गुरुवरें कथिले निगमार्थ ते अनुभवीं करिताति कृतार्थते. ॥　४०
सहज आत्मपणें हरि आवडे सगुणभक्ति तयावरि हे घडे, ।
अनुभव स्थिर होय तया नरा तरिच केवळ वैष्णव तो खरा. ॥　४१
म्हणुनि वैष्णव दुर्लभ या जगीं इतर वैष्णवता मिरवे उगी, ।
म्हणुनि वैष्णवधर्महि धर्म हा अकळतत्त्व तयासि वदे पहा. ॥　४२

---

१. स्व-चित्-आत्मता. २. बोलिजेल. ३. जीव-ईश-ऐक्य. ४. चिद्रूपसमुद्रोदकीं. ५. पक्वदशा.
६. आपले ठायीं.

बाराजणासि हरिभक्तिरहस्य ठावें ब्रह्मादि ते कथियले यमधर्मदेवें, ।
ते थोर सिद्ध इतरां अधिकार तेथें नाहीं म्हणाल तरि धर्म वदेल येथें. ॥ ४३

मनुष्यलोकांत मनुष्यलोकीं मनुष्यमात्रासहि धर्म हा कीं, ।
श्रीवासुदेवीं निजभक्तियोगें आत्मत्वभावें भजणें असंगें. ॥ ४४

हा भक्तियोग घडणार कसा मनुष्यां? बोलेल तो यम उपाय तयां स्वशिष्यां. ।
श्लोकांत या चरणिं शेवटिल्याच पाहा भक्तीस साधन उपाय वदेल जो हा. ४५

हरिगुणश्रवणें हरि आवडे भजन त्यावरि आवडिनें घडे, ।
परि न पातकि या श्रवणीं रिती परमसाधन नाम असे रिती. ॥ ४६

कोण्या मिसें ये हरिनाम वाचे, जळोनि जाती अतिदोष त्याचे. ।
ये चित्त जेव्हां श्रवणादि गोडी गोडी हरीची मग त्या न सोडी. ॥ ४७

श्रोते हो! यमधर्म वाक्य वदला हें सूक्ष्मदृष्टीं पहा
कीं नामग्रहणादिकींकरुनियां सद्भक्तिचा योग हा. ।
तेंही कीर्तन हें नव्हे ग्रहण हें जें कां मुखीं उच्चरे
श्रीमन्नाम तसें करी ग्रहण तें पापाब्धि जेणें तरे. ॥ ४८

कोण्या मिसेंही हरिनाम वाचे येईल भाग्येंचि करूनि याचे, ।
श्रद्धा तया ऊपरि कीर्तनाची ते तों कृपा श्रीमधुसूदनाची. ॥ ४९

जेथें निदर्शन अजामिळ पुत्रनांवें 'नारायणा!' म्हणुनिही म्हणतां स्वभावें ।
झालाचि मुक्त, म्हणऊनि यम स्वदूतां श्लोकद्वयेंकरुनि हेंच वदेल आतां. ॥ ५०

उच्चारमात्रेंचि अजामिळाला प्रसन्न नामें जगदीश झाला. ।
हा एक पद्यें महिमा स्वदूतां बोलेल आधीं यमधर्म आतां. ॥ ५१

मुखीं नाम तन्नामकाच्याच भावें असें कीर्तन श्रीपतीचें म्हणावें, ।
म्हणे नाम जाणोनि तन्नाम काला न जाणोनि तो नामउच्चार झाला. ॥ ५२

नामोच्चारण विप्र मात्र करितां कैसा पहा सूटला,
जो दुर्भेद्य कृतांतपाश तुमचा तोही कसा तूटला? ।
नामोच्चारमहत्वधर्म वदतां प्रेमा मनीं दाटला
दूतांला यम 'पुत्र हो!' म्हणतसे, स्नेहाब्धि तो लोटला. ॥ ५३

'पहा नवल पुत्र हो!' यम म्हणे स्वदूतां कसें
नजाणतहि ये मुखा सहज नाम तेंही असें, ।

---

१. श्लोक २२ पहा. २. बोलें. ३. दृष्टांत. ४. जगत्-ईश. ५. तत्-नामक. ६. श्लोक २३ पहा. ७. भेदावयास अशक्य. ८. यमपाश.

अजामिळहि सूटला इतुकियाचमात्रें त्वरें
म्हणूनि हरिभक्तिचीं प्रथम साधनें हीं अरे ! ॥ १४

सहज नामहि नाशक पातकां स्मरण कीर्तनरूप तयासि कां ? ।
परम भक्ति रमापतिकीर्तनें प्रथम यास्तव नामचि साधनें. ॥ १५

बोलेल ऐसें यमधर्म आतां नामप्रतापासि तयां स्वदूतां ।
तीं आयका हो ! वचनें विचित्रें पीयूषरूपें निजकर्णपात्रें. ॥ १६

म्हणे यम तयांप्रती अघ हरावया कारणें
समर्थ हरिकीर्तनें म्हणुनि काय हें बोलणें ? ।
उगेंचि म्हणतां मुखें निजसुतासि नारायणा
पहा परम मुक्ति ही कसि अजामिळा ब्राह्मणा. ॥ १७

जळति अग्निकणेंचि तृणें जरी तरि तयां प्रबळानळ कां परी ? ।
भलतसें हरिनाम अघें हरी श्रवणकीर्तन कां तरि त्यावरी ? ॥ १८

चित्तीं नाम म्हणे स्मरे स्वहृदयीं तें नाम ज्याचें तया,
ऐसा तो जप आणि उच्च म्हणणें तें नाम जाणोनियां; ।
तें संकीर्तन आणि नाम म्हणणें नेणोनि तन्नामका
तो उच्चार अजामिळासि फळला कैसा पहा कौतुका. ॥ १९

'नारायणा!' म्हणुनि केवळ आत्मजाला आक्रोशतां द्विज अजामिळ मुक्त झाला. ।
त्यालागिं काय म्हणणें अघमात्र नाशी संकीर्तनें जिहिंकरूनि दुःखांबुराशी. ॥ ६०

अजर अमर होती ज्या सुधेच्याच पानें, प्रथम सहज नाशे क्षुत्तृषादैन्य त्यानें, ।
क्षुधित तृषित मानी लाभ तो तोचि भारी अघहर फळ नामीं वर्णिती या प्रकारीं.॥ ६१

नामद्रुमीं फळ चतुर्विध मुक्ति जेथें तें पापताप हरणें तरि पुण्य तेथें, ।
जें वीरसैन्य भुवनत्रयराज्य साधी मार्गीं तृणें रगडिती चरणेंचि आधीं. ॥ ६२

चरण तिसरा.

(श्लोक.)

आत्मा हरि प्रिय असें समजोनि वाचे, गाती गुण श्रवणिं आइकती तयाचे, ।
ते भक्त दुर्लभ तरी अधिकार तेथें सर्वां म्हणूनि वदला यमधर्म येथें. ॥ १

सर्वांस भक्ति अधिकार जया प्रकारें तोही उपाय वदला यम या विचारें; ।
कीं साधन प्रथम माधवनाम घेणें नाशूनि पाप भजनीं रुचि होय तेणें. ॥ २

१. अमृतरूपें. २. श्लोक २४ पहा. ३. मोठा अग्नि. ४. भूक तहानेचें दरिद्र.

त्याही मधें न कळतांचि जरी स्वभावें येती मुखा हरिति पातक **विष्णुनांवें**; ।
याकारणें स्मरणकीर्तनरूप नामें तीं मुक्तिहूनि अधिकें सुखपूर्णकामें. ॥ ३

म्हणुनि निर्णय वर्णियला **यमें** वदति जो मुनिहो[1] निगमागमें[2], ।
परि न जाणति कर्मठ धर्म हा म्हणतसे **यम**धर्मचि तें पहा. ॥ ४
म्हणाल नामीं जरि मुक्ति होते कां कर्ममात्रीं रत शास्त्रवेत्ते, ।
ते मोहिले वैदिक काम्यकर्में बोलेल ऐसीं **यम**धर्म वर्मे. ॥ ५
यम म्हणे निगमागम जाणती जन तयांसि महाजन बोलती, ।
परि तयांसि रहस्य न ठाउकें करिति कर्म मखादिक कौतुकें. ॥ ६
विरळ त्यांत रहस्य विचारुनी तरति हे हरिच्या गुणकीर्तनीं, ।
परि अहो बहुतेक न जाणती मृगजळांत बुडोनिहि राहती. ॥ ७

यज्ञादिकीं करुनि होइल चित्तशुद्धी ज्ञानें करूनि तदनंतर[3] मोक्षसिद्धी; ।
या कारणें निगम[4] बोलति यज्ञदीक्षा हे स्वर्गमात्रगमनीं धरिती अपेक्षा. ॥ ८
स्वर्गादिकाम[5] करिती विविधां मखांसी ते तों न पावति निजात्म[6] महा सुखासी, ।
कोशिंबिरी करुनि भक्षिति पुष्पमात्रें त्याला फळें मग न त्यां तरुचीं विचित्रें. ॥ ९
यज्ञादिवृक्ष फळ मोक्ष तयांसि येती स्वर्गादिरूप सुमनें जन तींच घेती, ।
सर्वज्ञ जे करिति त्या सुमनीं उपेक्षा होवूनि तींच सुमनें फळ देति मोक्षा. ॥ १०

फुलें भक्षितो तो फळें केंवि लाधे? मनीं स्वर्ग कैसा तया मोक्ष साधे? ।
मनीं कामना ते न तों चित्तशुद्धी, अशुद्धां तयां केंवि कैवल्यसिद्धी? ॥ ११
स्वहित केवळ ते न अपेक्षिती तरिच ते **हरिभक्ति** उपेक्षिती ।
त्यजुनियां अमरां **अमरावतीप्रतिहि** जावुनि दुःखचि भोगिती. ॥ १२
जसा भाडियाचा तट्टू स्वर्ग तैसा तयाचा अहो! मानिती लाभ कैसा? ।
सरे पुण्य लोटूनियां देति जेव्हां रडे फुंदफुंदों पडे मूळ तेव्हां. ॥ १३
धरूनी भुजीं कंठ देवांगनाचे विमानीं वनीं नंदनीं तेथ नाचे ।
भुजें त्याच त्यांचे गळे ते धरूनी रडे त्यांस टाकूनि जातां म्हणूनी. ॥ १४

पुण्यास पाप म्हणती अतएव योगी आद्यंत पापफळ यद्यपि पुण्य भोगी, ।
लोखंडरूप जसि पातककर्म बेडी बेडी सुवर्णमय हे तरि काय गोडी. ॥ १५

---

१. शौनकादिक हो. (सूताची उक्ती). २. वेदशास्त्रें. ३. चित्तशुद्धि प्राप्त झाल्यानंतर. यज्ञादि कर्में इष्ट फल देणारीं असलीं तरी तीं फलें नश्वर होत. यज्ञादि कर्मै करून चित्तशुद्धि प्राप्त झाल्यावर ज्ञानद्वाराच मोक्षसिद्धि होते. ४. वेद. ५. जे स्वर्गलाभ पुत्रलाभ इत्यादि कामना धरून यज्ञादि कर्में करतात ते मोक्षसिद्धि पावत नाहींत. ६. स्वकीय जें आपलें महासुख म्हणजे ब्रह्मसुख त्याला.

स्वर्गादि पुण्यफळ इच्छुनि दीर्घकामी झाले महाजन पराङ्मुख विष्णुधामीं, ।
लोकांस गोड उपदेशहि हाचि वाटे अंधासवें फिरति अंध जसे कुवाटे.॥ १६
स्वर्गादि मात्र वदती फळ वेद जेव्हां आद्यंतवंत फलदायक मात्र तेव्हां, ।
राज्यादि लाभकर लौकिक यत्न जैसे स्वर्गादि लाभपर वैदिक यज्ञ तैसे. ॥ १७
वेदीं चातुर्मास्ययाजी तयाचें आहे कीं जें पुण्य अक्षय्य साचें, ।
नेणोनियां अर्थ ते त्या श्रुतीचा वाखाणीती भाव जैसा मृतीचा. ॥ १८
म्हणति अमर देवां नश्वरांलागिं जैसें,
ऋतुफळ वदती हे वेद अक्षय्य तैसें, ।
अमरहि मरणातें पावती दीर्घकाळें
क्षय बहुदिवसांतें अक्षयें कर्ममूळें. ॥ १९
वदति शाश्वत मुक्ति फळें श्रुती तरि तदर्थ किमर्थ न ये रिती, ।
म्हणुनि येथ असें जरि बोलती तरि वदों प्रतिउत्तर त्यां प्रती. ॥ २०
नव्हति शाश्वत मुक्तिफळें तरी श्रुति पुराण असें असतें जरी ।
नव्हति शाश्वत कर्ममयें फळें म्हणुनि बोलतसे श्रुति या बळें. ॥ २१
नाना कर्म करूनियां क्षितितळीं राज्यादि संपादिती,
तैसा स्वर्गहि यज्ञपुण्यविविधा कर्मींच कीं पावती; ।
जैशा या इहलोक राज्यपदव्या कर्मार्जिता नासती,
तैसीं तीं परलोकदैविक पदें बोले असे हें श्रुती. ॥ २२
आतां चातुर्मास्ययज्ञादिपुण्यें अक्षय्यें तीं कैंवि बोला अगव्हें? ।
तेव्हां ऐसा अर्थ अक्षय्यशब्दें कीं ते पुण्यें राहती फार अब्दें. ॥ २३
म्हणूनि देवां अमरत्व जैसें, नित्यत्व या कर्मफळासि तैसें, ।
कोण्ही श्रुति ज्ञानफळासि तैसा न बोलती नाश तयांत ऐसा. ॥ २४
याकारणें मुक्तिसि नाश नाहीं, न नित्यता कर्मफळासि कांहीं, ।
सांडूनियां मोक्ष अशा फळाला बोलेल कां वेदजनास बोला. ॥ २५
स्वर्गकामसुतकामजनाला यज्ञ कां वदतसे श्रुति बोला, ।
पूर्वपक्ष करिताति असाही वेदतत्व तरि ठाउक नाहीं. ॥ २६
नयनिं दावुनि लड्डुकशर्करा जननि दे कडु औषध लेंकरा; ।
न फळ साखर औषधिचें जसें श्रुति वदे फळ काम्य जगीं असें. ॥ २७
करुनि वैदिक कर्म जसें तसें म्हणुनि वेद फळें वदती असें, ।
तदपिही न विरक्त जनाप्रती फळ अपेक्षित त्यासचि मागती. ॥ २८

---

१. आदिअंत आहे ज्यास. २. वर्षे.

स्वर्गाचीही कामना ज्या नराला ज्योतिष्टोमा तो यजू कां सुराला ? ।
ऐसा अर्थ स्पष्ट पाहा श्रुतींत 'ज्योतिष्टोम स्वर्गकामो यजेत.' ॥ २९
श्रवणकीर्तनही वदती श्रुती, परि न तुच्छ फल श्रुति बोलती, ।
म्हणति वैष्णवधर्म धरा अरे! त्रिभुवनेश्वरकर्म पहा बरें. ॥ ३०
ऋग्वेदिंची 'त्रीणि पदा' म्हणूनी हे गर्जताहे श्रुति विश्वकानीं; ।
कीं विष्णुचे धर्म धरूनि राहा ऐकोनि तत्कर्म मनांत पाहा. ॥ ३१
गोशब्दें जड बुद्धि इंद्रिय तयां जे पाळिती गोप ते,
हे गोपाळ म्हणूनि हे श्रुति तया संबोधुनी बोलते. ।
कीं हें आक्रमिलें पदें करूनियां त्रैलोक्य याकारणें
त्याचे धर्म धरूनि कर्महि पहा कर्मासि जें पारणें. ॥ ३२
'कर्माणि पश्यति' म्हणे श्रुति विष्णुकर्में पाहा मनीं श्रवणकीर्तनरूपधर्में, ।
संध्या जसी श्रुति वदे विधि येथही हा 'कर्माणि पश्यति' म्हणे हरिकर्म पाहा. ३३
स्वर्गादि काम नर ते कमळापतीची सेवा करूनि असि उक्ति कधीं श्रुतीची, ।
येथें उग्याच म्हणती हरिकर्म पाहा त्या विष्णुचे परम धर्म धरूनि राहा. ॥ ३४
ऐसा विवेक न कळोनि मुकुंदनामीं श्रद्धा न ते धरिति वैदिक लोककामीं, ।
स्वर्गासि जातिल कदाचित ते तथापि जाती अधोगतिस होवुनि तेचि पापी. ३५
नहुष इंद्रपदाप्रति जाउनी त्रिभुवनेश्वर इंद्रहि होवुनी ।
भुजग होवुनि तो पडला जसा वरकडांसहि शेवट तो असा. ॥ ३६
स्वर्गासि जाउनिहि मागुति जन्म पावे दुर्वासनेकरुनि पापपथींच धांवे, ।
तेव्हां तयावरि कृतांत करी चपेटा, हा काम्य वेदपथ याकरितांच खोटा. ॥३७

---

१. यज्ञविशेष. २. 'ज्योतिष्टोमेन स्वर्गकामो यजेत' म्ह० ज्याला स्वर्गाची इच्छा आहे त्यानें ज्योतिष्टोम यज्ञ करावा, अशीं वेदवाक्यें आहेत. ३. स्वर्गेच्छु. ४. या श्लोकावरून व या पूर्वींच्या कित्येक श्लोकांवरून वेदाचा अर्थ प्राकृत जनास समजून देण्याचा पंडितांचा उद्देश व्यक्त होतो. ५. इंद्रादिकांचे लोक इच्छिणारे. ६. सोमवंशीय प्रसिद्ध राजा. इंद्रानें ब्रह्महत्या केल्यामुळें तो पदच्युत झाला, तेव्हां सर्व देवांनीं नहुषाला इंद्रपदाभिषिक्त केलें. याला कांहीं काळानें इंद्राणीचा उपभोग आपणास घडावा अशी प्रबळ इच्छा झाली. परंतु ती त्यास वश झाली नाहीं. 'तूं अपूर्व वाहनांत बसून मजकडे ये म्हणजे तुझी इच्छा पुरवीन' असें एकदां तिनें नहुषास सांगितलें तेव्हां तो सप्तर्षीस व अगस्त्यमुनीस वाहनास लावून तिजकडे यावयास निघाला. त्याला जाण्याची घाई होती म्हणूनें त्यानें मुनिवाहकांच्या मस्तकास पाय लावून 'चला चला' (सर्प सर्प) असें म्हटलें. तेव्हां संतप्त होऊन अगस्त्यमुनीनें त्याला शाप दिला कीं, 'तूं सर्प होऊन पतन पावशील.' त्याप्रमाणें नहुष राजा अजगर होऊन यामुनगिरीवरील सरोवरांत पडला. (वनपर्व-अध्याय १७८-८१; उद्योगपर्व-अध्याय ११-१७.)

यालागिं केवळ फळात्मक वेदवाचा, जैसी लता फुलति हाचि विचार तीचा; ।
पुष्पें उपेक्षिति तयां फळ लाभ देती, दूतांसि येथ वदला यम येचि रीती.॥ ३८

पढतमूढ धरूनि अशा श्रुती फुलचि तें फळ मानुनि मोहती; ।
म्हणुनि नेणति वैष्णवधर्म ते, करिति तुच्छफळात्मक कर्म ते. ॥ ३९

या अध्यायीं श्लोक जो बाविसावा व्यासें केला साधकांचा विसावा, ।
तेथें दूतां धर्म जें बोलियेला, या तीं श्लोकीं अर्थ तो सिद्ध केला. ॥ ४०

'तन्नामस्मरणें तदद्वयपणें त्याची कळे आवडी,
तन्नामें सुटला अजामिळ तुम्हां हे साक्षि तों रोकडी; ।
ऐसे धर्म न कर्मठांस कळती,' एवं स्वदूताप्रती
धर्में सांगितली, पुढें वदतसे सद्वैष्णवांची रिती. ॥ ४१

ऐसें बरें दृढ विचारुनि दीर्घबुद्धी टाकूनियां सकळ वैदिककाम्यसिद्धी ।
सर्वात्मभाव धरिती मग ते अनंतीं नामेंचि भक्ति असि साधिलि सर्व संतीं. ४२
'माझें नसे' यम म्हणे 'भय एक त्याला कीं विष्णुभक्तिनिधि सांपडला जयाला.' ।
स्वर्गास जावुनिहि कर्मठ जन्म घेती, पापें असे नरक मागुति त्यांस होती. ॥ ४३
ऐसा मनीं धरुनि भाव कृतांत आतां श्लोकोत्तरार्ध वदतो यम त्या स्वदूतां,।
कीं, 'दंड योग्य नव्हती हरिदास माझे त्यांचे शिरीं कधि पडेल न दंडओझें. ४४
पाप्यास दंड करणें मदधीन येथें नामानळें सकळ पातक भस्म तेथें, ।
त्याला प्रवृत्तिच कधीं न घडेल पापीं तेंही नुरे जरि घडेल कधीं तथापी.'॥ ४५

वैकुंठदूतां यमधर्मदूतां परस्परें ये रिति वाद होतां, ।
अजामिळाला उपदेश व्हावा, दुःसंग त्यानें अवघा त्यजावा. ॥ ४६
संकल्प ऐसा हरिनेंचि केला याकारणें वाद तयांसि झाला. ।
जीवंत ते यास्तव दूत गेले, श्रीविष्णुशस्त्रें करिं ते न मेले. ॥ ४७
जरि असें हरिच्या नसतें मनीं, परतते यमदूत न तेथुनी; ।
वदति नाम तयां हरि आयुधें सतत रक्षिति होवुनि सावधें. ॥ ४८
म्हणुनियां श्रीहरिभक्ति जेथें, झणी तुम्हीं नेणत जाल तेथें; ।
येणेंरितीनें यमधर्म आतां हितोपदेशें वदतो स्वदूतां. ॥ ४९

जे साधु विष्णुमय पाहति सर्व सृष्टी, ज्यांच्या सदा वदति देव पवित्र गोष्टी, ।
ते वासुदेवशरणागत भक्त जेथें त्यांच्या झणी जवळि जाल कदापि तेथें.॥ ५०

---

१. 'एतावानेव लोकेऽस्मिन्' इत्यादि २२वा श्लोक. २. कर्मच प्रधान असें मानणारे जे त्यांला. ३. श्लो० २८ पहा.

यम म्हणे, 'यमकिंकर हो! सदा हरिजनासि रमापतिची गदा ।
करि सुरक्षण, काय तयां भयें? न करवे मज दंड तयां स्वयें. ॥ ९१
हरिजनास पहाल तुम्ही जरी, करिल मृत्यु गदा हरिची तरी; ।
विहित दंड धरा इतरा नरीं,' म्हणुनियां यम वर्णिल याबरी. ॥ ९२

चरण चवथा.

(श्लोक.)

दूतांला वदला कृतांत, 'हरिचीं नामें जयांच्या मुखीं
त्यांला दंड न मी न थोर अथवा कोणी करी आणखी.' ।
जातां धर्म तयांसि सांगत असे कीं, 'जे तयां वेगळे
ते आणा नरकाप्रती तुम्हि अरे! बांधोनि त्यांचे गळे.'॥ १
'आजन्म जो विमुख विष्णुपदारविंदीं सेवी न कीर्तिमकरंद कधीं न वंदी ,।
ऐसे जगीं बहुत ते नैरकार्ह जाणा,' दूतां म्हणे यम 'तयां नरकास आणा.' ॥२
'जे कां विरक्त हरिभक्त तदंत्रिधूळी ज्याच्या घरीं न पडल्या असती त्रिकाळीं, ।
ऐशा गृहीं नरकमार्गमयीच तृष्णा,' दूतां म्हणे यम 'तयां नरकासि आणा.'॥३
श्रवण कीर्तन माधववंदनें जळति पूर्विल पापहि काननें, ।
विधिकरांप्रति यास्तव ये रिती वदतसे यम संयमनीपती. ॥ ४
श्रोते येथें वदति, जळती सर्वही पूर्वपापें,
जाणों नेणों परि अघहरें विष्णुनामें प्रतापें; ।
पूर्वी शुद्धी द्विविध कथिल्या त्यांत अत्यंत शुद्धी
नाहीं जों तों न घडति कशा मागुती पापवृद्धी? ॥ ५
वंदी, सेवी, 'हरि हरि' म्हणे जीव तो एकदाही,
त्याला कैसा यम म्हणतसे यातनादुःख नाहीं? ।
पापीं धांवे जरि मन पुन्हा यातनेयोग्य झाला,
ऐसे जे कां वदति वदतो ग्रंथकर्ता तयाला. ॥ ६
धाडील दूतां यमधर्म जेव्हां, आणावया जातिल दूत तेव्हां; ।
या मृत्युकाळीं जरि नाम वाचे ये, यातनालोक तयांस कैंचे? ॥ ७

---

१. विष्णुपादकमलीं. २. कीर्तिरूप पुष्परस. ३. नरकास जाण्यास योग्य. ४. पापांचीं अरण्यें. येथें 'पापकाननें' असें सामासिक पद पाहिजे होतें, पण 'हि' हें अक्षर मध्येंच घातल्यामुळें संस्कृतहीनत्वाचा दोष येतो. कदाचित् 'पातककाननें' असा मूळचा पाठ असून लेखकप्रमादानें 'पापहि काननें' असें झालें असेल.

'आणूं नका' म्हणतसे यम याचि भावें, जें आणणें मरणकाळचि तो स्वभावें;।
जेव्हां घडे स्मरण वंदन मात्र कांहीं तो यातनार्ह सहसा जन होत नाहीं.॥ ८
ज्याचे घरीं न हरिभक्तपदाब्जधूळी तृष्णा जयास सदनांत असे त्रिकाळीं, ।
'आणा तयास' म्हणतो यम कीं जयाला संतप्रसाद हरिभक्ति घडे न त्याला.॥ ९
येथें न यास्तवहि आणिक शास्त्रनीती मिथ्या फळश्रुति मुनींद्रमुखासि येती, ।
शास्त्रांत या सकळ निष्कपटार्थ जेथें मिथ्या फळश्रुति कशा वदतील एथें?॥ १०
ऐसें अजामिळमुखीं हरिनाम अंतीं येतां त्वरें करुनि सोडविलाच संतीं; ।
प्राणप्रयाणसमयीं हरिदास्य कांहीं होतांचि शुद्धि, मग दंड तयासि नाहीं.॥ ११
याहीवरी यम म्हणे निजकिंकरांला कीं, 'नेणतां झणि पहाल अशा नरांला ।
ते तों बळेंच सुटतील, परंतु तेथें मी [1]सापराध तुमचा अपराध जेथें.' ॥ १२
धरूनी असा भाव पोटीं अनंता स्मरोनी मनीं प्रार्थितो धर्म आतां, ।
मुखीं नाम जो घे तयाला स्वदूतीं कसें बांधलें हाचि संताप चित्तीं. ॥ १३
हृदयिं आठवुनी पुरुषोत्तमा यम म्हणे, 'अपराध करीं क्षमा.' ।
द्विजमुखीं तव नाम तयावरी उचलिले कर यां यमकिंकरीं. ॥ १४
[2]महदतिक्रम हा रचिला हरी! न कळतां तव किंकरकिंकरीं; ।
विनवितों कर जोडुनि ईश्वरा! करिं दया करुणामृतसागरा! ॥ १५
अत्यंत शुद्धि[3] हरिकीर्तनभक्तिभावें, [4]हें तों खरें परि न जाणतही स्वभावें[5]; ।
नारायणस्मरणकीर्तन मात्र कांहीं ज्याला घडेल मग पातक त्यास नाहीं. ॥ १६
[6]प्राणप्रयाणसमयीं यमदूत जेव्हां येती, घडे किमपिही हरिदास्य तेव्हां, ।
[7]आजन्म पातक जळे मग त्या पवित्रा होतील [8]दुर्गति कशा विविधा विचित्रा? ॥ १७
याकारणें प्रकरणार्थ समस्त आतां श्रीव्यासपुत्र वदतो सुखकारसंतां; ।
ज्या वर्णिल्या विविध [9]शुद्धिहि विष्णुदूतीं नामप्रताप शुक वर्णिल तोचि अंतीं.॥ १८
[10]बोले श्रीशुक कीं, 'नृपा! धरि मनीं या पूर्विल्या कौतुका,
तस्मात् कारण विष्णुकीर्तन असें [11]निर्दाळितें पातका.।
पापें जीं बहु थोर थोर नरकप्राप्तीच ज्यांचीं फळें
प्रायश्चित्त तयांसही परम हें नामें जगन्मंगळें.॥ १९

---

१. अपराधयुक्त. २. साधूंचें उल्लंघन. ३. 'होते' हें क्रियापद येथें अध्याहृत आहे. ४. 'होतां' असाही पाठ आहे. ५. सहजगत्या. ६. प्राण जातेवेळीं. ७. जन्मापासून मरणापर्यंत केलेलें. ८. वाईट दशा, नरकयातना. ९. पापनिष्कृतीचे मार्ग. १०. श्लोक ३१ पहा. ११. नाशितें.

पापास तों भलतशा हरिनाम जाळी, त्याचेंच कीर्तन घडे जरि सर्वकाळीं।
पापीं प्रवृत्तिच नव्हे अतिशुद्धचित्ता; श्लोकद्वयेंकरुनि वर्णिल हेंचि आतां. ॥२०

नामोच्चारणमात्र[1] ज्यांस घडलें ते पावले सद्गती,
सामर्थ्यें हरिचीं अशीं घडिघडी जे वर्णिती ऐकती।
त्याला जे उपजेल भक्ति हरिची अत्यंत ते शुद्धता,
तैसीं तीर्थतपोव्रतें न करिती हें जाण तूं सुव्रता! ॥ २१

अजितभक्ति मनीं उपजे जया मग अपेक्षित काय नृपा! तया ?।
अजितकीर्तनशुद्धि असी बरी म्हणुनियां शुक वर्णिल यावरी. ॥ २२

कृष्णाची[2] पदपद्मचित्सुखसुधा सप्रेम जे चाखती
ते मिथ्या मृगनीरमायिकगुणीं कां हो पुन्हां माखती ?।
प्रायश्चित्त तदन्यही अघ हरी शुद्धी तरी त्या तशा।
कीं हस्ती धुतला तथापिहि धुळी तीरीं शिरीं घे तशा.' ॥ २३

शुकमुखें इतिहास नृपें असा हृदयिं आइकतां बसला ठसा;।
परम विज्वर[3] या मुनिउत्तरें नृपति होउनि मानियलें खरें. ॥ २४

नरकनाशक नाम नरेश्वरें शुकमुखें हरिचें अतिआदरें।
परिसतां अतिविस्मित मानसीं मन बुडे हरिनामसुधारसीं. ॥ २५

बहु सुखी बहु विस्मित भूपती नयनिं देखुनियां शुक त्याप्रती।
वदतसे, 'तुज विस्मय यापरी नवल मानियलें यमकिंकरीं.' ॥ २६

बोले[4] श्रीशुक कीं, 'नृपा! स्वपतिची ऐकोनि हे वैखरी
दूतीं विस्मित होवुनी धरियली आज्ञा शिरीं हे खरी;।
आतां ते तद्दिपासुनी हरिजना दृष्टीं पहातां भिती,
जेथें श्रीहरिकीर्तनें चुकवुनी तो ठाव ते भोंवती. ॥ २७

अगस्तिनें हेचि कथा शुकाला सांगीतली, जे शुक बोलियेला;।
तथापि हें व्यासमुखें पुराणीं भविष्य बोले मुनिवर्यवाणी. ॥ २८

स्वपुत्र सांगेल पुढें स्वशिष्या नृपा असें वर्णियलें भविष्या,।
तें बोलतां श्रीशुकही नृपाला कीं, 'हे अगस्ती मज बोलियेला.' ॥२९

शुक म्हणे[5] फिरतां क्षितिमंडळीं सदितिहास[6] असा मलयाचळीं।
मज वदे असतां हरिपूजनीं अतिदयाळु अगस्ति महामुनी. ॥ ३०

---

१. श्लोक ३२ पहा. २. श्लोक ३३ पहा. ३. गेला आहे संताप ज्याचा असा. ४. श्लोक ३४ पहा. ५. श्लोक ३५ पहा. ६. उत्तम वृत्तांत.

तृतीय अध्याय विचित्र येथें संपूर्ण झाला इतिहास जेथें, ।
समर्पिला श्रीहरिपादपद्मीं पद्मालयेच्या[1] अतिदिव्यसद्मीं. ॥ ३१
ऐसा 'नामसुधा' म्हणोनि रचिला श्रीवल्लभें[2] ग्रंथ हा,
सर्वात्मा हरि वामनाननमिसें जें बोलिला तें पहा. ।
'जे हा वर्णिति, आयकोनि धरिती भावार्थ, त्या सज्जना
होती भागवती[3] गती कलियुगीं, नामें जसी वामना[4]'. ॥ ३२

नृहरिदर्पण[5].

हरि[6] नरहरि[7]रूपें क्रूर दैत्यां समस्तां,
परम सुलभ शांत श्रीकर[8] स्वात्मभक्तां ।
स्वचरणशरणातें सौम्य ही शीघ्र तो कीं;
जननिभय मनीं कां मानिजे व्याघ्रतोकीं? ॥ १
नरतनू, मुख उत्कट[9] केसरी[10] कटितटीं पिंवळा पट केशरी ।
परम सौम्य रमाहृदयांबुजीं मज असा वरषे स्वदयांबु. जी ! ॥ २
विषमकारक[11] कोप हरी समीं करिन वंदन त्या नृहरीस मी. ।
कथिन दिव्य चरित्रकथा रती, तरति यांतचि जे जन थारती[12]. ॥ ३
वचन अल्प, कथा अधिका दिसे, धरिति संत मुखें सनकादिसे[13], ।
बहूत सूचवुनी चिमणा[14] असे, 'नृहरिदर्पण' यास म्हणा असें. ॥ ४
ग्रंथ हा 'नृहरिदर्पण' जाणा सूचवी बहुत अर्थ सुजाणा; ।
वामनीं त्रिभुवनीं प्रकटावें, यांत ये रितिच पुण्य लुटावें. ॥ ५
जया निर्गुणत्वीं स्वसंकल्प नाहीं, करी ईश्वरत्वीं जगत्कल्पना ही, ।
स्थितीमाजि ही त्यामध्यें स्वैर भावें जगीं त्याच नानावतारीं रमावें. ॥ ६

---

१. लक्ष्मीच्या सुंदर गृहामध्यें. २. आपले ग्रंथ ईश्वररचित आहेत असा उल्लेख पंडितांच्या ग्रंथांत वारंवार आढळतो. ३. उत्तम भगवद्भक्ताला उचित अशी गति म्हणजे वैकुंठप्राप्ति. ४. या चरणावरून भागवत धर्मास अनुसरून वागणाराला जी गति प्राप्त होते ती आपणासही मिळाली आहे असें दाखविण्याचा वामनाचा हेतु असावा असें दिसतें. ५. हें प्रकरण श्रीमद्भागवत-स्कंध ७ अध्याय १–१० यांच्या अनुरोधानें लिहिलेलें आहे. याचें 'प्रल्हादचरित्र' असेंही दुसरें नांव हस्तलिखित ग्रंथांच्या आद्यन्तीं आढळतें. विष्णूनें नृसिंहाचा म्हणजे अर्धा नर आणि अर्धा सिंह अशा आकृतीचा देह (अवतार) धारण करून हिरण्यकशिपूस मारिलें आणि भक्तवर्य प्रल्हादाचें संरक्षण केलें, अशी कथा या प्रकरणांत आहे. दर्पण म्ह० आरसा. ६. विष्णु. ७. सिंह. ८. लक्ष्मीप्रद. ९. प्रचंड, भयंकर. १०. सिंह. ११. दुःखकारी. १२. आश्रय पावती. १३. सनक–ब्रह्मदेवाच्या मानसपुत्रांतील एक. १४. लहानसा.

स्वयें कल्पितो जो जगीं कल्प कांहीं, करीतो जनोद्धारसंकल्प कांहीं, ।
म्हणे, 'म्यां स्वदिव्यावतारीं रमावें, जळीं भूतळीं व्योम ही आक्रमावें.' ॥७
विना ज्ञान जे भक्त वैकुंठवासी अमुक्त स्थळीं चिंतिलें त्या जिवासीं, ।
तयां माजि ही द्वारपाळद्वयातें स्वयें जन्म द्यावें गमे अद्वयातें. ॥ ८
न कळतां निजतत्त्व हि सादर स्वभजनीं द्विज दोघ सहोदर. ।
धननिमित्त परस्पर शापिती, द्विरद नक्र हि एक नदी पिती. ॥ ९
धरी गंडिकेमाजि हस्तीस पायीं, न सोडीच तो ग्राह कोणा उपायीं; ।
गजें प्रार्थितां नक्र मारोनि चक्रें हरी सोडवी पाहती देवचक्रें. ॥ १०
शिळा गंडकीच्या तदारम्य देवें स्वमूर्तीच केल्या तया वासुदेवें; ।
अमुक्त स्थळीं द्वारपाळद्वयातें करी, कीं न ते जाणती अद्वयातें. ॥ ११
न मोडी अमुक्त स्थळीं कर्म वारें नव्हे ज्ञान तैसें चि तें दुर्निवारें, ।
तयां यास्तव क्रोधसंस्कार भारी करी, दैत्य इच्छी असें कैठभारी. ॥ १२
द्वारीं तिहींच सनकादिक मौनसाचा केला दुरूक्तिवचनें अपमान साचा, ।
ते शापिती असुरयोनित त्यांस जाया,[18] दोनीं हरी करि च कीर्ति जगीं सजाया.॥
जय विजय असे ते जौवळे हो दितीचे,
असुर इतर झाले पुत्रपौत्रादि तीचे. ।

---

१. आकाश. २. वैकुंठाचें वर्णन भागवत—स्कंध ३ अध्याय १५ श्लोक १४–२६ यांत सविस्तर आहे. ३. अन्तःकरणापासुन न सुटकेला. ४. जय आणि विजय या दोन द्वारपाळांतें. यांनीं चार सनत्कुमारांस विष्णुदर्शनास जाण्याचा प्रतिबंध केला, तेव्हां त्यांनीं या दोघांस शाप दिला कीं, 'आमच्या संबधें तुम्हीं दुजाभाव मनांत आणून परमेश्वरदर्शन घेण्यास प्रतिबंध केला, या अपराधाबद्दल तुम्हांला योग्य दंड हाच कीं तुम्ही ह्या वैकुंठांतून निघून जेथें कामक्रोधलोभ हे तीन शत्रु प्राण्यांना गांजितात अशा पापी लोकांत जाऊन तीन जन्मपर्यंत राक्षस होऊन नंतर वैकुंठाला परत याल.' या शापाप्रमाणें हे द्वारपाल पहिल्या जन्मीं हिरण्यकशिपु आणि हिरण्याक्ष राक्षस झाले, दुसऱ्या जन्मीं रावण आणि कुंभकर्ण आणि तिसऱ्या जन्मीं शिशुपाल आणि वक्रदंत होऊन नंतर मुक्त झाले. ५. विष्णूतें. ६. आत्मतत्त्वाचें ज्ञान नसूनही. ७. सखे बंधु. ८. नामसुधा—अध्याय २ चरण ४ श्लोक ३–७ पहा. ९. हत्ती. १०. सुसर. ११. सुसर. १२. समूह. १३. त्या वेळेपासून. १४. विष्णूनें. (वसुदेवात्मकें—कृष्णें.) १५. कैठभशत्रु. (विष्णु.) १६. ब्रह्मदेवाच्या चार मानसपुत्रांचा. (सनक, सनत्कुमार, सनत्सुजात आणि सनंदन यांचा.) हे चौघेही मोठे भगवद्भक्त आणि ब्रह्मनिष्ठ होते. १७. स्कंध ७ अ० १ श्लो० ३५–३८ पहा. १८. सनत्कुमारांकरवीं जयविजयांना शाप देवविणें आणि त्या शापापासून तीन जन्मानंतर मुक्त करणें हीं दोन्हीं कृत्यें भगवंतांनीं आपली कीर्ति लोकांत होण्यासाठीं केलीं—असा भावार्थ. भगवंताला युद्ध करण्याची इच्छा झाली, तेव्हां त्यांनीं सनत्कुमारांस क्रोध आणून आपल्या पार्षदांस शापदग्ध करवून आपले शत्रु बनवून युद्धेच्छा पूर्ण केली. १९. जुळे.

प्रथम उपजला जो [1]धाकुटा बंधु होतो,
[2]धरणिधरवराहें मारिला दैत्य हो! तो. ॥ १४

बुडे [3]क्ष्मा तयीं उद्धरी जो [4]क्षमेला, तया क्रोडरूपें हिरण्याक्ष मेला [5]।
सखा दूसरा ज्येष्ठ, त्या अग्रजाला मनीं क्रोध उत्पन्न अत्युग्र जाला. ॥ १५

हिरण्याक्ष नामें वधी क्रोडें ज्याला सखा बंधु साचाच जो त्या दुजाला,।
मुनी बोलती [6]अग्रज ज्ञान रीती [7]श्रुतीच्या पथें ज्येष्ठ ज्याला करीती. ॥ १६

रेतबिंदु पहिला स्थिर होतो, जन्मतो तनुज मागुति हो! तो. ।
अग्र जन्म उदरांत जयाला, [8]अग्रजत्व ऋषि देति तयाला. ॥ १७

तो हिरण्यकशिपु [9]प्रियभावाकारणें निज [10]तमोगुणभावा ।
दाखवी, त्वरित ठोकुनि मांडी द्वेष विष्णुचरणांप्रति मांडी. ॥ १८

अजर अमर काया आपुली तो कराया
[11]तप करि, वर मागे [12]धातया, लोकराया! ।
'न मृति मज' म्हणे 'हो [13]चेतनाचेतनाहीं,
मरण हरि! असें दे [14]दीसरातींत नाहीं.' ॥ १९

त्या वरें अमरमानवलोकीं स्वामि तोचि, फळ हें अवलोकीं; ।
देववृंद अवघाच पळाला भी लपोनि अववा चपळाला. ॥ २०

ते देव हो! प्रार्थिति, 'देवदेवा! कीं आपुलें तें पद दे [15]वदे [16]वा; ।
झाली बहू बुद्धि अधीरवाणी.' तों बोलिली ते [17]अशरीरवाणी. ॥ २१

---

१. हिरण्याक्ष. २. विष्णूनें वराहावतार धारण करून, भूलोकास पाताळांत घेऊन जाणाऱ्या महाबलाढ्य हिरण्याक्ष असुरास मारून, तिचा उद्धार केला, ही कथा स्कंध ३ अ० १९ यांत आहे. ३. पृथ्वी. ४. वराह. (डुकर.) ५. स्कंध ७ अ० १ श्लो० ४० पहा. ६. 'दूसरा जन्मरीती' असाही पाठ आहे. ७. 'स्मृतीच्या' असाही पाठ आहे. ८. या जुळ्या मुलांत ज्याची प्रथम गर्भोत्पत्ति झाली तो अग्रज (हिरण्यकशिपु) व ज्याची मागाहून झाली तो अनुज (हिरण्याक्ष). ज्येष्ठत्व आणि कनिष्ठत्व प्रसूतिक्रमानें न धरतां, गर्भस्थापनाक्रमानें धरलें पाहिजे. दिति ज्याला प्रथम प्रसवली तो कनिष्ठ (हिरण्याक्ष) आणि ज्याला मागाहून प्रसवली तो अग्रज (हिरण्यकशिपु). याविषयीं आधारवचन आहे तें:—'यदा विशेत् द्विधाभूतं बीजं पुष्पं परिक्षरत्। द्वौ तदा भवतो गर्भौ सूतिर्वंशविपर्ययात् ॥'. ९. हिरण्याक्षवधाबद्दल सूड घेण्यासाठीं. १०. तमोगुण संहारक्रिया करून दाखवी, कारण तमोगुणाचा धर्म संहार होय. ११. मंदरपर्वतावर तप केलें. (स्कंध ७ अ० ३ श्लो० २.) १२. ब्रह्मा. (अब्ज म्ह० कमळ त्यापासून झालेला.) १३. स्थावरजंगमांच्या द्वारें. १४. स्कंध ७ अ० ३ श्लो० ३५–३७ पहा. १५. सांग, बोल. १६. किंवा. १७. आकाशवाणी. (स्कंध ७ अ० ४ श्लो० २४–२८ पहा.)

कीं, 'हा तपें तोषुनि अब्जजाला, त्याच्या वरें सर्व अवध्य झाला. ।
तथापि मारीनचि दुर्धरा या, गांजील माझ्या जयिं भक्तराया.' ॥ २२
प्रल्हाद त्याचा सुत, त्या कुमारीं घडे तयीं द्वेष, मुकुंद मारी, ।
केव्हां असें होइल हे असोशी दुःखें बहू तो सुरवृंद सोशी. ॥ २३
ऐशी प्रतीक्षा हृदयांत देवा, तों दैत्य त्या भागवता सदैवा ।
पुरोहिताच्या सदनींच ठेवी, ते शीकविती अति नीच [6]ठेवी. ॥ २४
एके दिनीं घे सुत दैत्य अंकीं, तो स्नेह त्याचा गणवे न अंकीं; ।
पुसे तया भागवतोत्तमातें कीं, 'आवडे जें तुज सांग मातें.' ॥ २५
प्रल्हाद बोले, 'सदन त्यजावें, तपोवनालागिं अगत्य जावें, ।
तेथें भजावें हरिच्या पदातें जो आपदांतें हरि, दे पदातें. ॥ २६
दैत्येश्वरा ! आवडि हेचि मातें कीं सेवणें श्रीपुरुषोत्तमातें; ।
त्यजूनि विष्णूसि भजे गृहातें तो आपला घात करी स्वहातें. ॥ २७
दुःखार्णवीं जो धरि कांस याची, चिंता तयाला मग कासयाची ? ।
न वीसरावेंचि कदापि त्याला.' प्रल्हाद इत्यादि वदे पित्याला. ॥ २८
परिसतां असुरेश्वर हांसला; मग म्हणे, 'कवणें शिशु नाशिला ? ।
शिकविलें बरवें अथवा जसें वदति तेंचि मुलें अशिं रांजसें.' ॥ २९
म्हणे, 'हा करावा गुरूनें विचार स्वयें, लेंकरा ठाउका काय चोर ? ।
हरी आमुच्या वाइटाचा भुकेला तयाचे जनीं हा कुळीं भेद केला. ॥ ३०
क्षणी देव होवोनियां भृंग पक्षी गृहामाजि येऊनियां विष्णुपक्षी ।
अशीं नाशिती लेंकरें हो! निधानें, द्विजें राहिजे ते स्थळीं सावधानें'.॥३१

१. भक्तश्रेष्ठ. (प्रल्हाद.) २. हिरण्यकशिपूस कयाधूपासून झालेल्या चार पुत्रांतील ज्येष्ठ. हा जन्मतःच भगवन्निष्ठ परमभक्त होता. जंभासुराची कन्या कयाधु ही याची जननी. ३. अत्युत्कट इच्छा. ४. भगवद्भक्त. ५. शुक्राचार्य हा हिरण्यकशिपूचा पुरोहित, परंतु तो तपासाठीं बाहेर गेल्यामुळें त्याचे पुत्र शंड आणि अमर्क हे पौरोहित्य करून प्रल्हादास विद्या शिकवीत असत. (स्कंध ७ अ० ५ श्लो० १–३.) ६. रीति. ७. मांडीवर. ८. 'सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः । भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥'म्ह० ईश्वर सर्व भूतांमध्यें वास करतो व सर्व जग परमेश्वराच्या रूपांत आहे असें जो पाहतो तो भागवतोत्तम असें समजावें. (स्कंध ११ अ० २ श्लो० ४५.) ९. कशाची. १०. स्कंध ७ अ० ५ श्लो० ४–५ पहा. ११. रजोगुणविशिष्ट. १२. चाळे, चेष्टा. १३. त्या हरीच्या भक्तांनीं माझ्या कुळांतील मुलाची बुद्धि फिरविली. १४. भ्रमर अथवा काकाकव्वा. १५. विष्णुपक्षीय. १६. रत्नें.

गुरूंतें असें दैत्य सांगोनि धाडी; तयां वाटली गोष्ट हे देवैघाडी[1]. ।
भिऊनी मनीं तर्क नाना करीती, तेया[2] पूसती विप्र सामादिरीती[3]. ॥ ३२

'अरे हे प्रल्हादा[4]!' गुरु पुसति 'कोठून शिकसी ?
कशी होती प्रज्ञा[5] ? त्यजुनि तिस तूं स्वैर ठकसी[6]. ।
स्वयें तूझ्या पोटामधील, अथवा बुद्धि उकळी,
कळी हृत्पद्माची[7] उगवलि कशी घेवुनि कळी[8] ?' ॥ ३३

म्हणे[9] श्रीप्रल्हाद, 'स्वपर[10] म्हणिजे भ्रांति उकली,
कळी[11] ईच्यामूळें असुरअमरीं आणि सकळीं. ।
कळी हृत्पद्माची उकलिल कशी मोह रजनी ?
जनीं ऐशा मूढीं मति न धरिती विष्णुभजनीं. ॥ ३४

स्वपर म्हणुनि ज्याची मोहिते स्वैरें[12] माया
स्ववश[13] करि तिला जो षड्गुणत्वें[14] रमाया, ।
नमिन मि भगवंता जो तुम्हां आकळेना
स्वपर कुमति भेदें तोचि आत्मा कळेना. ॥ ३५

उपाध्ये हो! नेणा तुम्हि जरि तया श्रीकरधरा
धरा पोटीं हें जी! मग न करणें स्पंद[15] अधरा; ।
धरास्वामी[16] चक्रें वधि मम हिरण्याक्ष चुलता,
लता बुद्धीची त्या तरुवरि करी योग भलता. ॥ ३६

शिळे[17] चुंबी[18] लोह भ्रमत तिस येतांच जवळी
वळी तैशी माजी मति हि हरि, ते त्यास कवळी[19]. ।
वेळी[20] पोथ्यांच्या या तुम्हि असुररीती शिकवितां
वितां[21] व्यर्थें काव्यें, अलवण हरीवीण कविता[22].' ॥ ३७

---

१. दैविक. २. प्रल्हादाला. ३. सामोपचारें. ४. स्कंध ७ अ० ५ श्लो० ९–१० पहा. ५. बुद्धि. ६. बुद्धिविपर्यय करून फसतोस. ७. अंतःकरणरूप कमळाची. ८. कलह. ९. स्कंध ७ अ० ५ श्लो० ११–१४ पहा. १०. हें माझें (स्व) आणि हें तुझें (पर) अशी भ्रांति (माया) काढून टाका. ११. कलह. १२. स्वेच्छ. १३. स्वाधीन. १४. समग्र ऐश्वर्य, समग्र धर्म, समग्र यश, समग्र श्री, समग्र ज्ञान, समग्र वैराग्य. १५. हलवणें. १६. पृथ्वीपति. १७. लोहचुंबक. जसा अयस्कांत जवळ भ्रमण करीत येणाऱ्या लोहशिळेला वळवितो, तसा हरि माझ्या मतीला ओढतो. लोहचुंबक संनिध असल्यानें लोह जसें भ्रमण पावतें तसें हरिसांनिध्यानें माझें चित्त भेद पावतें. १८. 'चुंबे लोह' असाही पाठ आहे. १९. धरी, पकडी. २०. ओळी. २१. प्रसवतां. २२. 'करितां' असाही पाठ आहे.